

जनमाध्यम

✦ अमरावती, बुधवार ११ नोव्हेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १० एक प्रतिष्ठित सवय

गोकुळवर अखेर महायुतीचा झेंडा

राजेश पाटील नवे अध्यक्ष: सतेज पाटलांना धक्का



◆ शासननियुक्त ४ मतं ठरली निर्णायक ◆

कोल्हापूर/प्रतिनिधी- कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणात आणि सहकार क्षेत्रात गेले अनेक दिवस सुरू असलेल्या 'गोकुळ' दूध संघाच्या सत्तासंघर्षाचा अखेर निकाल लागला आहे. गोकुळच्या अध्यक्षपदी महायुतीचे उमेदवार आणि माजी आमदार राजेश पाटील यांची अधिकृतरीत्या निवड झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी आमदार राजेश पाटील यांची गोकुळच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. गोकुळच्या अध्यक्षपदासाठी महायुतीकडून राष्ट्रवादी काँग्रेसला संधी देण्यात आली. निवडणूक निकालानंतर अनेक नाट्यमय घडामोडीनंतर अखेर आज अध्यक्ष निवड पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या माजी आमदार राजेश पाटील यांची अध्यक्षपदावर १६ विरुद्ध १३ मतांनी निवड झाली. तर समविचारी आघाडीच्या शशिकांत पाटील चुयेकर यांना १३ मते मिळाली. निवडणुकीत समविचारी आघाडीने १३ तर महायुतीने १२ जागा जिंकल्या होत्या. पण गणपूर्ती अभावी अध्यक्ष निवडीचा पेच निर्माण झाला होता. मात्र शासन नियुक्त संचालकांना मतदानाचा अधिकार मिळाल्यानंतर अध्यक्ष निवड प्रक्रिया आज पार पडली. महायुतीकडून राजेश पाटील आणि समविचारी आघाडीने शशिकांत चुयेकर यांना उमेदवारी दिली होती.

गोकुळच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांच्या नेतृत्वाखालील समविचारी आघाडीने २५ पैकी १३ जागा जिंकल्या होत्या. तर महायुतीला १२ जागा मिळाल्या होत्या. संख्याबळानुसार समविचारी आघाडीचे पारडे जड होते. मात्र अध्यक्ष निवडीच्या पहिल्या सभेला महायुतीच्या १२ संचालकांनी बैठकीला दांडी मारली. त्यामुळे आवश्यक गणपूर्ती होऊ शकली नाही आणि अध्यक्ष निवडीची प्रक्रिया रखडली. समविचारी आघाडीच्या १३ संचालकांनी समांतर सभा घेत शशिकांत पाटील-चुयेकर यांची अध्यक्षपदी निवड झाल्याचे जाहीर केले. मात्र गोकुळ प्रशासनाने या निवडीला मान्यता दिली नाही. हा वाद पुढे न्यायालयात पोहोचला. त्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाने १० नोव्हेंबरला नव्याने अध्यक्ष निवडीची प्रक्रिया घेण्याचे निर्देश दिले.

'धमक्या देऊ नका'
सतेज पाटलांनी चंद्रकांत पाटलांना सुनावलं

कोल्हापूर - गोकुळसाठीचंद्रकांत पाटील यांनी मुख्यमंत्र्यांवर दबाव आणण्याचं काम केले. आता ही लढाई अंगलट येत असल्याने मुख्यमंत्र्यांना ओढण्याचं काम पाटील करताहेत. तुम्ही आता धमक्या द्यायला लागलात. तुमचा काचेचा महाल मलाही माहिती आहे. त्यामुळे मला बोलायला लावू नका. मी पण पाटील आहे. तुम्ही सरकारी यंत्रणेतून मला धमकी देऊ नका. तुम्हाला लढायचं असेल तर २०२९ ला जिल्ह्यातील दहा मतदारसंघात कुठेही एकमेकांविरोधात लढूया अशा शब्दात सतेज पाटील यांनी मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर घणाघात केला आहे.

पत्रकार परिषदेत सतेज पाटील म्हणाले की, चंद्रकांत पाटील जेवढे मोठे होत आहेत त्यांची वैचारिक पातळी तेवढी खाली होत चालली आहे. चंद्रकांत पाटील यांच्यासोबत माझी लढाई १० वर्ष सुरू आहे. स्वर्गीय डी वाय पाटील यांच्यावर बोलून तुम्ही काय मिळवलं? डी वाय पाटील यांचा अपमान करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्याचे चिंतन त्यांनी करावं. कार्यकर्त्यांच्या जीवावर निवडणूक लढूया. सरकारी यंत्रणेचा गैरवापर करून तुम्हाला उद्धवस्त करतो, तुम्हाला संपवतो ही भाषा माझ्यासमोर वापरू नका. कोल्हापूरच्या जनतेलाही आवडणार नाही. महाराष्ट्रातील जनता असली भाषा खपवून घेणार नाही असं पाटील यांनी सांगितले. तसेच माझ्यामुळे २०१४ ला राष्ट्रवादीचा खासदार कोल्हापूरात झाला. त्या खासदाराने मला ऑक्टोबरमध्ये फसवले. २०२०-२२ मध्ये विधानपरिषदेच्या बिनविरोध झाल्या तेव्हा धुळे, मुंबईत बिनविरोध निवडणूक काँग्रेसने केली, त्याबदल्यात कोल्हापूरात भाजपाने बिनविरोध निवडणूक करायची अशी चर्चा झाली. त्यामुळे आता टीका करण्याचं काम हे लोक करताहेत असं सतेज पाटलांनी मुश्रीफांना सुनावले.

तसेच लोकांनी दिलेला कौल अमान्य करण्याचं पाप महायुतीच्या नेत्यांनी केले आहे. त्याचा परिणाम निश्चितपणे उद्याच्या भविष्यकाळात या लोकांना भोगायला लागेल. हसन मुश्रीफ यांच्याकडून १३ संचालकांना धमकावण्याचं काम केले जाते. ही रेकॉर्डिंग समोर आली आहे. शासनाची व्यवस्था ➪(पान २ वर)

फडणवीसांनी डोळे वटारले तर सतेज पाटलांचे साम्राज्य रात्रीत उद्धवस्त; चंद्रकांत पाटील यांचा कोल्हापुरात इशारा



कोल्हापूर/प्रतिनिधी- गोकुळ दूध संघातील सत्ता संघर्षाने पुन्हा एकदा उच्च तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि काँग्रेसचे विधान परिषदेचे गटनेते सतेज पाटील यांच्या शाब्दिक युद्ध सुरू झाले असल्याचे मंगळवारी पाहायला मिळाले गोकुळमध्ये महायुतीचा अध्यक्ष होणार असे स्पष्ट झाल्यानंतर चंद्रकांत पाटील यांनी गोकुळ समोर झालेल्या एका सभेवेळी सतेज पाटील यांच्यावर टीकेचे जोरदार प्रहार केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जर का डोळे वटारले तर सतेज पाटील यांचे साम्राज्य एका दिवसात उद्धवस्त होईल, असा इशारा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिला आहे. लहान मुलाला खेळणं मिळालं नाही की जसा तो हातपाय आपटून त्रागा करतो. आईला बोचकारतो. तसाच आरडाओरडा गेले पंधरा दिवस गोकुळच्या अध्यक्षपदावरून सुरू आहे., अशी टीका चंद्रकांत पाटील यांनी केली

काचेच्या घरात राहणाऱ्यांनी- यावेळी चंद्रकांत पाटील यांनी भाषणाच्या ओघात➪(पान २ वर)

परदेशात डॉक्टर बनून भारतात प्रॅक्टिस!

वर्धा /प्रतिनिधी- भारतात वैद्यकीय म्हणजे MBBS अभ्यासक्रमात प्रवेश मिळावा म्हणुन नीट परीक्षेची देशभरात लाखो विद्यार्थी तयारी करतात. त्यात यश मिळाले नाही तर भारतात ही पदवी घेणे शक्यच होत नाही. कारण ही किमान पात्रता परीक्षा अनिवार्य आहे. ती पास होऊनही

FMGE परीक्षेचे बनावट प्रमाणपत्र देणारी टोळी गजाआड; ५ जणांना अटक



गुण नसल्यास प्रवेश शक्य होत नाही. मग करायचे काय, असा प्रश्न पाल्यास डॉक्टर करायचे असे स्वप्न पाहणाऱ्या पालकांना पडतो. त्यातूनच विदेशात डॉक्टर होण्याचा मार्ग अनेक देशात उपलब्ध आहे. हजारो विद्यार्थी या अभ्यासक्रमासाठी रशिया व अन्य देशात आहेत. पण एक मेख आहेच. या सर्व विदेशातून डॉक्टर पदवी घेऊन येणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतात एक परीक्षा देणे आवश्यक आहे. ती उत्तीर्ण व्हावीच लागते. मात्र ही परीक्षा अत्यंत अवघड समजल्या जाते. यावरच हा बेकायदेशीर उपाय व झालेली कारवाईचा प्रकार.

५ आरोपीना अटक- महाराष्ट्र सायबर पोलीस शाखेने परदेशी वैद्यकीय पदवीधर विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली परीक्षा उत्तीर्ण नं करता वैद्यकीय नोंदणी मिळवून देणाऱ्या आंतरराज्य रॅकेट ➪(पान २ वर)

इंदूर-हैदराबाद व्हॉल्वो बस उलटली

नागपूर/प्रतिनिधी- जिल्ह्यातील सावनेर परिसरात मंगळवारी पहाटे इंदौरहून हैदराबादकडे जाणारी इंटरसिटी कंपनीची वॉल्वो ट्रॅव्हल्स उलटली. केळवद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील NH-47 वरील जैतपूर-सावली फाट्याजवळ हा अपघात घडला. ट्रकला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने ट्रॅव्हल्स रस्त्याच्या कडेला जाऊन पलटी झाली. या अपघातात सहा प्रवासी जखमी झाले असून सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. अपघातग्रस्त ट्रॅव्हल्समध्ये एकूण २९ प्रवासी होते. मंगळवारी पहाटे सुमारे २.१० वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. जखमींना केळवद पोलिसांच्या मदतीने खासगी रुग्णवाहिकेतून सावनेर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. तेथे त्यांच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. अपघातात सुरक्षित बचावलेल्या इतर प्रवाशांना दुसऱ्या हंस ट्रॅव्हल्समधून हैदराबादला रवाना करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच केळवद पोलीस आणि महामार्ग पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस निरीक्षक आशिष सिंह ठाकूर, महामार्ग पोलीस एपीआय श्रीकांत कोळी यांच्यासह पोलीस कर्मचारी आणि हितज्योती आधार फाउंडेशनच्या सदस्यांनी मदतकार्य केले. दरम्यान, अपघाताच्या कारणांचा पुढील तपास केळवद पोलीस करीत आहेत.





राज्यात पुन्हा महाभरतीचे संकेत!

जलसंपदा विभागातील ३९ हजार ७२२ पदांच्या आकृतीबंधाला मंजुरी

नागपूर/प्रतिनिधी- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील गैरप्रकार आणि भरती प्रक्रियेतील अनियमिततेच्या पार्श्वभूमीवर रखडलेल्या राज्यातील सरकारी नोकरभरतीला पुन्हा गती मिळण्याचे संकेत आहेत. परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासाठी सरकारने नियुक्त केलेल्या समितीचा प्राथमिक अहवाल जाहीर झाल्यानंतर विविध विभागांतील रिक्त पदे भरण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीच पुढील वर्षी एप्रिलपासून महाभरती करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार एप्रिलपासून विविध विभागांच्या पदभरतीच्या जाहिराती प्रसिद्ध होण्याची शक्यता आहे. राज्यात यंदा सुमारे एक लाख पदांची भरती करण्याचा सरकारचा मानस होता. मात्र, एमपीएससीच्या परीक्षांमधील गैरप्रकार उघडकीस आल्यानंतर भरती प्रक्रियेवर परिणाम झाला. त्यानंतर परीक्षा पद्धती अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी अपर मुख्य सचिव (सामान्य प्रशासन) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीने विविध राज्यांतील भरती प्रक्रियेचा अभ्यास करून प्राथमिक अहवाल सादर केला➪(पान २ वर)



सणांचा काळ संपला, आता UPI पेमेंटवर शुल्क

2000 पेक्षा जास्तच्या पेमेंटवर दुकानदाराला लागेल 0.4%

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- सणासुदीचा काळ संपला असून आता सर्वांचे लक्ष UPIच्या नव्या नियमांकडे आहे. उद्यापासून दुकानदाराला २,००० पेक्षा जास्त रक्कम UPIद्वारे स्वीकारल्यास 0.4% मर्चंट डिस्काउंट रेट (MDR), म्हणजेच शुल्क द्यावे लागू शकते. यापूर्वी NPCI हे नवीन शुल्क १५ ऑक्टोबरपासून लागू करणार होते; मात्र सणांमुळे ते पुढे ढकलण्यात आले होते. NPCIने सांगितले होते की, दिवाळीनंतर लगेच हे शुल्क लागू केले जाईल; मात्र तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. जर ग्राहक



दुकानदाराला २,००० पेक्षा जास्त रकमेचे UPI पेमेंट करतो, तर दुकानदाराला एकूण रकमेवर 0.4% MDR ➪(पान २ वर)

विद्यार्थी आत्महत्यांमध्ये देशात पहिल्या क्रमांकावर महाराष्ट्र

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दहा वर्षांत महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण दुप्पटीने वाढले असून, राज्य या गंभीर प्रश्नात देशात पहिल्या क्रमांकावर असल्याचे धक्कादायक वास्तव राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या अहवालातून समोर येत आहे. मानसिक आरोग्याविषयी समाजात अधिक मोकळेपणाने, शास्त्रीय दृष्टिकोनातून आणि संवेदनशीलतेने चर्चा होणे आवश्यक आहे.एनसीआरबीच्या अहवालानुसार २०१४ मध्ये देशात ८,०६८ विद्यार्थ्यांच्या आत्महत्या झाल्या होत्या. ती संख्या २०२४ मध्ये १४,४८८ वर पोहोचली आहे. म्हणजे दहा वर्षांत जवळपास ८० टक्के वाढ झाली आहे. त्यानंतरही अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या घटना घडल्या असून यात महाराष्ट्राची परिस्थिती चिंताजनक आहे. विद्यार्थी आत्महत्येमागे केवळ परीक्षेतील अपयश हे कारण नसल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. त्या अपयशामागे आधीपासून असलेला ताण, पालकांच्या अपेक्षा, सामाजिक तुलना, नातेसंबंधातील ➪(पान २ वर)

अजित पवार यांचा घातपात

मुंबई/प्रतिनिधी- अजित पवार यांचं २८ जानेवारीला अपघाती निधन झालं. ज्यानंतर संपूर्ण महाराष्ट्र हळहळला. अजित पवार यांचा अपघात नसून घातपात आहे असा दावा रोहित पवार यांनी केला होता. तसंच त्यांनी तीन ते चार वेळा पत्रकार परिषदही घेतली होती. आता राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रवक्ते उमेश पाटील यांनीही ➪(पान २ वर)





जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

दूर करूया अज्ञानाचा अंधकार, जपूया समतेचा विचार

दीपावली म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फटाक्यांचा आवाज आणि मिठायांचा गोडवा नव्हे. आपल्या संस्कृतीत प्रकाशाचा खरा अर्थ आहे...अज्ञानाचा, विषमतेचा आणि अन्यायाचा अंधकार



मुळापासून उखडून टाकणे.दारात लावलेली एक पणती बाहेरचा अंधार दूर करते, पण माणसाच्या अंतःकरणातील आणि समाजातील अंधार दूर करण्यासाठी लागते 'महामानवांच्या विचारांची मशाल'!छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेला स्वाभिमानाने जगण्याची ताकद दिली, महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणाची पहिली पणती पेटवून बहुजनांचे डोळे उघडले, राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी समतेचा पाया रचून वंचितांना हक्क मिळवून दिले, आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या रूपाने या देशाला स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्यायाचा चिरंतन प्रकाश दिला. या महामानवांनी पेरलेला समतेचा विचार जपणे आणि एक प्रगत, सुशिक्षित व सशक्त समाज घडवणे हीच आपली खरी दिवाळी आहे.

परंतु, यंदा सण साजरा करताना आपल्या मनाला एक खोल सल टोचत आहे.

निसर्गाच्या अवकृपेमुळे आणि दुष्काळाच्या भीषण सावटामुळे आपला अन्नदाता, आपला बळीराजा आज अत्यंत कठीण प्रसंगातून जात आहे. ज्याच्या कष्टावर, घामावर अख्ख्या जगाची भूक भागते, त्या बळीराजाच्या घरात दुष्काळामुळे अंधार पसरलेला असताना आपण उत्सव कसा साजरा करणार?

दारात दिव्यांची आरास मांडताना रानात डोळ्यांत अश्रू घेऊन आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्याची वेदना विसरता येणार नाही.

म्हणूनच, यंदाची दीपावली ही केवळ झगमगाटाची न ठरता संवेदनशीलतेची आणि सामाजिक जबाबदारीची ठरावी. फटाक्यांवर आणि दिखाऊपणावर होणारा अनावश्यक खर्च टाळूया. दुष्काळग्रस्त भागातील आपल्या शेतकरी बांधवांच्या पाठीशी शब्दांनीच नव्हे, तर प्रत्यक्ष मदतीने खंबीरपणे उभे राहूया. स्थानिक कुंभार, कष्टकरी आणि छोट्या व्यावसायिकांकडून वस्तू खरेदी करून त्यांच्या घरात समृद्धीची पहाट आणूया.

जेव्हा समाजातील शेवटच्या घटकाच्या चुलीवर अन्न शिदेल, मुलांच्या डोळ्यांत शिक्षणाची नवी उमेद चमकेल आणि संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला जगण्याचे बळ मिळेल, तेव्हाच देशात खऱ्या अर्थाने दीपावली उजळेल.

महामानवांच्या समतावादी विचारांची ज्योत मनात तेवत ठेवत, बळीराजाच्या अस्तित्वासाठी एकत्र येऊया! तमाम नागरिक, शेतकरी बांधव आणि स्नेहीजनांना दीपावलीच्या अत्यंत संवेदनशील, पुरोगामी आणि मंगलमय सदिच्छा!



- गुणवंत देवपारे
(उद्योजक, पिरॅमिड ग्रुप ऑफ कंपनीज संस्थापक, संकल्प फाउंडेशन)

मोरबागेतील गोडाउन चोरीसह बडनेऱ्यातील जबरी चोरीचा उलगडा



अमरावती/प्रतिनिधीः- शहरातील दोन वेगवेगळ्या चोरीच्या घटनांचा छडा लावण्यात अमरावती शहर गुन्हे शाखेला यश आले आहे. सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोरबाग परिसरातील दोन गोडाउनमध्ये झालेल्या चोरीप्रकरणी एका विधी संघर्षग्रस्त बालकाला चोरीच्या मुद्देमालासह ताब्यात घेण्यात आले. तर बडनेरा पोलीस ठाण्यात दाखल जबरी चोरीच्या गुन्ह्यातील २० वर्षीय आरोपीला चोरीच्या आयफोनसह पकडण्यात आले. गुन्हे शाखेच्या या दुहेरी कारवाईमुळे दोन गुन्ह्यांचा तपास पुढे सरकला आहे.

बडनेरा पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा समांतर तपास गुन्हे शाखेचे पथक पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वात करीत होते. दरम्यान, गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रतिक विनोद कैथवास (वय २०, रा. माता फैल, बडनेरा) हा चोरीचा मोबाईल विक्रीसाठी १० नोव्हेंबर रोजी फेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ऑक्सिजन पार्कजवळ येणार होता.या माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने परिसरात सापळा रचला. यावेळी संशयित प्रतिक पायी येताना दिसताच पथकाने त्याला ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने काही दिवसांपूर्वी बडनेरा हद्दीतील गोविंद महाराज मंदिराजवळ एका व्यक्तीचा मोबाईल साथीदारांसह जबरीने हिसकावून घेतल्याची माहिती दिली. त्याच्याकडून गुन्ह्यातील ३० हजार रुपये किमतीचा पांढऱ्या रंगाचा ॲपल कंपनीचा आयफोन जप्त करण्यात आला. पुढील तपासासाठी आरोपी व मुद्देमाल बडनेरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. दुसरीकडे, १० नोव्हेंबर रोजी नियंत्रण कक्षातून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांना सिटी कोतवाली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मोरबाग परिसरातील जुम्मनशाह बाबा दर्ग्याजवळ असलेल्या दोन गोडाउनमध्ये रात्रीच्या सुमारास चोरी झाल्याची माहिती मिळाली. माहिती मिळताच गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून संशयिताची ओळख पटविण्यात आली. संबंधित व्यक्ती विधी संघर्षग्रस्त बालक असल्याचे निष्पन्न झाले. पथकाकडून त्याचा परिसरात शोध सुरू असताना तो खऱ्री मार्केटमधील एका बंद दुकानाचा आधार घेऊन लपून बसल्याची माहिती गुप्त बातमीदाराकडून मिळाली. त्यानुसार पथकाने तेथे सापळा रचून तपासणी केली असता संबंधित बालक आढळून आले. त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता चोरीच्या मुद्देमालापैकी काही साहित्य मिळून आले. चौकशीदरम्यान त्याने चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्याच्याकडून १७ हजार ४७० रुपये रोख, ७५० रुपये किमतीचे चांदीच्या रंगाचे नाणे आणि १०० रुपये किमतीचे लालसर रंगाचे नाणे, असा एकूण १८ हजार ९२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपासासाठी बालकाला सिटी कोतवाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे तसेच सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर व दिनेश दहातोंडे यांच्या नेतृत्वात सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ आडे, उपनिरीक्षक गजानन सोनुने, राहुल महाजन, सचिन माकोडे यांच्यासह गुन्हे शाखेच्या अधिकारी व अंमलदारांनी या कारवाईत सहभाग घेतला.

गुन्हे शाखेची दुहेरी कारवाई; २० वर्षीय आरोपीसह विधी संघर्षग्रस्त बालक ताब्यात

पान १ व १० वरून

फडणवीसांनी डोळे वटारले

सतेज पाटील यांच्या मालमत्तेच्या मुद्द्याला हात घातला. 'तुम्ही काचेच्या घरात राहता. दुसऱ्याच्या घरावर दगड मारू नयेत. तुमची मालमत्ता जाहीर करा. ती कुठून आली ते सांगा,' असं आव्हान त्यांनी दिले. तुमच्यात धमक असेल तर मुख्यमंत्र्यांच्या केबिनमध्ये कामं घेऊन जाऊ नका. राहुल गांधींकडून काम करुन घ्या, असे चंद्रकांत पाटील म्हणाले.

डी. वाय. पाटलांवरही टीका- मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाषणात दिवंगत नेते डॉ. डी. वाय. पाटील यांचा संदर्भ घेत टीका केली. डी. वाय. पाटील हे स्कूटरवरून फिरायचे, असा उल्लेख करून त्यांनी सतेज पाटील यांच्या संपत्तीवर प्रश्न उपस्थित केला. गोकुळचा वापर दूध उत्पादकांपेक्षा स्वतःच्या फायद्यासाठी होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

फडणवीस तेल लावलेला पैलवान- मुख्यमंत्र्यांनी मला शिक्षण मंत्री म्हणून आदेश द्यावा सतेज पाटील संपून जाईल. फडणवीस तेल लावलेला पैलवान आहे. भल्या भल्यांना सापडला नाही. फडणवीसांच्या नादाला लागू नका, मुंगी होऊन साखर खायची असते, असा सल्ला चंद्रकांत पाटील यांनी बंटी पाटील यांना उद्देशून दिला.

बंटी म्हणजेच इंडिया आघाडी- महाविकास आघाडी म्हणजे केवळ 'बंटी पाटील' अशी अवस्था आहे. तिथे उद्धव ठाकरेंची शिवसेना किंवा शरद पवारांची राष्ट्रवादी कुठेही सोबत दिसत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला.

काँग्रेसकडून घटना पायदळी- महायुतीवर लोकशाही पायदळी तुडवल्याचा आरोप सतेज पाटील यांनी केला होता. त्याला उत्तर देताना चंद्रकांत पाटील म्हणाले, आम्ही गोकुळवर प्रशासक येऊ नये आणि पुन्हा निवडणूक लागू नये म्हणून नियमानुसार अध्यादेश काढला. ज्याला न्यायालयानेही मान्यता दिली. पण आधी घटना पायदळी कुणी तुडवली? इंदिरा गांधींनी अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निकालानंतर स्वतःची खासदारकी आणि पंतप्रधानपद वाचवण्यासाठी देशभरातील २० लाख लोकांना तुरुंगात डांबले. माझी दिवंगत पत्नी विद्या ठाकूर केवळ आठवीत असताना तिचे आई, वडील, बहीण, भाऊ असे चारही जण १९ महिने तुरुंगात होते. आठवीतली मुलगी बिनखांबी गणेश मंदिराजवळ ठाकूर कंपनीचे दुकान चालवत आंदोलकांच्या घरी डबे पोहोचवत होती. अशी दडपशाही करणाऱ्या काँग्रेसने आम्हाला घटना आणि लोकशाही शिकवू नये, असा घणाघात त्यांनी केला.

सोनिया गांधींना दम- २०१९ मधील विधानसभा निवडणुकीनंतर सत्तास्थापनेचा संदर्भ देत चंद्रकांत पाटील यांनी सतेज पाटलांवर आरोप केले. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्यासाठी सोनिया गांधी यांच्यावर दबाव आणल्याचा दावा त्यांनी केला. यासंदर्भात कॉल रेकॉर्डिंग देऊ शकतो, असंही ते म्हणाले.

' धमक्या देऊ नका '

किती चुकीच्या पद्धतीने वापरायची हे मुश्रीफांनी दाखवून दिले. गोकुळ एकटे नाही तर अध्यादेश काढून राज्यात कुठलीही सहकारी संस्था ताब्यात घेतली जाईल. लोकांनी रस्त्यावर उतरून निषेध केला आहे. आता न्यायालयीन लढाई आम्ही लढू असंही सतेज पाटील यांनी सांगितले. दरम्यान, निवडणूक २०२७ ची असो वा २०२९ ची...मी अद्याप कोणती निवडणूक लढवायची हा निर्णय घेतला नाही. हा निर्णय माझ्या हातात आहे. जेव्हा लढाई लढायची तेव्हा सारिपाट मांडला जाईल आणि त्या सारिपाटात कोणते डाव खेळायचे हे मला चांगले माहिती आहे. महाराष्ट्रासाठी मी बंटी पाटील राहणे महत्त्वाचे आहे. लोकांच्या हृदयात मी बंटी पाटील असणे पसंत करतो. साहेब म्हणून नसले तरी चालेल असा टोला सतेज पाटील यांनी चंद्रकांत पाटलांना लगावला.

२००० पेक्षा जास्तच्या

शुल्क द्यावे लागेल.जर ग्राहक ७५,००० किंवा त्याहून अधिक रकमेचे मोठे पेमेंट करतो, तर टक्केवारीऐवजी कमाल ३०० इतके निश्चित शुल्क लागू होईल. जर ग्राहक रेल्वे, टेलिकॉम, विमा किंवा इंधनासाठी २,००० पेक्षा जास्त पेमेंट करतो, तर प्रत्येक व्यवहारासाठी ५ इतके निश्चित शुल्क आकारले जाईल.

उदाहरणाद्वारे किती पैसे कापले जातील ते समजून घेऊया
२,५०० च्या पेमेंटवर: दुकानदाराचे १० कापले जातील.
५,००० च्या पेमेंटवर: दुकानदाराचे २० कापले जातील.
१०,००० च्या पेमेंटवर: दुकानदाराचे ४० कापले जातील.
७५,००० किंवा त्याहून मोठ्या पेमेंटवर: जास्तीत जास्त ३००च कापले जातील. (हे पैसे दुकानदाराच्या खात्यातून कापले जातील, ग्राहकाला वेगळे पैसे देण्याची गरज नाही.)

निर्णय दिवाळीपर्यंत का लांबवण्यात आला होता?

दिवाळीदरम्यान देशभरातील बाजारपेठांमध्ये कपडे, इलेक्ट्रॉनिक्स, दागिने आणि इतर वस्तूंची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. अशा वेळी डिजिटल पेमेंट वाढते. व्यावसायिक संघटना आणि पेमेंट कंपन्यांचे मत होते की, सणासुदीच्या काळात नवीन नियम लागू केल्यास दुकानांवरील पेमेंट व्यवहारांमध्ये अडथळे येऊ शकतात. ही बाब लक्षात घेऊन NPCI ने दिवाळीपर्यंत हा निर्णय पुढे ढकलला आहे. सरकारच्या या निर्णयाला देशभरातील व्यावसायिकांनी आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांनी विरोध केला होता. हा विरोध दोन पातळ्यांवर झाला. विरोधी पक्षांच्या नेत्यांनी राजकीय परिणाम आणि सर्वसामान्यांवर होणाऱ्या परिणामांबाबत प्रश्न उपस्थित केले, तर व्यावसायिक संघटनांनी खर्च वाढण्याची आणि ग्राहकांवर अतिरिक्त भार पडण्याची शक्यता व्यक्त केली. त्यांचे म्हणणे होते की, यामुळे छोट्या व्यावसायिकांचे अधिक नुकसान होईल.

विद्यार्थी आत्महत्यांमध्ये देशात

संघर्ष, आत्मविश्वासाचा अभाव, एकटेपणा किंवा मानसिक आरोग्याची समस्या असू शकते. म्हणून आत्महत्या प्रतिबंधाची सुरुवात संकटाच्या क्षणी नव्हे, तर संकटाची पूर्वलक्षणे ओळखण्यापासून झाली पाहिजे.

इतर कारणांच्या मुळाशी जाण्याची गरज- कौटुंबिक समस्या, प्रेमसंबंध, आजारपण, करिअर व व्यावसायिक समस्या, एकटेपणाची भावना, हिंसा किंवा अत्याचार, मानसिक विकार, व्यसन आणि आर्थिक नुकसान यांसारखे अनेक घटक आहेत. यातच आता नव्याने अपेक्षित वय होऊनही लग्न होऊ शकत नाही, वैवाहिक नातेसंबंधातील अडचणी हेही एक महत्त्वाचे कारण ठरत आहे.

शिक्षक मनोमित्र गरजेचा- जागतिक आरोग्य संघटनेने 'अनुभवांचे आवाज ऐका, वास्तव बदला,' असा संदेश दिला आहे. विद्यार्थ्यांमधील वर्तन बदल, अभ्यासात घट, एकटेपणा, चिडचिड, सतत निराश बोलणे हे शिक्षकांनी ओळखून त्यांना समुपदेशकाकडे पाठवणे आवश्यक आहे. यासाठी 'शिक्षक मनोमित्र' संकल्पना प्रत्येक शाळेत राबवण्याची गरज आहे. विद्यार्थी तणावात असतील तर त्यांच्या भावना समजून घेणे, कोणताही पूर्वग्रह न ठेवता संवाद साधणे, त्यांना एकाकी पडू न देणे आणि गरजेनुसार मानसोपचारतज्ज्ञांची मदत मिळवून देणे गरजेचे असते. आपुलकीचा आधार, समजूतदार संवाद आणि सुरक्षिततेची हमी मिळाल्यास त्यातून मार्ग निघेल. - डॉ. अनिमिष चव्हाण, मानसोपचारतज्ज्ञ सातारादेशात अव्वल; धक्कादायक आकडेवारीने चिंता वाढली!

अजित पवार यांचा

आता अजित पवार यांचा अपघात नाही तर घातपात आहे असं म्हटलं आहे. अजितदादांचा अपघात आहे की घातपात आहे याविषयी सातत्याने मांडणी केली जाते. मला तर असं वाटतं की हा घातपातच आहे. का वाटतं ? वगैरे खोलात गेलं तर बरीच चर्चा झाली आहे. पण मनातून माझं गट फिलिंग मला हे सांगतं आहे की हा अपघात नाही तर घातपात आहे. ज्या कुणी हे घडवलंय त्याला देव माफ करणार नाही. दादा कदाचित माफ करतील. पण ज्या कुणी घडवलं त्याला महाराष्ट्र माफ करणार नाही. योग्य वेळी मी याबाबत बोलेन असं उमेश पाटील यांनी म्हटलं आहे. शिवसेना शिंदे गटाचे नेते रामदास कदम यांनी जे वक्तव्य केलं आहे, त्याबाबतचे पुरावे त्यांनी द्यावेत. हवेत त्यांनी बोलू नये असेही पाटील म्हणाले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी काटेवाडी या ठिकाणी येऊन अजित पवारांच्या स्मृती स्थळाचं दर्शन घेतलं. त्यानंतर त्यांनी एबीपी माझाशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी हे वक्तव्य केलं आहे.

रामदास कदम यांनी सुनील तटकरेंवर टीका केली होती. ते म्हणाले होते, 'हा अंतुले साहेबांचा पीए होता, अंतुले साहेबांना यानेच संपवलं. जो जो माणूस तटकरेला जवळ करतो, त्यालाच संपवण्याचं काम तो करतोय. त्याला स्वतःला उपमुख्यमंत्री व्हायचं होतं हे मी ऐकतोय. मग अजितदादांच्या घातपातामागे याचाही हात होता का? या दिशेने तपास करावा. याची राक्षसी महत्वाकांक्षा आहेत. त्या साध्य करण्यासाठी हा काहीही करू शकतो. दरम्यान, रामदास कदमांनी केलेले आरोप सुनील तटकरे यांनी फेटाळलेत. आपल्यावर करण्यात आलेले आरोप खोटे आहेत असं स्पष्टीकरण तटकरेंनी दिलं. पत्रकार परिषद घेऊन उत्तर देऊ असं तटकरेंनी म्हटलं आहे. कदमांच्या वक्तव्यावर राष्ट्रवादीचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी उत्तर दिलं. ते म्हणाले की, या आधीही रामदास कदम यांनी तटकरे यांच्यावर आरोप केले होते. दरम्यान आता उमेश पाटील यांनीही अजित पवारांचा घातपातच होता असं म्हटलं आहे.

परदेशात डॉक्टर बनून

उघडकीस आणले आहे. त्यात २ आरोपीना अटक झाली. आता या प्रकरणात अटक झालेल्या आरोपीची संख्या ५ वर पोहचली आहे. खाते प्रमुख डीआयजी अजय बन्सल यांनी माध्यमांना सांगितले की तांत्रिक तपास व डिजिटल पुरावा या आधारे ही फसवणूक उजेडात आली आहे.

आरोपी असे आहेत- अटक करण्यात आलेल्यात एक आरोपी शिवम राकेश हा उत्तर प्रदेशातील बुलंदशहरचा असून तो तिथे स्वतःचे रुग्णालय चालवितो. त्याच्याकडे ऐं ची पदवी आहे. तोच या फसवणूकीचा मास्टर माईंड असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्याने ३० पेक्षा अधिक लोकांना बनावट प्रमाणपत्रे दिली आहे. दुसरा आरोपी धर्मेंद्र लक्ष्मण सिंग हा भोपाळचा रहिवासी आहे.

असा आहे निर्बंध- नियमानुसार विदेशातून वैद्यकीय पदवी घेऊन भारतात येणाऱ्या विद्यार्थ्यांना नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन इन मेडिकल सायन्सेस या संस्थेतर्फे आयोजित होणारी इएफ ही चाचणी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. त्यानंतरच या विदेशी पदवीधरक डॉक्टरांना भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्याची नोंदणी मिळू शकते. मात्र या टोळीने अशया विद्यार्थ्यांना बनावट प्रमाणपत्रे आणि इतर कागदपत्रे पुरवून नोंदणी मिळवून दिली, असा ठपका ठेवण्यात आला आहे.

FMGE परीक्षा काय- ही परीक्षा अनिवार्य आहे. फॉरेन मेडिकल ग्रॅज्युएट एक्झाम ही एक पात्रता परीक्षा आहे. रशिया, चीन, फिलिपईन्स, युक्रेन व अन्य देशातून एँए किंवा समकक्ष पदवी घेऊन भारतात येणाऱ्या विद्यार्थ्यांना ही परीक्षा अनिवार्य आहे. वर्षातून दोनदा ती घेतल्या जाते. विदेशी वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा भारतीय मानकनुसार आहे अथवा नाही हे तपासण्याचा उद्देश या चाचणी परीक्षेमागे असतो. ती उत्तीर्ण झाल्यावर या पदवीधरास वैद्यकीय परिषदेत नोंदणी मिळते. ही अशी नोंदणी झाली असेल तरच भारतात रुग्णालयात काम करण्याची किंवा स्वतः प्रॅक्टिस करण्याची कायदेशीर परवानगी मिळते.

राज्यात पुन्हा महाभरतीचे

आहे. त्यामुळे भरती प्रक्रियेतील सुधारणांचा मार्ग मोकळा होण्याबरोबरच रखडलेल्या पदभरतीला चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

जलसंपदा विभागाची जाहिरात येणार- दरम्यान, जलसंपदा विभागातील ३९ हजार ७२२ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. वाढत्या सिंचन क्षेत्राच्या व्यवस्थापनासाठी ११० नवीन सिंचन शाखा निर्माण करण्यासही मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे जलसंपदा विभागातील मनुष्यबळ वाढविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. नदीजोड प्रकल्पासाठी मुख्य अभियंता (स्थापत्य) हे पद निर्माण करण्यासह पाच महामंडळांसाठी भूसंपादन, कृषी आणि सामाजिक बदल तज्ज्ञांची कार्यकारी अभियंता दर्जाची १५ पदे निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच सिंचन सहायक हे नवीन पदही निर्माण करण्यात येणार आहे.

रामपुरी कॅम्पमध्ये बांधकामाचा

पूर्ण झाले असून त्यांना जोडणारा वरचा बीम टाकण्याचे काम मंगळवारी सुरू होते. यासाठी पिल्लरच्या वरच्या बाजूला सेंट्रिंग आणि मजुरांना काम करता यावे म्हणून चैली उभारण्यात आली होती. बीममध्ये काँक्रीट भरण्याचे काम अंतिम टप्प्यात असतानाच अचानक संपूर्ण रचना कोसळली. क्षणातच कामाच्या ठिकाणी गोंधळ उडाला. चैलीवर काम करणारे चार मजूर काँक्रीट आणि सेंट्रिंगच्या ढिगाऱ्यात अडकले. इतर मजुरांनी आणि नागरिकांनी तत्काळ मदतकार्य सुरू करून तिघांना बाहेर काढले. मात्र, एका मजुराचा पाय मोठ्या प्रमाणात मलब्याखाली अडकल्याने त्याला बाहेर काढणे कठीण झाले.घटनेची माहिती मिळताच गाडगेनगरचे ठाणेदार गोरखनाथ जाधव पथकासह घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. तसेच जेसीबीच्या साहाय्याने कोसळलेला मलबा हटविण्यात आला. त्यानंतर अडकलेल्या मजुराला बाहेर काढण्यात यश आले. चारही जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. बांधकाम सुरू असताना बीमची रचना नेमकी कशामुळे कोसळली, याबाबत तपास होणे आवश्यक आहे.

क्षुल्लक वादातून प्राणघातक

उडाली. हल्ला करून आरोपी तात्काळ तेथून पळून गेले. आसपासच्या लोकांनी तातडीने जखमी उमेश गोस्वामी यांना इर्विन रुग्णालयात पोहोचवले. तिथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले आहे. घटनेची माहिती मिळताच राजापेठ पोलिसांचे पथक घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी घटना स्थळावरून पुरावे गोळा केले असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत आहेत. आरोपींची ओळख पटवून त्यांना अटक करण्यासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत. राजापेठ पोलिसांनी या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.

चाकूचा धाक दाखवून

पेमेंट केले. मात्र, त्यानंतरही त्यांचा गोंधळ थांबला नाही. मॅनेजरला गल्ल्यापासून बाजूला ढकलून सर्व्हिस टेबलवरील चाकू उचलण्यात आला. चाकूचा धाक दाखवून गल्ल्यातील सुमारे १ हजार ५०० रुपये जबरीने काढून घेतल्याचा आरोप आहे. यानंतर बारमधील साहित्याची तोडफोड करण्यात आली. तसेच इतर कर्मचाऱ्यांनाही शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. या प्रकारामुळे बारमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

आरोहित पवार यांची

ग्रस्त शेतकरी कुटुंबाला एक लाख रुपये मदत व व शेतकरी मजूर कुटुंबाला पंचवीस हजार रुपये मदत देण्याची मागणी आमदार पवार यांनी प्रशासनाकडे केली. यावेळी नांदगाव न.प. चे गटनेते प्रकाश मारोटकर, जिल्हाध्यक्ष अनिल जलमकर, तालुका अध्यक्ष सचिन रिठे, रोशन कडू ,डॉ हेमंत देशमुख, किशोर गुलालकरी ,श्रीकृष्ण रंगाचार्य ,संगीता ठाकरे ,मोहन चोरे ,मनोज गावंडे ,रितेश शेळके ,विशाल रिठे ,विनोद राऊत ,प्रवीण रिठे ,राहुल भाकरे ,स्वप्निल खडसे ,जयश्री बावणे ,गणेश राय यांचे सह अनेक शेतकरी उपस्थित होते.

धोत्रा ते सालोरा रोडवर

आठ महिने उलटूनही आश्वासने हवेतच-

मोझरी ते जळका शहापूर मार्गाचे नूतनीकरण, दुपदरीकरण आणि दुरुस्तीच्या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे, पुरुषोत्तम मेश्राम आणि चंदू वानखडे यांनी धोत्रा गावात बेमुदत अन्नत्याग उपोषण केले होते. त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन उपकार्यकारी अभियंता विनोद बोरसे यांनी दोन महिन्यांत रस्त्याची दुरुस्ती, रिफ्लेक्टर लावणे आणि झाडेझुडपे काढण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, तब्बल आठ महिने उलटूनही विभागाने कोणतेही काम केले नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या या निष्काळजीपणामुळेच आजचा अपघात घडल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी केला असून, दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सांगळुद प्रवाशी निवाऱ्याच्या

विलास पटोकार करीत आहे. ह्या व्यक्तीची माहिती कोणाला असल्यास त्यांनी येवदा पोलिस स्टेशनला तातडीने द्यावी असे आवाहन ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर यांनी नागरिकांना केले आहे.

शेतातून २ लाखाचा ७

शेतात फेरफटका मारण्यासाठी गेले असता बागेतील मधोमध असलेल्या झाडांमधून ७ टन एवढा संत्रा अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे उघडकीस झाले. घडलेल्या या चोरीच्या घटनेमुळे शेतकऱ्याचे स्वप्नच धुळीस मिळाले. २ एकरातील तोडीवर आलेल्या १३ टन संत्र्यापैकी अंदाजे २ लाख रुपये किमतीचा ७ टन संत्रा कुणीतरी अज्ञात चोरट्यानी चोरून नेल्याबाबतची तक्रार आज १० नोव्हेंबर रोजी युवा शेतकरी भूषण मुंदाने यांनी तिवसा पोलिसांत दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे.

निक्कू कचरे हत्याकांडाचा

वार करून त्याला ठार केले. या प्रकरणी पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल केला होता.घटनेपासून मुख्य आरोपी अश्विन उर्फ गुल्या पहाडण (रा. ग्राम मासोद) फरार झाला होता. पोलीस त्याचा शोध घेत होते.गुन्हे शाखेच्या पथकाला गोपनीय सूत्रांकडून माहिती मिळाली की, आरोपी बडनेरा रेल्वे स्टेशनवरून ट्रेन पकडून पळून जाण्याच्या तयारीत आहे. माहिती मिळताच पोलीस पथकाने तातडीने बडनेरा स्टेशन गाठून घेराबंदी केली आणि प्लॅटफॉर्मवरून आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीला पुढील कायदेशीर कारवाई आणि तपासासाठी गाडगे नगर पोलिसांकडे सोपवण्यात आले. या प्रकरणात पोलिसांनी आधीच आरोपी आरोपी राजू शरद काळे (रा.महेंद्र कॉलनी) ,विशाल श्याम बहादुर यादव (रा.अमर नगर), भूषण राजेश टाले(रा.माडवा झोपडपट्टी) यांना अटक केली होती.

झोपडपट्टीतील बांधवांसोबत आमदार

विनंती केली. यावर आमदार वानखडे यांनी योग्य जागेची पाहणी करून तेथे आवश्यक व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या उपक्रमामुळे वंचित व भटक्या समाजातील कुटुंबांच्या चेहऱ्यावर दिवाळीचा आनंद पाहायला मिळाला.

याप्रसंगी विदर्भ संयोजक दिनेश सूर्यवंशी, ओबीसी प्रदेश सदस्य जयंत आमले, जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप गौरखेडे, माजी जिल्हा परिषद सदस्य शरद मोहोळ, डॉ. प्रकाश कनेर, माजी सभापती विजुभाऊ मडघे, सोपान निस्ताने, मंगेश कथिलकर, संजय टेकाडे, अनिल भोपळे, सागर माहोरे, गौरव मडघे, निखिल टेकाडे, सुनील ठाकरे, प्रदीप ठाकरे, श्रीकृष्ण घाटोडे, प्रशांत टेकाडे, डॉ. मोहोड, रावसाहेब काळमेघ, इकबाल हुसेन, राजेश खडसे, डॉ. अरविंद मोहड, अमित ठाकरे, रोशन खरबडे व प्रवीण पुंड यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

सणासुदीच्या गर्दीने कारंजा बसस्थानकात गोंधळ ; दुचाकी पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर!

■ प्रतिनिधी | कारंजा ■

सणासुदीचे दिवस असल्याने कारंजा बसस्थानकात सध्या प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बाहेरगावी जाणाऱ्या तसेच गावी परतणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढल्याने बसस्थानक परिसरात वाहनांचीही मोठी वर्दळ दिसून येत आहे. मात्र, या वाढत्या गर्दीच्या तुलनेत दुचाकी पार्किंगची पुरेशी व्यवस्था नसल्याने बसस्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात गोंधळ निर्माण होत आहे.



बसने प्रवास करणाऱ्या पाहुण्यांना, नातेवाइकांना किंवा कुटुंबातील सदस्यांना सोडण्यासाठी अनेक नागरिक दुचाकीने बसस्थानकात येतात. मात्र, प्रवाशांना बसमध्ये बसवून निरोप देण्यासाठी काही वेळ थांबायचे असल्यास दुचाकी उभी करायची कुठे, असा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होतो. अधिकृत पार्किंगची योग्य व्यवस्था नसल्यामुळे नागरिक उपलब्ध असलेल्या मोकळ्या जागेत किंवा रस्त्याच्या कडेला दुचाकी उभ्या करतात. परिणामी बसस्थानक परिसरातील वाहतुकीला अडथळा निर्माण होऊन प्रवासी, वाहनधारक तसेच पादचाऱ्यांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे, बसस्थानकाच्या बाजूला दुचाकी उभ्या करण्यासाठी मोकळी जागा उपलब्ध असल्याचे दिसून येते. मात्र, या जागेला बसस्थानक प्रशासनाकडून तारेची जाळी लावून कुंपण करण्यात आले आहे. त्यामुळे उपलब्ध जागेचा पार्किंगसाठी उपयोग होत नसल्याने नागरिकांना वाहने उभी करण्यासाठी पर्यायी जागा शोधावी लागत आहे. एकीकडे पार्किंगसाठी जागा उपलब्ध असताना ती वापरात का आणली जात नाही, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.दुसरीकडे, बसस्थानक परिसरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी रस्त्यावर उभ्या असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करीत आहेत. वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांवर कारवाई करणे आवश्यक असले, तरी दुचाकी पार्किंगची अधिकृत व्यवस्था उपलब्ध नसताना प्रवाशांना सोडण्यासाठी आलेल्या नागरिकांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. पार्किंगची सोय नसल्यामुळे नागरिकांनी वाहने कुठे उभी करावीत आणि त्याचवेळी दंडात्मक कारवाईपासून कसे वाचावे, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

बसस्थानकात प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता केवळ वाहतूक नियंत्रण आणि दंडात्मक कारवाई करून हा प्रश्न सुटणारा नाही.

अखेर 'ते' ट्रॅक्टर शेतकऱ्याच्या हवाली

प्रहार सेवक श्याम पवार यांचा पाठपुरावा!

आ. बच्चू कडू यांच्या हस्तक्षेपानंतर फायनान्स कंपनीला धरले धारेवर!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

दिवाळी सणाच्या तोंडावर फायनान्स कंपनीने जबरदस्तीने ओढून नेलेला ट्रॅक्टर प्रहार संघटनेचे प्रमुख आ. बच्चू कडू यांच्या हस्तक्षेपानंतर शेतकऱ्याला परत मिळाला आहे. त्यामुळे चौसाळा येथील शेतकरी कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.

तालुक्यातील चौसाळा येथील शेतकरी राम नरसिंग राठोड हे अल्पभूधारक शेतकरी आहेत. शेतीच्या कामासाठी त्यांनी टिअर फायनान्स कंपनीकडून कर्ज घेऊन ट्रॅक्टर घेतला होता. हप्ता थकल्यामुळे हातात पैसा नसल्याने एक हप्ता थकला होता. याचा फायदा घेत फायनान्स कंपनीच्या वसुली एजंटांनी कोणतीही पूर्वसूचना न देता, शेतातूनच ट्रॅक्टर ओढून नेला.

दिवाळीच्या तोंडावर ट्रॅक्टर गेल्याने कुटुंबाची दिवाळी अंधारात जाण्याचा प्रसंग उभा ठाकला होता.



माहिती मिळताच आ. बच्चू कडू यांनी तत्काळ जिल्हाधिकाऱ्यांना फोन करून या प्रकरणाची माहिती दिली व शेतकऱ्यावर होत असलेल्या अन्यायाकडे लक्ष वेधले. तसेच त्यांनी टिअर फायनान्स कंपनीच्या अधिकाऱ्यांनाही फोन करून शेतकऱ्याचा ट्रॅक्टर तात्काळ सोडण्याच्या सूचना केल्या.

प्रहार संघटनेचे तालुका अध्यक्ष श्याम पवार यांना चौसाळा येथील पदाधिकारी फुल भगत यांनी याबाबत माहिती दिली असता त्यांनी तात्काळ संघटनेचे प्रमुख आ. बच्चू कडू यांना या शेतकऱ्याबाबत माहिती दिली. माहिती मिळताच आमदार कडू यांनी जिल्हाधिकाऱ्यांना या बाबीची सूचना देत फायनान्स कंपनीला सुद्धा फोनवरून उपरोक्त शेतकऱ्याचा ट्रॅक्टर सोडवण्यासंदर्भात सूचना केली होती.

आ. कडू यांच्या हस्तक्षेपानंतर फायनान्स कंपनीने तो ट्रॅक्टर संबंधित शेतकऱ्याकडून काही लेखी अटींवर सोडून दिला आहे. ट्रॅक्टर परत मिळाल्याने राम राठोड यांच्या कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. दिवाळीपूर्वी ट्रॅक्टर परत मिळाल्याने आता रब्बी हंगामातील कामे वेळेत करता येणार आहेत. फायनान्स कंपन्यांनी वसुलीसाठी दादागिरी करू नये, शेतकऱ्यांना नोटीस देऊन कायदेशीर मार्गाने वसुली करावी, अशी मागणी यावेळी प्रहार संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

सांस्कृतिक दीपोत्सव उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने दिवाळी संध्यानिमित्त केकतउमरा येथे सांस्कृतिक दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात चेतन सेवांकुर दिव्यांग ऑर्केस्ट्राच्या कलाकारांसह स्थानिक कलावंतांनी विविध कलाविष्कार सादर करून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली.

कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सांस्कृतिक कार्य विभागाचे सहाय्यक संचालक संदीप बलखंडे, छत्रपती संभाजीनगर येथील विभागाचे समन्वयक सचिन पाईकराव, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे निवेदक तथा कवी प्रा. भास्कर पाईकराव, चेतन सेवांकुर दिव्यांग ऑर्केस्ट्राचे संचालक पांडुरंग उचितकर आणि रुपेश पुंडगे, युवा कलाकार प्रदीप पट्टेबहादूर, पत्रकार महादेव सुडके आदी उपस्थित होते.

या सांस्कृतिक दीपोत्सवाच्या माध्यमातून दिव्यांग कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. चेतन सेवांकुरच्या दिव्यांग कलाकारांनी सुरेल गायनातून आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले. त्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी भरभरून प्रतिसाद दिला.

अडोळी येथील पाझर तलावावर रात्री ९ वाजता अवैध पेट्रोल इंजिन जप्त

■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथून जवळच असलेल्या अडोळी येथे पाझर तलाव असून या तलावाच्या शेजारीच गावाच्या पिण्याच्या पाण्यासाठी दोन विहीरी असून या विहीरीचे पाणीपुरवठा अंतर्गत पिण्याच्या पाण्यासाठी गावांसाठी पाईप लाईन आहे.

परंतु या वर्षी पाऊस अत्यंत कमी झाल्याने संपूर्ण जिल्हा हा पाणी टंचाईने त्रस्त आहे.शिवाय या पाझर तलावाचे जनावरासाठी देखील पाणी साठवण असते.जिल्ह्यात पाणी टंचाई लक्षात घेता जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाने शासकीय तलाव,पाझर तलाव व खाजगी विहीरवर देखील उपसा करण्यासाठी बंदी घातली आहे.परंतु विज वितरण कंपनीने अवैधरित्या असलेली कनेक्शन तोडलेले नाही.विज वितरण कंपनीने अवैधरित्या असलेली



कनेक्शन तोडण्यात खंडीत करावी..म्हणून अडोळी येथे दि.९ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजता मोका पहाणी केली असता सदर पाझर तलावावर एक अवैधरित्या पेट्रोल इंजिन आढळून आल्याने कारवाई करून पोलीस स्टेशन ग्रामीण येथे जप्त करण्यात आले.

यावेळी कनिष्ठ अभियंता राजू इंगळे, कर्तव्य दक्ष आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघन, पोलीस कॉन्स्टेबल जे.डी.राजूरकर,एस.पी.नंदावाले, जलसुरक्ष सुमेध खंडारे व दोन मजूरांचा समावेश होता.याअगोदर सुद्धा दिनांक ८ नोव्हेंबर २०२६ रोजी

मौजे अडोळी तालुका वाशिम येथील पाझर तलावाची मोका पाहणी केली असता सदर तलावर एक मोटार पंप पाच एचपी चालू स्थितीत आढळला व अवैध विद्युत केबल पाईप व स्टार्टर तलावाच्या परिसरात आढळून आले तथापि सदर मोटर पंप व अवैध विद्युत केबल व चार पाईप व स्टार्टर जप्त करण्यात आले सदर जप्त केलेले साहित्य ग्रामपंचायत कार्यालय अडोळी तालुका वाशिम येथे सुपूर्द करण्यात आले कार्यवाही करते वेळी राजू इंगळे कनिष्ठ अभियंता, अरविंद पडघन ग्रामपंचायत अधिकारी ,सुमित खंडारे जलरक्षक ,सागर इढोळे ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

गरजवंतांना दिवाळी किट

अकोला : लायन्स क्लब ऑफ अकोला गोल्ड, लायन्स मिडटाऊन गोल्ड, लायन्स सफायर, लायन्स राजपूताना आणि लायन्स अकोला प्राईडच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी निमित्त गोरगरीब व गरजूंना मिष्टान्न व कपडे वाटपाचा 'गरजवंतांची दिवाळी' उपक्रम संपन्न झाला.

यात खडकाली समवेत अनेक आदिवासी गावातील आर्थिकदृष्ट्या कमजोर, गरीब व दुष्काळ ग्रस्तांना मिष्टान्न, कपडे, चप्पल-बूट, खेळणी, आदी साहित्य वितरित करण्यात आले. केडिया प्लॉट परिसरात आयोजित या दिवाळी किट सोहळ्याचा प्रारंभ रिजन चेअरपर्सन अनिता उपाध्याय यांच्या अध्यक्षतेत व एलसी आयएफ समनव्यक मुरलीधर उपाध्याय, मनोज बिसेन, दीपांशू पुर्वे, लायन्स मिडटाऊन गोल्डचे अध्यक्ष निलेश पवार शुक्ला यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

दिशा बालगृहातील मुलींसोबत महिला व बालविकास विभागाची दिवाळी साजरी



■ प्रतिनिधी | वाशिम ■

सण-उत्सव हे केवळ आनंद साजरा करण्याचे माध्यम नसून आपुलकी, माणुसकी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याची संधी असते. याच भावनेतून महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येणारा 'दिवाळीचा एक दिवस आमचे समवेत' हा उपक्रम दिशा मुलींचे निरीक्षणगृह / बालगृह, उत्साहपूर्ण व आनंददायी वातावरणात संपन्न झाला.

कुटुंबापासून दूर राहणाऱ्या तसेच काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालिकांनाही दिवाळीच्या सणाचा आनंद घेता यावा, त्यांच्यामध्ये आपलेपणाची भावना निर्माण व्हावी आणि समाजातील विविध घटकांचे प्रेम, सहकार्य व भावनिक आधार मिळावा, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे होते, तर प्रमुख पाहुण्या म्हणून बाल कल्याण समिती, वाशिमच्या अध्यक्षा अलका मकासरे उपस्थित होत्या. यावेळी परिविक्षा अधिकारी गणेश ठाकरे, महिला तक्रार निवारण कक्षाच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक सारिका करंडे तसेच दिशा मुलीचे निरीक्षणगृह / बालगृह, वाशिमचे अनिकेत कांबळे उपस्थित होते.

देशसेवेचा अभिमान! जवान किरण अंभोरे यांचा बोराळा हिस्से येथे भव्य सत्कार



■ प्रतिनिधी | वाशिम ■

तालुक्यातील हिस्से बोराळा येथील जवान किरण बाबुराव अंभोरे यांची जनरल रिझर्व्ह इंजिनिअरिंग फोर्स (जीआरईएफ) मध्ये निवड होऊन गावात प्रथम आगमन झाल्याबद्दल समाज बांधवांच्या वतीने त्यांचा उत्साहपूर्ण सत्कार करण्यात आला.

यावेळी बुद्ध विहार परिसरात फटाक्यांची आतषबाजी करीत त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

गावातील धम्म उपासिकांनी कुमकुम तिलक लावून, औक्षण करून तसेच शाल व पुष्पहार अर्पण करीत किरण अंभोरे यांचा गौरव केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारतीय बौद्ध महासभेचे आयु. दिलीप गवई होते, तर पूज्य भंते प्रज्ञापाल महाथेरो यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध आणि भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प, दीप व धूप अर्पण करून पूजन करण्यात आले. त्यानंतर पूज्य भंते प्रज्ञापाल महाथेरो यांनी उपस्थितांना त्रिशरण व पंचशील प्रदान केले.अध्यक्षीय भाषणात आयु. दिलीप गवई यांनी जवान किरण अंभोरे यांचे अभिनंदन करून त्यांच्या जिद्द, मेहनत आणि धम्मकार्याचा गौरव केला. वर्षावास काळात त्यांनी सलग तीन महिने 'भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन केले होते. धार्मिक कार्यासोबतच अभ्यास आणि मैदानी सरावावर लक्ष केंद्रित करून त्यांनी जीआरईएफमध्ये महत्त्वाचे स्थान प्राप्त केले.

केकतउमरा येथे दिवाळी संध्या निमित्त सांस्कृतिक दीपोत्सव उत्साहात संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग व सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या वतीने दिवाळी संध्यानिमित्त केकतउमरा येथे सांस्कृतिक दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात चेतन सेवांकुर दिव्यांग ऑर्केस्ट्राच्या कलाकारांसह स्थानिक कलावंतांनी विविध कलाविष्कार सादर करून उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळवली. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी सांस्कृतिक कार्य विभागाचे सहाय्यक संचालक संदीप बलखंडे, छत्रपती संभाजीनगर येथील विभागाचे समन्वयक सचिन पाईकराव, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे निवेदक तथा कवी प्रा. भास्कर पाईकराव, चेतन सेवांकुर दिव्यांग ऑर्केस्ट्राचे संचालक पांडुरंग उचितकर आणि रुपेश पुंडगे, युवा कलाकार प्रदीप पट्टेबहादूर, पत्रकार महादेव सुडके आदी उपस्थित होते.

या सांस्कृतिक दीपोत्सवाच्या माध्यमातून दिव्यांग कलाकारांना कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

आधुनिक युगातही बंजारा समाजाची परंपरा कायम!

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यासह जिल्ह्यातील प्रत्येक तांड्यात निवासाला असलेल्या निसर्ग व पशु पूजक बंजारा समाजात पूर्वापार चालत आलेली दिवाळी सणानिमित्त रात्रीला ओवाळणी (मेरा) मागत कुटुंबीयांना समृद्धी, सुख व शांती लाभण्याची प्रार्थना दिव्यांच्या तेजात कुमारिकांकडून करण्यात आली.

आधुनिकतेच्या झगमगाटात अनेक सणांची मूळ रूपे हरवत चालली आहेत. पण बंजारा समाजाने मात्र आपली शेकडो वर्षे जुनी 'दिवाळी मेरा' ची प्रथा आजही तितक्याच श्रद्धेने, उत्साहाने जपली आहे. दिवाळीच्या रात्री तांड्यातील लहान-मोठ्या कुमारिका, महिला हातात मातीची पणती घेऊन घरोघरी जातात आणि त्या घरातील कुटुंबियांना ओवाळून त्यांच्या सुख-



समृद्धीसाठी प्रार्थना करतात. त्या बदल्यात घरमालक त्यांना प्रेमाने ओवाळणी म्हणजेच 'मेरा' देतात. रात्रीच्या अंधारातही दिव्यांच्या प्रकाशाने उजळून निघालेला अंगण, हातात तेवत असलेली पणती धरून उभ्या असलेल्या लहान कुमारिका, त्यांच्या मध्यभागी साडीतील मातोश्री आणि मागे उभे असलेली लहान मुले. कोणी आधुनिक कपड्यात, कोणी पारंपारिक बंजारा वेशभूषेत - लाल-हिरव्या घागरा-ओढणीत, पण सर्वांच्या चेहऱ्यावर एकच भाव - दिवाळीचा आनंद आणि परंपरेचा अभिमान. पिढ्यान् पिढ्या ही परंपरा कशी चालत आली आहे, याचे जिवंत उदाहरणच या फोटोत दिसते. बंजारा बोलीभाषेत वरसे दनेरी कोट दवाळी बापू तोन मेरा, 'मेरा' म्हणजे ओवाळणी, प्रेमाने दिलेले दान. दिवाळीच्या रात्री कुमारिका या लक्ष्मीचे रूप मानल्या जातात. त्या ज्या घरी जातात त्या घरात लक्ष्मीचा वास राहतो, अशी श्रद्धा आहे.

दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

विदर्भ एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी पातुर

अलहाज अब्दुल मजीद, प्राथमिक व ज्युनिअर कॉलेज नायगाव अकोला



शुभेच्छूक

सचिव
मोहम्मद शोएब उर रहेमान अब्दुल हमीद

मुख्य कार्यकारी अधिकारी
मोहम्मद गाजी उर रहेमान अब्दुल हमीद

दोन दशकांच्या सेवाकार्याचा राष्ट्रीय गौरव

श्याम सवाई यांचा उपजिल्हा रुग्णालयात सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

रस्ते अपघातातील जखमींना वेळीच मदत मिळावी आणि अनेकांचे प्राण वाचावेत, या उदात्त हेतूने सन २००७ पासून सातत्याने सेवाकार्य करणारे श्याम रामदास सवाई यांना केंद्र शासनाचा प्रतिष्ठेचा 'राहवीर पुरस्कार' घोषित झाला आहे. या राष्ट्रीय सन्मानाबद्दल उपजिल्हा रुग्णालय, कारंजा लाड येथे रुग्णालय प्रशासन व रुग्ण कल्याण समितीच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.



वैद्यकीय अधीक्षक भाऊसाहेब लहाने यांच्या उपस्थितीत आमदार सईताई डहाके यांच्याद्वारे नामनिर्देशित समिती सदस्य संतोष घोंगडे आणि खासदार संजय देशमुख यांच्याद्वारे नामनिर्देशित समिती सदस्या सौ. कोमल नितीन गायकवाड यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी नितीन गायकवाड यांनी श्याम सवाई यांना छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट देऊन त्यांच्या सेवाकार्याला शुभेच्छा दिल्या.

श्याम सवाई यांनी सर्वधर्म मित्र मंडळाच्या माध्यमातून अपघातग्रस्तांना तातडीने मदत करणे, जखमींना रुग्णालयात पोहोचविणे तसेच रुग्णांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविण्याचे कार्य केले आहे. 'वन सेकंड वन कॉल, न्यू लाईफ अभियान' आणि 'सास कंट्रोल रूम'च्या माध्यमातून अपघातग्रस्तांना मदत मिळवून देण्यासाठी त्यांनी लोकसहभागावर आधारित यंत्रणा उभारली आहे.यावेळी वैद्यकीय अधीक्षक भाऊसाहेब लहाने यांनी त्यांच्या सेवाकार्याचे कौतुक करत राष्ट्रीय पुरस्कार मिळणे ही कारंजासाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. तर संतोष घोंगडे व कोमल गायकवाड यांनी अपघातग्रस्तांना मदत करण्याचा हा आदर्श उपक्रम संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली.

जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३४३ ■ बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

फटाक्यांच्या आतषबाजीवर बंदीचा परिणाम कुठे? दिवाळीतच आगीच्या चार घटना

फटाक्यांच्या ठिणग्या की विद्युत शॉर्टसर्किट आगींच्या कारणांवर प्रश्नचिन्ह

लाखोंच्या नुकसानीचा अंदाज, अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला





हिंगणघाट जनमाध्यम : दिवाळीचा उत्साह, रोषणाई आणि फटाक्यांची आतषबाजी सुरू असतानाच हिंगणघाट शहरात आगीच्या चार घटना घडल्याने नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या चारपैकी एका ठिकाणी फटाक्यांच्या ठिणगीमुळे, तर उर्वरित तीन ठिकाणी विद्युत शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या घटनांमध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. सुदैवाने अग्निशमन दलाच्या वेळीच केलेल्या कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला.

दिवाळीच्या दिवशीच शहरात आगीच्या चार घटना घडल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. फटाक्यांच्या आतषबाजीमुळे आग लागण्याचा धोका असताना शहरात फटाक्यांचा आवाज आणि आतषबाजी काही कमी झालेली दिसली नाही. शासनाने फटाक्यांबाबत निर्बंध घातले असतानाही प्रत्यक्षात त्यांची अंमलबजावणी कितपत झाली, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. दुसरीकडे, तीन ठिकाणी शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याची प्राथमिक माहिती असल्याने विद्युत यंत्रणेच्या सुरक्षिततेचाही मुद्दा ऐरणीवर आला आहे. दिवाळीच्या दिवशीच अशा घटना का घडल्या, विद्युत उपकरणांवरील वाढता ताण कारणीभूत ठरला का, याचीही चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बिडकर महाविद्यालय परिसरातील कचऱ्याला फटाक्यांच्या ठिणगीमुळे आग लागली. माता मंदिर परिसरातील एका घरात विद्युत शॉर्टसर्किट झाल्याने आग लागून घरातील साहित्य जळाले. प्रवीण बरेहा यांच्या घरातील फ्रिजमध्ये शॉर्टसर्किट झाल्याने आग लागली. तर विनोद भवन येथील पॅसिफिक क्रिकेट क्लबच्या व्यायामशाळेतही शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याची घटना घडली.

चारही घटनांची माहिती मिळताच हिंगणघाट नगरपालिकेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाचे अधिकारी गौरव गणार यांच्या मार्गदर्शनाखाली सुनील डोलस, कृष्णा डबले, ओम लडी, किशोर समर्थ आणि अमित सहारे यांनी आग विझविण्यासाठी तत्परतेने प्रयत्न केले. त्यामुळे चारही ठिकाणी आगीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले.

फुलोऱ्याआधीच तूर करपली; शेतकऱ्यांच्या स्वप्नांची राखरांगोळी

बोरखेडीसह अनेक गावांत पिके वाळली, वर्षभराची मेहनत मातीमोल होण्याची भीती



आष्टी शहीद जनमाध्यम : दुष्काळाने आधीच कंबरडे मोडलेल्या शेतकऱ्यांच्या संकटात आता तुरीच्या पिकाने भर घातली आहे. मोठ्या आशेने पेरलेल्या तुरीला फुलोरा येण्यापूर्वीच पाण्याअभावी झाडे करपू लागली आहेत. डोळ्यांदेखत हिरवीगार पिके वाळत असल्याचे विदारक चित्र शेतशिवारात दिसत असून, शेतकऱ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची वेळ आली आहे. निसर्गाच्या लहरीपणाने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेण्याची भीती निर्माण झाली आहे.

आष्टी तालुक्यातील बोरखेडी शिवारासह बंबरडा, चामला, थार, मोईटांडा आणि जंगल परिसरातील गावांमध्ये पावसाने दीर्घ खंड दिल्याने पिकांची अवस्था गंभीर झाली आहे. विशेषतः तुरीचे पीक पाण्याअभावी होरपळत आहे. अद्याप फुलोऱ्याची चाहूलही लागलेली नसताना झाडांची पाने वाळू लागली असून, काही ठिकाणी संपूर्ण झाडे करपण्याच्या मार्गावर आहेत. तुरीच्या पिकातून चांगल्या उत्पन्नाची अपेक्षा बाळगणाऱ्या शेतकऱ्यांसाठी हे चित्र धक्कादायक ठरत आहे.

शेतीसाठी बियाणे, खते, कीटकनाशके आणि मजुरीवर हजारो रुपये खर्च करून शेतकरी पीक उभे करतो. कर्जाचा डोंगर डोक्यावर घेऊन तो पावसाच्या भरवशावर शेती करतो. मात्र, ऐन पीक वाढीच्या काळात पावसाने दडी मारल्याने संपूर्ण हंगामच धोक्यात आला आहे. विहिरी, बोअरवेल किंवा सिंचनाची सुविधा नसलेल्या शेतकऱ्यांना पिके वाचविण्यासाठी कोणताही पर्याय उरलेला नाही.

एकीकडे दुष्काळाचे सावट, दुसरीकडे उत्पादन खर्चात झालेली वाढ आणि त्यातच पिकांची होत असलेली वातारहत, अशा तिहेरी संकटात शेतकरी भरडला जात आहे. शेतात उभी असलेली तूर करपताना पाहण्याशिवाय अनेक शेतकऱ्यांच्या हातात काहीच उरलेले नाही.

दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांसमोर आता खरीप हंगाम वाया जाण्याचे संकट उभे आहे. वेगवळ कागदोपत्री दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांचे प्रश्न सुटणार नाहीत. प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांच्या नुकसानीची पाहणी करणे गरजेचे आहे. प्रशासनाने तातडीने पीक परिस्थितीचे सर्वेक्षण करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करावेत. तसेच पीकविमा आणि शासकीय मदतीचा लाभ तातडीने मिळवून द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. फुलोरा येण्याआधीच तूर करपली, तर उत्पादनाची आशा तरी कशाच्या भरवशावर ठेवायची शेतकऱ्यांच्या या आक्रोशाची दखल प्रशासन घेणार की पुन्हा एकदा शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेतच राहणार, हा खरा प्रश्न आहे.

बोरखेडीत ११० वर्षांची गोवर्धन पूजेची परंपरा कायम

भागानगरे कुटुंबीयांकडे पहिल्या पूजेचा मान

ढोल-ताशांच्या गजरात गवळण दिवाळीची गाणी



आष्टी शहीद जनमाध्यम : आधुनिकतेच्या प्रवाहात अनेक पारंपरिक सण-उत्सव मागे पडत असताना आष्टी तालुक्यातील अवघ्या तीनशे लोकसंख्येच्या बोरखेडी गावाने तब्बल ११० वर्षांपासून गोवर्धन पूजेची परंपरा जपली आहे. यंदाही हा उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. या अनोख्या परंपरेचा अनुभव घेण्यासाठी परिसरातील अनेक गावांतील नागरिकांनी गर्दी केली होती.

बोरखेडीतील गोवर्धन पूजेची परंपरा गावच्या पहिल्या महिला सरपंच स्व. चिंधाबाई भागानगरे यांच्या काळापासून सुरू झाल्याचे सांगितले जाते. त्यानंतर स्व. नागोराव भागानगरे यांनीही ही परंपरा अखंडित ठेवली. आजही पूजेचा पहिला मान भागानगरे कुटुंबीयांकडे आहे. यंदा घनश्याम भागानगरे यांना पहिल्या पूजेचा मान मिळाला.

यानंतर गावकऱ्यांनी म्हशींचा कळप सगर देवाकडे नेऊन पारंपरिक पद्धतीने खेळविला. ढोल-ताशांच्या गजरात पारंपरिक वेशभूषेतील गवळण घरोघरी जाऊन दिवाळीची गाणी सादर करते. 'आली आली रे दिवाळी, गाई-म्हशीला ओवाळी' या गीतांनी उत्सवात विशेष रंगत आणली.

बोटोणा, पार्डी, चामला, थार, किन्ही, मोई, आष्टी, पालोरा, एकांबा, सारवाडी, धाडी आणि साहूर आदी गावांतील नागरिकांनी उत्सवाला हजेरी लावली. त्यामुळे बोरखेडीला यात्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते. पोलीस उपनिरीक्षक अक्षय भागानगरे यांच्या कुटुंबाशीही या परंपरेचे नाते जोडलेले आहे. श्रद्धा, पशुधनाविषयीची आस्था आणि ग्रामएकतेचा संदेश देणारा हा उत्सव ग्रामीण संस्कृतीचा अनमोल ठेवा ठरत आहे.

दौंदुडा येथे ८५ वर्षांची गोवर्धन पूजेची परंपरा कायम

हनुमान देवस्थानात गोमातेचे पूजन; दहीहंडी आणि काल्याच्या कार्यक्रमाने उत्सवात रंगत



हिंगणघाट जनमाध्यम : हिंगणघाट तालुक्यातील दौंदुडा येथे तब्बल ८५ वर्षांपासून सुरू असलेली गोवर्धन पूजेची परंपरा यंदाही मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने जपण्यात आली. मंगळवारी हनुमान देवस्थान परिसरात पारंपरिक पद्धतीने गोवर्धन पूजा उत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवाच्या निमित्ताने गावातील धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडले.

उत्सवाची सुरुवात हनुमान देवस्थानात गोमातेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर दहीहंडी आणि काल्याचा कार्यक्रम पार पडला. गावातील प्रत्येक घरी गाईचे पूजन करून त्यांना ओवाळण्यात आले. पारंपरिक धार्मिक विधी आणि भक्तिमय वातावरणामुळे संपूर्ण गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. दौंदुडा येथील या आगळ्यावेगळ्या परंपरेचा आनंद घेण्यासाठी बाहेरगावाहूनही नागरिक आणि पाहुण्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यावेळी किशोरराव वरभे, बाबाराव ढगे, जिल्हा परिषद सदस्य मिलिंद कोपुलवार, ह.भ.प. प्रदीप महाराज इंगळे, दिनेश गुजरकर, श्रावणजी वरभे, विजय गोल्हर, केशवराव गोल्हर, रमेशराव गोल्हर, तुकारामजी ढगे, धनराजजी गोल्हर, सचिन महाजन यांच्यासह गावातील महिला व नागरिक उपस्थित होते. ८५ वर्षांपासून अखंड सुरू असलेली ही परंपरा ग्रामीण संस्कृतीचा वारसा जपणारी ठरत आहे.

जुन्या वादातून दगडाने हल्ला; उपचारादरम्यान जखमीचा मृत्यू

दांडा अन् दगडाने डोक्यावर केले होते वार; आरोपीला अटक

वर्धा जनमाध्यम : जुन्या वादाचा राग मनात धरून रस्त्यात अडविले. लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली आणि दगडाने डोक्यावर जोरदार वार केले. या जीवघेण्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या ४५ वर्षीय व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. धोत्रा रेल्वे येथे ९ नोव्हेंबर रोजी घडलेल्या या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. राजेंद्र हरिश्चंद्र मानकर (रा. धोत्रा रेल्वे) असे मृताचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र मानकर हे गजू करचाल यांच्या दुचाकीवरून जात असताना आरोपी मुरलीधर शामराव थोरात (४१) याने त्यांना रस्त्यात अडविले. यावेळी जुन्या वादाचा विषय काढून त्यांच्याशी वाद घातला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. आरोपीने लाकडी दांडक्याने मानकर यांना मारहाण करून खाली पाडले. त्यानंतर दगडाने त्यांच्या डोक्यावर जोरदार वार केले. या हल्ल्यात मानकर गंभीर जखमी झाले.

घटनेनंतर त्यांना तातडीने सावंगी मेघे येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांकडून उपचार सुरू असतानाच मंगळवारी सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास त्यांची मृत्यूशी सुरू असलेली झुंज संपली. या प्रकरणी मृताचा मुलगा सुमित मानकर यांच्या तक्रारीवरून सावंगी मेघे पोलिसांनी सुरुवातीला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला होता. आरोपी मुरलीधर थोरात याला अटक करण्यात आली होती. मात्र, उपचारादरम्यान मानकर यांचा मृत्यू झाल्याने पोलिसांनी गुन्ह्यात हत्येचे कलम वाढविले आहे.

दरम्यान, आरोपीला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या प्रकरणाचा पुढील तपास सावंगी मेघे पोलीस करीत आहेत.

वृद्धांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविले, अपघातग्रस्तांच्या दुःखातही कृष्णगिरी परिवार धावला

पालकमंत्री डॉ. भोयर यांच्या उपस्थितीत सेवाभावाचा अनोखा उपक्रम



वर्धा जनमाध्यम : दिवाळीच्या रोषणाईत अनेक घरे उजळतात; मात्र निराधार वृद्धांच्या आयुष्यात मायेचा दिवा पेटविण्याचे काम प्रत्येकाच्या हातून घडत नाही. एकीकडे वृद्धाश्रमातील आई-बाबांसोबत दिवाळीचा आनंद, तर दुसरीकडे समृद्धी महामार्गावरील अपघातात उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांच्या दुःखात सहभाग घेत मदतीचा हात... अशा दुहेरी सामाजिक बांधिलकीतून कृष्णगिरी परिवाराने माणुसकीचे दर्शन घडविले.

कृष्णगिरी परिवाराचे प्रमुख महेश गुल्हाने आणि त्यांच्या मित्रपरिवाराच्या पुढाकारातून सिंदी (मेघे) येथील मातोश्री वृद्धाश्रमात गेल्या २५ वर्षांपासून दिवाळी साजरी करण्याची परंपरा यंदाही कायम ठेवण्यात आली. वृद्धाश्रमातील ज्येष्ठांना नवीन कपडे, भेटवस्तू देत स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. केवळ भेटवस्तूंचे वाटप न करता त्यांच्यासोबत वेळ घालवून संवाद साधण्यात आला. वृद्धांच्या चेहऱ्यावरील समाधान हेच या उपक्रमाचे खरे फलित ठरले.

याचवेळी समृद्धी महामार्गावरील भीषण अपघातात वर्ध्यातील सोमणथे लेआउट येथील मातृशक्ती नवदुर्गा उत्सव मंडळाच्या भाविकांचा मृत्यू झाल्याने दुःखात सापडलेल्या कुटुंबीयांनाही कृष्णगिरी परिवाराने आधार दिला. मृतांना श्रद्धांजली अर्पण करून प्रभावित कुटुंबीयांना भेटवस्तू आणि आर्थिक मदत देण्यात आली.

यावेळी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी कृष्णगिरी परिवाराच्या उपक्रमाचे कौतुक केले. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गरजूंच्या मदतीसाठी समाजातील दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, असे आवाहन त्यांनी केले. महेश गुल्हाने यांनीही वाढदिवस आणि कौटुंबिक आनंदाचे क्षण वृद्धाश्रमातील आई-बाबांसोबत साजरे करण्याचे आवाहन केले.

यावेळी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष अतुल वांदिले, मातोश्री वृद्धाश्रमाचे अध्यक्ष पुष्पमाला देशमुख,सचिव रेखा देशपांडे,स्नेहा आकरे सभापती महिला बालकल्याण समिती, क्रीडाई सचिव अजय वझुरकर,प्रवीण जैन,अनिल गुल्हाने, प्रमोद श्रीराव, राहुल शर्मा, योगेश गावंडे, आशिष आकरे, अंश गुल्हाने, किशोर सुरकार, गजानन वांढरे, आशुतोष पराटके, धनराज ढोरे, आशिष वंजारी, रुपेश बनारसे, आरव गावंडे आदी उपस्थित होते.अश्विनी महेश गुल्हाने यांच्यासह कृष्णगिरी परिवारातील सर्व पदाधिकारी मित्रपरिवार तसेच क्रीडाई सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते..

महेश गुल्हाने यांची २५ वर्षांची परंपरा कायम

वाघाचा गोठ्यात धुमाकूळ; ३ म्हशींचा फडशा, चौथी मृत्यूशी झुंजतेय

पशुपालकांमध्ये दहशत, वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी



आष्टी शहीद जनमाध्यम : दिवाळीच्या सणात आनंदाऐवजी भारसवाडा येथील पशुपालकाच्या वाट्याला दुःखाचा डोंगर आला. वर्धा नदीच्या काठावरील गोठ्यात घुसलेल्या वाघाने म्हशींच्या कळपावर रक्तरंजित हल्ला चढवत एकापाठोपाठ तीन म्हशींचा फडशा पाडला. तर चौथी म्हैस गंभीर जखमी झाली. १० नोव्हेंबर रोजी पहाटे उघडकीस आलेल्या या घटनेने संपूर्ण परिसर हादरला असून वनविभागाच्या कार्यक्षमतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

भारसवाडा येथील वर्धा नदीच्या काठावर गायकवाड यांच्या वाड्याजवळ पवन सोनटक्के यांचा गोठा आहे. या गोठ्यात म्हशींचा कळप बांधण्यात आला होता. रात्री सुमारे बाराच्या सुमारास पशुपालक घरी गेल्यानंतर दबा धरून बसलेल्या वाघाने पहाटेच्या सुमारास गोठ्यात प्रवेश केला. त्यानंतर म्हशींवर हल्ला करीत तीन म्हशींना जागीच ठार केले. वाघाच्या या हल्ल्यात चौथी म्हैसही गंभीर जखमी झाली असून तिची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येते.

पवन सोनटक्के यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून सणासुदीच्या काळात त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. मृत म्हशींचा पंचनामा करण्यात आला. मात्र, केवळ पंचनामा करून वनविभागाची जबाबदारी संपणार आहे काय, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

वर्धा नदीच्या परिसरात वाघाचा वावर असल्याने नागरिक आणि पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. गोठ्यात बांधलेल्या जनावरांवरच वाघाने हल्ला केल्याने आता मानवी वस्तीलाही धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तळेगाव वनपरिक्षेत्रातील वनविभागाने वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवून त्याचा तातडीने बंदोबस्त करावा. तसेच नुकसानग्रस्त पशुपालकाला विनाविलंब आर्थिक मदत आणि योग्य नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांनी केली आहे.

वनविभागाने आता केवळ पंचनाम्यापुरते मर्यादित न राहता नागरिक आणि पशुधनाच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलण्याची गरज आहे. अन्यथा एखादी मोठी दुर्घटना घडल्यावरच प्रशासनाला जाग येणार काय, असा संतप्त प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

घराला आगीचा विळखा; लाखोंचे संसारोपयोगी साहित्य भस्मसात

वर्धा जनमाध्यम - रात्रीच्या शांततेत अचानक आगीचा भडका उडाला आणि घरातील संसारोपयोगी साहित्याची राखरांगोळी झाली. शहरातील ठाकरे मार्केट परिसरात ९ नोव्हेंबर रोजी रात्री घडलेल्या या घटनेत पाल यांच्या घराच्या पहिल्या माळ्यावरील खोलीला आग लागून लाखो रुपयांचे साहित्य जळून खाक झाले. या आगीत सुमारे दोन लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाल यांच्या घराच्या पहिल्या माळ्यावरील खोलीत अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने रौद्ररूप धारण करीत खोलीतील साहित्याला कवेत घेतले. आगीमुळे परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच वर्धा नगर परिषदेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळ गाठले.

अग्निशमन दलाच्या जवानांनी सुमारे एक तास शर्थीचे प्रयत्न करून आगीवर नियंत्रण मिळविले. विशाल नाईक, सुजात अली, अमोल शेंडे आणि प्रशिल देशमुख यांनी आग विझविण्यासाठी प्रयत्न केले. वेळीच आग आटोक्यात आणल्याने पुढील अनर्थ टळला.

जाहिरनामा

प्रोसेस क - ७८२९/२०२६ सक्सेशन केस कं. २३/२०२६,

दिपाली किरण पट्टेवार व २ वि. निरंक, पेशी ता. २६/११/२०२६,

वर्धा येथील दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात, सक्सेशन केस कं. २३/२०२६, दिपाली किरण पट्टेवार व २ वि. निरंक, पेशी ता. २६/११/२०२६, सदरहु केसमध्ये किरण लक्ष्मणराव पट्टेवार हे मयत असुन त्यांचा मृत्यू दि. १७/०७/२०२६ रोजी झालेला असुन अर्जदार कं. १. दिपाली किरण पट्टेवार, ०२. रागीनी किरण पट्टेवार व ०३. आरोही किरण पट्टेवार हे मयत यांचे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदार यांनी मयत किरण लक्ष्मणराव पट्टेवार यांचा मृत्यू पश्चात या न्यायालयात सेक्शन ३७२ इंडियन सक्सेशन एक्ट अन्वये वारसान प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

सदरहू केसमध्ये कोणासही काही आपत्ती असल्यास अथवा काही सांगावयाचे असल्यास त्यांनी हया जाहीरनाम्याच्या तारखेपासुन एक महीन्याचे आत दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, वर्धा यांचे न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहु कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यास कायदेशीर वारसहक्क कायदा अन्वये कायदेशीर वारसाहक्क प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज तारिख ०४/११/२०२६ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये
सहाय्यक अधिक्षक,
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा,
दि. ०४/११/२०२६

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

‘दादा, पुढच्या वर्षी वहिनींना घेऊन या!’

अरुणाताईंच्या आग्रहाने भारावले मुख्यमंत्री फडणवीस

लोहारी सावंगा (जि. नागपूर): मुख्यमंत्र्यांचा दौरा, सुरक्षेचा ताफा, प्रोटोकॉल आणि अधिकाऱ्यांची लगबग... या सगळ्यांपलीकडे एक माणूस म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसशेतकरी कुटुंबात रमले. घरातल्या माणसाप्रमाणे गप्पा, घरच्या चुलीवरच्या जेवणाचा आस्वाद, सकाळी गरमागरम तरी पोह्यांचा नाश्ता आणि कुटुंबीयांच्या आग्रहाखातर केलेले अभ्यंगस्नान... लोहारी सावंगा येथील रामभाऊ बालपांडे यांच्या घरात मुख्यमंत्र्यांची दिवाळी अक्षरशः घरगुती झाली. या मुक्कामात नात्यांचे बंधही नकळत जुळले. अरुणाताईंनी मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले आणि ‘दादा, पुढच्या वर्षी वहिनींना घेऊन या’ असा आग्रह धरला. त्यांच्या या सहज, प्रेमळ आग्रहाने मुख्यमंत्र्यांच्याही चेहऱ्यावर हसू फुलले.नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथे बालपांडे कुटुंबासोबत शेतातील पिकांच्या नुकसानीपासून घरच्या माणसांच्या सुख-दुःखापर्यंत अनेक विषयांवर गप्पा झाल्या.



कमलाबाईंच्या अडचणी - नाश्त्याच्या वेळी ७५ वर्षांच्या कमलाबाई मानेराव यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. वयामुळे कामधंदा होत नसल्याने बकरीपालनासाठी मदत आणि अपंग मुलासाठी आर्थिक साहाय्य मिळवून देण्याची विनंती त्यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले. कमलाबाईंना निराधार अनुदान मिळू शकते का, याचीही पडताळणी करण्यास सांगितले.

मलाही शेकोटी हवी? - रात्री थंडी असल्याने घराच्या परिसरात शेकोटी पेटविण्यात आली होती. मात्र, मुख्यमंत्र्यांना त्याची कल्पना नव्हती. सकाळी त्याचा उल्लेख करताना, ‘तुम्ही मला सांगितले नाही. मीसुद्धा खूप दिवसांनंतर शेकोटीचा आनंद घेतला असता’, अशी मिश्कील प्रतिक्रिया त्यांनी दिली.

शेतकऱ्यांसोबत छान झोप लागली, रात्र आनंदात गेली?

दुसऱ्या दिवशी सकाळी अभ्यंगस्नानानंतर अरुणाताईंनी मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले. घरातील महिलांनी पारंपरिक पद्धतीने ओवाळणी केली. मुख्यमंत्र्यांनीही बहिणीच्या ताटात ओवाळणी घातली. निरोप घेताना मुख्यमंत्र्यांनी, ‘तुमच्यासोबतचा दिवस खूप आनंदात गेला. छान झोप लागली’, असे सांगितले. पत्रकारांशी बोलतानाही मुख्यमंत्र्यांनी बालपांडे कुटुंबाशी जवळीक झाल्याचे आवर्जून सांगितले.

विठ्ठलभक्त कुटुंब -बालपांडे कुटुंबाने छान आदरातिथ्य केले. दुष्काळाचा फटका बसूनही रामभाऊ यांनी हार मानलेली नाही. कुटुंबातील तीन खातेदारांना कर्जमाफीचा लाभ मिळाला, याचे समाधान आहे. हे कुटुंब वारीला जाते. विठ्ठलाची अर्चना करणारा परिवार विपरीत परिस्थितीतही हतबल होत नाही, असे ते म्हणाले. मुख्यमंत्र्यांनी आपल्या घरी मुक्काम केला, ही भावना कुटुंबासाठी अविस्मरणीय ठरली.

लाडक्या बहिणींना एसटीची सवलत मिळेना

एनसीएमसी कार्डच्या नावाखाली पूर्ण तिकीट!

नागपूर/प्रतिनिधी- महिलांच्या एसटी प्रवासातील तिकिटावर मिळणाऱ्या सवलतीबाबत शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असतानाही त्याची माहिती एसटीच्या वाहकांपर्यंत पोहोचलेली नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एनसीएमसी कार्ड नोंदणीची अनिवार्यता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पुढे ढकलण्यात आली असतानाही महिलांकडून पूर्ण तिकीट दर आकारला जात असल्याची तक्रार करण्यात आली आहे. नागपूर-माहूर बसमध्ये हा प्रकार घडल्याचा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ऐन दिवाळीत सवलतीपासून वंचित राहिल्याने महिला प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला आहे.राज्य शासनाच्या निर्णयानुसार महिलांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करताना तिकिटाच्या दरात ५० टक्के सवलत दिली जाते. या योजनेमुळे राज्यातील लाखो महिला प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. मात्र, या सवलतीचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी कार्ड नोंदणीची अट लागू करण्यात आली होती. कार्ड नोंदणीची प्रक्रिया पूर्ण न झालेल्या महिलांनाही सवलतीचा लाभ मिळावा, यासाठी नोंदणीची अनिवार्यता ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत पुढे ढकलण्यात आली आहे.शासनाने नोंदणीची मुदत वाढवली असली, तरी या निर्णयाची माहिती एसटीच्या वाहकांपर्यंत पोहोचलेली नसल्याचे नागपूर-माहूर बसमधील प्रकारावरून समोर आले आहे. एनसीएमसी कार्ड नसल्याचे कारण देत महिला प्रवाशांकडून पूर्ण तिकीट आकारले जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.



त्यामुळे शासनाने दिलेली सवलत प्रत्यक्ष प्रवासात मिळत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.नागपूर-माहूर मार्गावरील एसटी बसमध्ये महिला प्रवाशांकडून पूर्ण तिकीट आकारण्यात आल्याची बाब समोर आली. एनसीएमसी कार्ड नोंदणीची सक्ती पुढे ढकलण्यात आल्याची माहिती वाहकाला नसल्याने महिलांना सवलतीऐवजी पूर्ण भाडे द्यावे लागल्याचा दावा विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या घटनेचा उल्लेख करत त्यांनी समाजमाध्यमांवर एसटी प्रशासनाच्या कारभारावर टीका केली आहे.शासनाचा निर्णय असूनही त्याची माहिती वाहकांपर्यंत पोहोचत नसेल, तर एसटी प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण होते, असे वडेट्टीवार यांनी म्हटले आहे. ऐन दिवाळीच्या सणासुदीच्या काळात महिलांना सवलतीचा लाभ मिळण्याऐवजी आर्थिक भुर्दंड आणि मनस्ताप सहन करावा लागत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली. शासनाचे निर्णय केवळ कागदावर न राहता त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे. तसेच एनसीएमसी कार्ड नोंदणीची मुदतवाढ आणि महिलांना मिळणाऱ्या सवलतीबाबत सर्व वाहकांना तातडीने स्पष्ट सूचना देण्याची गरज आहे. बसस्थानकांवरही याबाबत माहिती उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून महिलांना प्रवासादरम्यान सवलतीसाठी वाद घालण्याची किंवा पूर्ण तिकीट भरण्याची वेळ येणार नाही. शासनाने सवलतीची मुदत वाढवून महिलांना दिलासा दिला असताना एसटी प्रशासनाच्या माहितीच्या अभावामुळे त्यांना त्यापासून वंचित राहावे लागत असेल, तर ही बाब गंभीर आहे.

अक्कलकोटमध्ये पार्किंगमध्ये भीषण आग;

५ ते ६ ट्रक जळून खाक



सोलापूर/प्रतिनिधी : अक्कलकोट येथे सोलापूर-अक्कलकोट महामार्गालगत असलेल्या एका खासगी पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या ट्रकना भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीत आतापर्यंत जवळपास पाच ते सहा ट्रक जळून खाक झाल्याची प्राथमिक माहिती आहे. एका ट्रकला लागलेली आग शेजारी उभ्या असलेल्या अन्य ट्रकपर्यंत पसरल्याने आगीने काही वेळातच रौद्ररूप धारण केले. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, सोलापूर-अक्कलकोट महामार्गावरील खासगी वाहनतळामध्ये अनेक ट्रक पार्किंगसाठी उभ्या करण्यात आल्या होत्या. यापैकी एका ट्रकला अचानक आग लागली. सुरुवातीला आगीचे स्वरूप मर्यादित होते. मात्र, काही वेळातच आगीच्या ज्वालांनी शेजारी उभ्या असलेल्या ट्रकलाही आपल्या विळख्यात घेतले. एकापाठोपाठ एक ट्रक आगीच्या भक्ष्यस्थानी पडल्याने घटनास्थळी धुराचे मोठे लोट पसरले.

आग वेगाने पसरत असल्याने वाहनतळातील अन्य ट्रकनाही धोका निर्माण झाला आहे. आतापर्यंत पाच ते सहा ट्रक जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या खासगी पार्किंगमध्ये अद्यापही अनेक ट्रक उभ्या असल्याने आग आणखी पसरू नये, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच अक्कलकोट नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. आगीच्या तीव्रतेमुळे जवानांसमोर आव्हान निर्माण झाले असून, अन्य वाहनांपर्यंत आग पोहोचू नये, यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे.

भारतात गरिबी घटली, तरीही ८० कोटी जनतेला मोफत रेशन का?

पंतप्रधान मोदींच्या आर्थिक सल्लागारांनी स्पष्ट केली भूमिका

नवी दिल्ली/वृत्तसंस्था-देशातील दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटले असतानाही केंद्र सरकार सुमारे ८० कोटी जनतेला मोफत धान्य का वाटत आहे? या सातत्याने उपस्थित होणाऱ्या प्रश्नावर पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या (PMEAC) सदस्या आणि ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ शमिका रवी यांनी महत्त्वाची भूमिका मांडली आहे. ‘ही योजना केवळ गरिबी निर्मूलनापुरती मर्यादित नसून, नागरिकांना सामाजिक सुरक्षा कवच पुरवणे आणि त्यांच्या आहारातील पोषणमूल्ये सुधारणे हा यामागील मुख्य उद्देश आहे,’ असे त्यांनी स्पष्ट केले.

बिझनेस टुडेला दिलेल्या एका मुलाखतीत बोलताना शमिका रवी म्हणाल्या, ‘देश आर्थिकदृष्ट्या सक्षम होत असल्यानेच आपण हे करू शकत आहोत. स्कॅन्डिनेव्हियन देश असोत, ‘जी-७’ मधील प्रगत राष्ट्र असोत किंवा विकसनशील देश; जशी देशाची अर्थव्यवस्था वाढते, तशी ती आपल्या नागरिकांना सामाजिक सुरक्षा कवच प्रदान करत असते. भारत सरकार नेमके हेच करत आहे.’

८० कोटी प्रत्यक्ष लाभार्थी नाहीत- मोफत रेशन वाटपाच्या आकडेवारीवर बोलताना रवी यांनी एक महत्त्वाचा फरक अधोरेखित केला. ‘८० कोटी लोक या योजनेसाठी पात्र असले, तरी ग्राहक खर्च सर्वेक्षणातील आकडेवारीनुसार प्रत्यक्षात सर्वच्या सर्व ८० कोटी लोक मोफत रेशन घेत नाहीत. सुमारे ५५ ते ५६ कोटी नागरिकच या योजनेचा प्रत्यक्ष लाभ घेत आहेत. अडचणीच्या काळात नागरिकांना अन्नसुरक्षा मिळावी, यासाठी ही योजना उपयुक्त ठरते,’ असे त्यांनी नमूद केले.



अन्नातील पोषणमूल्यांमध्ये मोठी सुधारणा- मोफत धान्यामुळे सर्वसामान्य कुटुंबांची होणारी आर्थिक बचत अधिक पौष्टिक अन्नावर खर्च होत असल्याचा दावा रवी यांनी केला. ‘धान्यापोटी होणाऱ्या पैशांच्या बचतीमुळे लोक आता ताजी फळे, दूध व दुग्धजन्य पदार्थ, अंडी, मासे आणि मांसाहार यावर खर्च करत आहेत. यामुळे नागरिकांच्या रोजच्या आहारात लक्षणीय विविधता आली असून पोषणमूल्यांमध्येही लक्षणीय सुधारणा झाली आहे,’ असे त्या म्हणाल्या.

धान्य साठवून सडवण्यापेक्षा वाटप करणे अधिक फायदेशीर- योजनेच्या निरंतरतेबाबत बोलताना त्या म्हणाल्या की, काळाच्या ओघात या योजनेमध्ये आवश्यक बदल होऊ शकतात. मात्र आर्थिक गणितांचा विचार करता अतिरिक्त धान्याची दीर्घकाळ साठवणूक करण्यापेक्षा त्याचे वाटप करणे अधिक शहाणपणाचे आहे. ‘काही वर्षांपूर्वी पावसामुळे किंवा उंदरांमुळे एफसीआयच्या गोदामांमध्ये हजारो टन धान्य सडल्याच्या किंवा खराब झाल्याच्या बातम्या पाहायला मिळाल्या. धान्याची दीर्घकाळ साठवणूक करणे हे अत्यंत खर्चिक बाब आहे. आपण सध्या गरजेपेक्षा जास्त धान्य पिकवत आहोत. त्यामुळे गोदामांमध्ये साठवून ठेवण्यापेक्षा त्याचे वाटप करणे आर्थिकदृष्ट्या अधिक व्यवहार्य आणि फायद्याचे ठरते,’ असेही त्या म्हणाल्या.तसेच गेल्या १२ वर्षांत देशातील सर्वच आर्थिक स्तरांमधील लोकांचा तांदूळ आणि गव्हाचा प्रत्यक्ष वापर दरडोई २ किलोग्रॅमने कमी झाला असून लोकांचा कल आता अधिक सकस आहाराकडे वळत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

गरिबी ३० टक्क्यांवरून थेट ३.९ टक्क्यांवर

देशातील दारिद्र्य दरात झालेली घट अभूतपूर्व असल्याचे सांगताना त्यांनी रंगराजन समितीच्या निकषांचा संदर्भ दिला. ‘रंगराजन समितीच्या दारिद्र्य रेषेच्या व्याख्येनुसार (ज्यात अन्न, निवारा, वाहतूक, शिक्षण आणि आरोग्य यांवरील खर्चाचा समावेश होतो) २०११-१२ मध्ये देशात गरिबीचे प्रमाण सुमारे ३० टक्के होते. ताज्या ‘कौटुंबिक ग्राहक खर्च’ आकडेवारीनुसार हे प्रमाण आता थेट ३.९ टक्क्यांवर आले आहे,’ असे रवी यांनी सांगितले. ही सुधारणा विशिष्ट भागापुरती मर्यादित नसून देशभरात सर्वत्र दिसून येत आहे. विशेष म्हणजे ग्रामीण भागात हिंदू कुटुंबांमधील गरिबीचे प्रमाण ३.९ टक्के असताना मुस्लीम कुटुंबांमध्ये ते २.४ टक्क्यांपर्यंत खाली आले असून, सामाजिक व धार्मिक स्तरावर गरिबीचे प्रमाण वेगाने कमी होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दिवाळीच्या दिवशी सपाटे कुटुंबात अंधार पेरणारे गजाआड;

बजाजनगर हत्याकांड; मुख्य आरोपीसह पाच जणांना अटक

नागपूर/प्रतिनिधी- गरिबीशी झुंज देऊन कुटुंबियांना सावरण्याचा प्रयत्न करणारा पिपळा फाटा येथील तरुण अमन उर्फ बॉबी सुनील सपाटे (२७) याची निर्घृण हत्या करून त्याच्या कुटुंबियांच्या जीवनात कायमचा अंधार पेरणारा अट्टल गुन्हेगार अक्षय किशोर मडावी (२९) याच्या पोलिसांनी मुसक्या बांधल्या. त्याच्यासह अन्य चार आरोपींनाही पोलिसानी अटक केली आहे.अक्षय किशोर मडावी (२९, फुटाळा वस्ती), पीयूष महेश नेनवानी (३१, अनुपमा माईन स्टोन, जरीपटका), समीर विजय कावळे (२३, आदिवासीनगर, गिट्टीखदान), आदित्य किशोर कळसकर (१९, नवीन फुटाळा) आणि सुजल राजू सिडाम (२१, जुना फुटाळा) अशी आरोपींची नावे आहेत.

दिवाळीच्या दिवशी घडले हत्याकांड

सोमवारी ९ नोव्हेंबर रोजी मृत अमनचा मित्र प्रसाद राऊत याचा वाढदिवस होता. त्यामुळे रविवारी ८ नोव्हेंबरच्या मध्यरात्री अमन, अक्षय गंगाधर नौकरकर हे वाढदिवसाच्या कार्यक्रमाला जात होते. देवनगर चौकात अमनच्या मित्राने कार उभी केली. तेथे आरोपी कारसमोर फटाके फोडत होते. अमनने फटाके फोडणाऱ्यांना हटकले असता आरोपी अक्षय मडावी व त्याच्या साथीदारांनी अमनला मारहाण केली तर, मडावीने चाकू काढून अमनच्या पोटात खुपसला. नजिकच्या ऑरेंज सिटी हॉस्पिटलमध्ये त्याला उपचार मिळाले नसल्याने खूप रक्तस्राव झाला आणि मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. ऐन दिवाळीच्या रात्री ही घटना घडल्याने उपराजधानीतील नागरिकांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला

माहिती समोर आली आहे. विशेष म्हणजे, या खासगी पार्किंगमध्ये अद्यापही अनेक ट्रक उभ्या असल्याने आग आणखी पसरू नये, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

घटनेची माहिती मिळताच अक्कलकोट नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या जवानांकडून आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. आगीच्या तीव्रतेमुळे जवानांसमोर आव्हान निर्माण झाले असून, अन्य वाहनांपर्यंत आग पोहोचू नये, यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे.

आहे. या पार्श्वभूमीवर, बजाजनगरच्या ठाणेदाराला पोलिस आयुक्तांनी तडकाफडकी नियंत्रण कक्षात हलविले.

हत्या केल्यानंतर मित्रासोबत जेवण

निरपराध बॉबी सपाटेची हत्या केल्यानंतर आरोपी मडावी त्याच्या साथीदारांसह पीयूष नेनवानी याच्या घरी गेला. त्याला खुनाची माहिती दिली. गंभीर गुन्हा केल्याचे माहित असूनसुद्धा पियुषने आरोपी मडावीच्या लपण्याची आणि पसार होण्याची सोय करून दिली. त्याला जेवण केल्यानंतर रात्रभर आश्रय दिला. मोबाईल, सिम कार्ड देऊन त्याची पळून जाण्याची व्यवस्था केली.

आरोपी सापडले, गुरुवारपर्यंत पीसीआर- आरोपी मडावी प्रतापनगर चौकातील अतिथी रेस्टॉरेंटमध्ये असल्याचे कळताच गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने त्याला आणि पियुषला ताब्यात घेतले. त्यांच्या ताब्यातून सोनेट कार, डिओ मोपेड, तीन मोबाईल असा १७ लाख २० हजाराचा मुद्देमाल जप्त केला. त्यांना बजाजनगर पोलिसांच्या ताब्यात दिले. तिकडे बजाजनगर पोलिसांनी समीर कावळे, आदित्य कळसकर आणि सुजल सिडाम या तिघांना पकडले. सर्व आरोपींना आज न्यायालयात हजर केले असता त्यांना १२ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडी देण्यात आली. मुख्य आरोपी अक्षय मडावी हा खतरनाक गुन्हेगार आहे. त्याच्यावर २२ गुन्हे दाखल आहेत. असे असून देखिल अंबाझरी पोलिसांनी त्याच्यावर वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई का केली नाही, त्याला मोकाट कसे सोडले? असा प्रश्न आहे. अंबाझरी ठाण्यातील अधिकारी-कर्मचाऱ्यांनी त्याच्यावर नजर ठेवली

महागड्या आयफोनसाठी सुनेनेच मारला सासूच्या दागिन्यांवर डल्ला!

नागपूर/प्रतिनिधी- ‘हौसेला मोल नसते ..’ अशी एक म्हण आपण अनेकदा ऐकली असेल. पण महागड्या आयफोनच्या नादात सुनेने थेट आपल्याच सासूच्या सोन्याच्या दागिन्यांवर डल्ला मारल्याचा प्रकार क्वचितच एकिवात असेल. असाच एक संतापजनक आणि थक्क करणारा प्रकार नागपुरात समोर आला आहे. विशेष म्हणजे, हा सगळा प्रकार सुनेने तब्बल सहा महिने अत्यंत चलाखीने लपवून ठेवला होता. नागपुरातील शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या राधा राजू वर्मा यांच्या घरी हा प्रकार घडला. त्यांची सून ग्रंथाली आकाश वर्मा हिने घरातील सोन्याच्या दागिन्यांवर डोळा ठेवून तब्बल साडेपाच तोळे (५३ ग्रॅम) सोन्याचे दागिने हळूहळू लांबवले. धक्कादायक बाब म्हणजे, हे दागिने चोरल्यानंतर तिने ते परस्पर विकून टाकले आणि त्यातून मिळालेल्या पैशातून स्वतःसाठी एक महागडा आयफोन खरेदी केला.



सहा महिने लपवून ठेवले चोरटा प्रताप- सुनेने हा चोरीचा प्रताप केल्याचे सासू राधा वर्मा यांना लगेच कळू दिले नाही. सासू सुनेचे पटतही नसल्याने सून अधूनमधून माहेरीही जात होती. तिने तब्बल सहा महिने ही चोरी सासू आणि पतीपासून लपवून ठेवली. मात्र, एका विवाह सोहळ्यानिमित्त सासू जेव्हा त्यांचे दागिन्यांचे कपाट उघडून दागिने शोधू लागल्या तेव्हा त्यांना ही शंका आली. कपाटात दागिने नसल्याचे लक्षात आल्यावर त्यांच्या पायाखालची जमीनच सरकली. त्यांनी घरात बरीच शोधाशोध केली, पण दागिने मिळेनात. अखेर संशय बळावल्याने सासूने थेट शांतीनगर पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली.

पोलिसांच्या तपासात जुनी प्रकरणेही समोर- पोलीस तक्रारीनंतर पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंदवून तपास सुरू केला. चौकशीदरम्यान ग्रंथाली हिच्याबद्दल आणखी एक मोठी माहिती समोर आली. यापूर्वीही तिच्यावर स्वतःच्या भावाच्या घरात चोरी केल्याचा आरोप करण्यात आला होता. त्याप्रकरणी अंबाझरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याची माहिती पुढे येत आहे.

वंचितांच्या दारी मंत्र्यांची दिवाळी; ऊसतोड कामगारांपासून कोलाम बांधवांपर्यंत संवाद

यवतमाळ/प्रतिनिधी : दिवाळी म्हटली की रोषणाई, फराळ आणि आनंदाचा उत्सव. मात्र, रोजच्या जगण्याचा संघर्ष करणाऱ्या कष्टकरी, आदिम आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांसाठी सणाचा आनंदही अनेकदा मर्यादित असतो. यंदा जिल्ह्यावर दुष्काळसदृश परिस्थितीचे सावट असताना जिल्ह्यातील तीन मंत्र्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी वंचित घटकांसोबत दिवाळी साजरी केली.

पालकमंत्री संजय राठोड यांनी ऊसतोड कामगारांसोबत, आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी कोलाम बांधवांसोबत, तर राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी शेतकरी कुटुंबे आणि निराधार मुलांसोबत दिवाळीचा आनंद वाटला.या तिन्ही भेटींमध्ये दिवाळी साहित्याचे वाटप एवढाच उद्देश नव्हता, तर संबंधित घटकांच्या प्रश्नांशी थेट संवाद साधण्याचाही प्रयत्न दिसून आला. ऊसतोड कामगारांच्या नोंदणीचा प्रश्न, त्यांच्या मुलांचे शिक्षण आणि आरोग्य -सुरक्षेच्या सुविधा, कोलाम बांधवांच्या जीवनातील प्रश्न आणि दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणी या मुद्द्यांना या भेटींमध्ये महत्त्व मिळाले.

आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी कळंब तालुक्यातील गणेशवाडी येथील कोलाम पोड्याला भेट देत आदिम आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी केली. दुर्गम भागात राहणाऱ्या कोलाम कुटुंबांशी त्यांनी संवाद साधला. त्यांच्या सुख-दुःखाची विचारपूस करीत सणाच्या आनंदात



सहभागी झाले. मुख्य प्रवाहापासून काहीसे दूर असलेल्या या आदिम जमातीपर्यंत दिवाळीचा आनंद पोहोचविण्याच्या उद्देशाने ही भेट घेण्यात आली. मंत्र्यांच्या उपस्थितीमुळे पोड्यावरील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावेळी सरपंच दिलीप मलांडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

शेतकरी कुटुंबांसोबत फराळाचा आनंद- दुसरीकडे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी पुसद तालुक्यातील गौळ मांजरी, चिलवाडी, भगतवाडी आणि श्रीरामपूर येथे सहपत्नीक भेट देत शेतकरी कुटुंबे आणि निराधार मुलांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधताना त्यांनी एल निनोच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीचा आढावा घेतला. शेतीतील अडचणी, गावांमधील समस्या आणि त्यावरील संभाव्य उपाययोजनांबाबत चर्चा केली.यावेळी राज्यमंत्री नाईक यांनी निराधार मुलांसोबत फटाके फोडून त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा प्रयत्न केला. ज्येष्ठ नागरिकांना ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि पुसदच्या नगराध्यक्ष मोहिनी नाईक यांच्या हस्ते शेतकरी कुटुंबांना आनंदाचा शिधा, दिवाळी फराळ आणि विविध गोड पदार्थांचे वाटप करण्यात आले.

मृद व जलसंधारण मंत्री तथा यवतमाळचे पालकमंत्री संजय राठोड यांनी ऊसतोड कामगारांच्या तांड्यावर जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी केवळ शिधा वाटपापुरता कार्यक्रम मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष ऊसाच्या फडात उतरून कोयत्याने ऊसतोडणीचा अनुभव घेतला. कामगारांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. ऊसतोड कामगार महामंडळाच्या माध्यमातून मिळणाऱ्या सुविधांचा लाभ कामगारांपर्यंत पोहोचतो की नाही, याची माहिती घेतली. कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासोबतच कामाच्या ठिकाणी सुरक्षेसाठी बूट, हातमोजे आणि अन्य आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले. महामंडळाकडे नोंदणी नसल्यामुळे पात्र कामगार शासकीय योजनांपासून वंचित राहू नयेत, यासाठी विशेष नोंदणी मोहीम राबविण्याबाबतही त्यांनी पुढाकार घेण्याचे सूचित केले. कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शाळा, वसतिगृह आणि आरोग्य सुविधांचा प्रश्नही यावेळी चर्चेत आला. दिवाळीच्या झगमगाटापासून दूर असलेल्या या घटकांपर्यंत सणाचा आनंद पोहोचविण्याचे या तिन्ही भेटींचे स्वरूप होते. या भेटींमधून मिळणारा आनंद काही काळापुरता असला, तरी त्यातून पुढे आलेले प्रश्न मात्र कायमस्वरूपी असल्याचे वंचित घटकांनी सांगितले. शेतकरी, ऊसतोड कामगार आणि आदिम आदिवासी बांधवांच्या आयुष्यात खऱ्या अर्थाने प्रकाश यायचा असेल, तर या संवादाचे रूपांतर ठोस निर्णय आणि प्रत्यक्ष सुविधांमध्ये होणेही तितकेच महत्त्वाचे असल्याच्या प्रतिक्रिया तिन्ही मंत्र्यांच्या या दिवाळीनंतर जिल्ह्यात उमटत आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

प्रदूषणाचा धोका

गेल्या काही वर्षांमध्ये राजधानी दिल्लीसह देशातील काही महानगरांत प्रदूषणाचे धुके हिवाळ्यातील जगणे नागरिकांसाठी दुष्कर बनवत आहे. हवेची शुद्धता मोजण्यासाठी एअर क्वालिटी इंडेक्स (एक्यूआय) म्हणजे हवेचा गुणवत्ता निर्देशांक हे एक प्रमाणित मोजमाप आहे. हवा किती स्वच्छ किंवा दूषित आहे आणि त्याचा मानवी शरीरावर काय परिणाम होऊ शकतो, हे दर्शवणारा हा एक एकीकृत आकडा असतो. भारतात हा निर्देशांक शून्य ते पाचशे या श्रेणीत विभागला आहे. शून्य ते ५० दरम्यानचा निर्देशांक 'उत्तम', ५१ ते १०० हा स्तर 'समाधानकारक', १०१ ते २०० हा निर्देशांक 'मध्यम'; तर २०१ ते ३०० श्रेणीतील हवा 'खराब', ३०१ ते ४०० दरम्यानचा स्तर 'अत्यंत खराब' आणि ४०१ ते ५०० दरम्यानचा निर्देशांक 'गंभीर किंवा अतिधोकादायक' मानला जातो. यंदा नोव्हेंबरच्या सुरुवातीला दिल्लीत एक्यूआय ३६६ ते ४०० इतका नोंदवला गेला असून, काही भागांत तो चारशेच्या पुढे पोहोचला. दिवाळीत फटाक्यांच्या आतषबाजीमुळे दिल्लीच्या वायूप्रदूषणात मोठी वाढ झाली. वाहनांमधून निघणारा धूर आणि हवामानातील बदलांमुळे धूरकट वातावरण निर्माण झाले. परिणामी, दिल्लीत श्वास घेणेही कठीण बनले. प्रदूषणाची तीव्रता वाढल्याने शाळांवर निर्बंध आणि बांधकामांसह विविध उपक्रमांवर मर्यादा घालण्याची वेळ प्रशासनावर आली. दिल्लीकरांना दरवर्षी अशा परिस्थितीला सामोरे जावे लागत असेल, तर हा प्रश्न केवळ ऋतुमानातील बदलाचा नाही. शहर नियोजन, औद्योगिक विकास, सार्वजनिक आरोग्य आणि पर्यावरणीय व्यवस्थापनातील त्रुटींचा एकत्रित विचार यासंदर्भात करावा लागेल. याबाबत सर्वोच्च न्यायालयानेही वारंवार प्रशासनाला, नागरिकांना सूचना केल्या. दिल्लीलगतच्या राज्यांत जाळण्यात येणाऱ्या परालीमुळे हे संकट ओढावत असल्याची टीका काही वर्षांपूर्वी व्हायची. यंदा या प्रदूषणाचा वाटा १४ टक्के असल्याचे समोर आले. त्यामुळे दिल्ली, हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेश यांनी परस्परांवर दोषारोप करण्याऐवजी संयुक्त पर्यावरणीय व्यवस्थापन स्वीकारणे आवश्यक आहे. इकडे देशाची आर्थिक राजधानी मुंबईतही ऐन दिवाळीत रविवारी एक्यूआय दुपारी एक वाजेपर्यंत १३१ इतका होता; मात्र, नऊ तासांमध्ये हाच आकडा २७८ च्या पातळीवर गेला. गेल्या वर्षी हा आकडा १९४ होता; तर २०२४ मध्ये १८१ आणि २०२३ मध्ये १४९ इतका होता. समुद्री वाऱ्यामुळे मुंबईत प्रदूषित हवा दूरवर पसरते, त्यामुळे दिल्लीसारखी प्रदूषणाची गंभीर परिस्थिती मुंबईत निर्माण होणार नाही, असा समज दीर्घकाळ प्रचलित होता. मात्र, वाढती वाहनसंख्या, अखंड बांधकामे, रस्त्यांवरील धूळ आणि औद्योगिक उत्सर्जन यामुळे हा समज चुकीचा ठरत आहे. समुद्रातील क्षारकणांचाही मुंबईच्या हवेतील सूक्ष्म कणांमध्ये वाटा असतो. बांधकाम साहित्याची उघड्यावर वाहतूक, अपुरे आच्छादन आणि रस्त्यांवर साचलेली धूळ वाहनांच्या हालचालींमुळे पुन्हा हवेत उडते. यामध्ये पीएम १० आणि पीएम २.५ या सूक्ष्म कणांचा समावेश असतो. मुंबई महापालिकेच्या पर्यावरण स्थिती अहवालानुसार, शहरात १४ पैकी १३ निरीक्षण केंद्रांवर पीएम १० कणांची वार्षिक सरासरी राष्ट्रीय मर्यादेपेक्षा अधिक नोंदवली गेली. हिवाळ्यात जमिनीजवळील हवा अधिक थंड होते, तर तिच्या वरच्या स्तरातील हवा तुलनेने उष्ण राहते. त्यामुळे जमिनीलगतची प्रदूषित हवा वर जाऊन वातावरणात मिसळण्यास अडथळा निर्माण होतो. परिणामी, धूर आणि अतिसूक्ष्म प्रदूषक कण जमिनीजवळ साचतात. या विशिष्ट स्थितीमुळे दिल्लीतील प्रदूषणाची तीव्रता हिवाळ्यात अधिक वाढते. याला टेम्परेचर इनव्हर्जन म्हणतात. प्रदूषणाचा सर्वाधिक घातक घटक म्हणजे पीएम २.५ या अतिसूक्ष्म कणांचे वाढते प्रमाण. श्वसनाद्वारे हे कण फुफ्फुसांत पोहोचू शकतात. दीर्घकाळ अशा प्रदूषणात राहिल्यास श्वसनविकारासह फुफ्फुसांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होण्याचा धोका वाढतो. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती अशा वातावरणात अधिक असुरक्षित बनतात. त्यामुळे हवेची गुणवत्ता हा पर्यावरणाबरोबरच सार्वजनिक आरोग्याशी थेट संबंधित प्रश्न आहे. स्वच्छ हवा हा नागरिकांचा मूलभूत जीवनाधिकार आहे. राजधानीतील नागरिकांना सुरक्षित श्वास घेण्यासाठीही प्रशासनाच्या आणीबाणीच्या उपाययोजनांवर अवलंबून राहावे लागत असेल, तर विकासाच्या प्रचलित संकल्पनेचाच फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. तुर्कियेमध्ये सुरू असलेल्या ३१ व्या हवामान बदल परिषदेमध्ये पृथ्वीचा उष्णता शोषून घेण्याचा वेग अभूतपूर्व पातळीवर पोहोचल्याचा गंभीर इशारा देण्यात आला आहे. हवामान बदलामुळे आधीच कमालीची तापलेली पृथ्वी आणि महाकाय अल निनोचे सावट यांच्या भीषण मिलाफामुळे जगाने टोकाच्या हवामान बदलांच्या नव्या युगात प्रवेश केला आहे, असा इशारा संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँतोनियो गुतारेस यांनी दिला आहे. हवामानाचे जुने विक्रम मोडीत निघत असून मानवी हानी वेगाने वाढत आहे. ज्या राष्ट्रांचा या प्रदूषणात सर्वात कमी वाटा आहे, त्यांनाच या विनाशाचा पहिला व सर्वाधिक तडाखा बसत आहे. भारतातील अनेक शहरांवर दाटून येणारे प्रदूषणाचे धुके आर्थिक समस्याही निर्माण करत आहेत. प्रदूषित हवेमुळे ग्राहक खरेदीसाठी बाहेर पडत नाहीत. दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रासारख्या (एनसीआर) ठिकाणी दरवर्षी या काळात लागू होणाऱ्या बांधकाम बंदीचा फटका या क्षेत्राबरोबरच इतर अनेक जोडउद्योगांनाही बसतो. दिल्लीमध्ये दररोज सुमारे पावणेदोन लाखांहून अधिक वाहनांच्या माध्यमातून दहा लाख टन मालाची वाहतूक होते. दरवर्षी वाहतूक बंदीमुळे ही संपूर्ण व्यवस्था विस्कळीत होते. ताजी फळे, भाज्या व बांधकाम साहित्याची टंचाई निर्माण होते. पर्यायाने वाहतूक खर्च वाढतो. कामगारांची घटलेली उत्पादकता, आरोग्यावरील प्रचंड खर्च आणि अकाली मृत्यू यांचा एकत्रित विचार केला तर या प्रदूषणामुळे देशाच्या जीडीपीला तब्बल ९.५ टक्क्यांपर्यंतचा वार्षिक फटका बसू शकतो, अशी भीती एका अहवालातून व्यक्त केली आहे. विकासाला विरोध करणे हा प्रदूषणावरील उपाय नाही. त्याऐवजी विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर पर्यावरणीय जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. विकासाची किंमत नागरिकांनी आरोग्यातून चुकवावी, हे स्वीकारार्ह नाही. पर्यावरणाचा समतोल राखल्याशिवाय कोणताही विकास दीर्घकाळ टिकू शकत नाही, हे शाश्वत विकासाच्या तत्त्वज्ञानाचे मूलभूत सूत्र आहे. त्यामुळे विकासप्रकल्पांना मंजुरी देताना केवळ आर्थिक गुंतवणूक आणि अपेक्षित उत्पन्न विचारात न घेता त्यांच्या पर्यावरणीय परिणामांचेही वस्तुनिष्ठ मूल्यमापन झाले पाहिजे. दिल्ली-मुंबईसारख्या महानगरात वाढती लोकसंख्या, मर्यादित भौगोलिक क्षेत्र आणि पायाभूत सुविधांवरील प्रचंड ताण लक्षात घेता पर्यावरणाकडे दुर्लक्ष करणे परवडणारे नाही. याबाबत नागरिकांची जबाबदारीही मोठी आहे. प्रदूषणाला हातभार लावणाऱ्या फटाक्यांची तुफान आतषबाजी करायची आणि दूषित हवेचे सर्व खापर शासनावर फोडायचे, हे समर्थनीय कसे असू शकेल? प्रचंड उष्णतेचा सामना करूनही, ऐतिहासिक दुष्काळाचे संकट ओढावूनही आणि मानवी अस्तित्वाचा प्रश्न उद्भवूनही आपल्याला जाग का येत नाही, हा खरा प्रश्न आहे

शेतकऱ्यांनो, हीच वेळ आहे सरकारला जाब विचारायची!

एक हंगाम बिघडला की त्याचा फटका पुढच्या पेरणीला, घरखर्चाला आणि मुलांच्या शिक्षणालाही बसतो. प्रत्येक शेताची अडचण वेगळी असली, तरी हे प्रश्न आपल्याला एकत्र आणतात. म्हणूनच आता गावागावांतून एकत्र या. आपल्या शेतातली परिस्थिती, नुकसानीचा हिशेब आणि मागण्यांचे निवेदन घेऊन शांततेने रस्त्यावर उतरा...



एक हंगाम बिघडला की त्याचा फटका पुढच्या पेरणीला, घरखर्चाला आणि मुलांच्या शिक्षणालाही बसतो. प्रत्येक शेताची अडचण वेगळी असली, तरी हे प्रश्न आपल्याला एकत्र आणतात. म्हणूनच आता गावा गावांतून एकत्र या. आपल्या शेतातली परिस्थिती, नुकसानीचा हिशेब आणि मागण्यांचे निवेदन घेऊन शांततेने रस्त्यावर उतरा...

माझ्या शेतकरी बांधवांनो आणि मायबहिणींनो, या हंगामाचा हिशेब डोळ्यांसमोर आणा. बियाणे, खत आणि मजुरीसाठी पेरणीच्या आधीच पैसा मोजला. पावसाने खंड दिल्यावर पीक वाचवण्यासाठी विहिरीवर धाव घेतली. वीज आली तेव्हा मोटार चालेल एवढा दाब मिळेल का, याची काळजी. उभ्या पिकाला वन्यप्राण्यांपासून वाचवण्यासाठी रात्रभर पहारा. एवढे करून माल हातात आला, तरी बारमाही रस्त्याअभावी तो शेतातून बाजारात कसा नेणार? बाजार गाठल्यावर आयात-निर्यातीच्या निर्णयांचा भावावर काय परिणाम होईल, याची धास्ती. यापैकी किती गोष्टींचा निर्णय आपल्या हातात आहे?

एक हंगाम बिघडला की त्याचा फटका पुढच्या पेरणीला, घरखर्चाला आणि मुलांच्या शिक्षणालाही बसतो. प्रत्येक शेताची अडचण वेगळी असली, तरी हे प्रश्न आपल्याला एकत्र आणतात. म्हणूनच आता गावा गावांतून एकत्र या. आपल्या शेतातली परिस्थिती, नुकसानीचा हिशेब आणि मागण्यांचे निवेदन घेऊन शांततेने रस्त्यावर उतरा. सरकारकडे प्रत्येक प्रश्नाचे लेखी उत्तर आणि काम पूर्ण करण्याची तारीख मागा.

आयात-निर्यात धोरणाचा हिशेब द्या

शेतकरी पेरणी करताना बियाणे निवडतो, खर्चाचा अंदाज घेतो आणि मालाला किती भाव मिळू शकेल याचा अंदाज घेऊन किती कर्ज घ्यायचे ते ठरवतो. कापूस, सोयाबीन किंवा कांदा बाजारात येण्याच्या काळात आयातीचा निर्णय झाला किंवा निर्यातीवर अचानक निर्बंध आले, तर हा सगळा हिशेब बदलू शकतो. खरेदी थांबू शकते आणि भाव पडू शकतो. कर्जाचा हप्ता तोंडावर असताना शेतकरी आपला माल किती दिवस थांबवणार? निर्णय घेताना त्याच्या या परिस्थितीचा विचार कुठे केला जातो?

केंद्र सरकारला विचारा, आयात करण्यापूर्वी देशातले उत्पादन, उपलब्धसाठा आणि बाजारात येणाऱ्या नव्या मालाचा अंदाज घेतला का? निर्यातीवर निर्बंध घालण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर होणारा परिणाम तपासला का? त्याचा हिशेब जाहीर करा. पेरणीपूर्वी धोरणाची दिशा स्पष्ट करा आणि बदल करावा लागल्यास त्यामागची कारणे, कालावधी आणि अपेक्षित परिणाम सार्वजनिक करा. शेतकऱ्यांना देशांतर्गत आणि परदेशी बाजारात माल विकण्याचे स्वातंत्र्य द्या. बाजाराचा अंदाज घेता आला, तर पीक निवड, साठवणूक आणि विक्री यांचे निर्णय शेतकऱ्यांना स्वतः घेता येतील.

प्रत्येक पिकाची बाजारपेठ वेगळी असते. त्यामुळे निर्णय घेण्याआधी त्या पिकाचे उत्पादक, शेतकरी संघटना आणि शेतकरी उत्पादक कंपन्या यांचे म्हणणे ऐका. चर्चेत कोणते आक्षेप मांडले गेले आणि त्यावर सरकारने काय ठरवले, हे प्रसिद्ध करा. निर्णयानंतर उत्पादन क्षेत्रांतील भावांवर काय परिणाम झाला, याचाही आढावा घ्या.

कोरड्या दुष्काळात मदतीची तारीख सांगा

गावात पेरणीपुरता पाऊस पडला, तरी पुढे फुलोऱ्यात किंवा दाणे भरण्याच्या काळात मोठा खंड पडला, तर उत्पादनात मोठी घट येऊ शकते. सोयाबीनचे शेत दूरून हिरवे दिसू शकते. बांधावर उतरून शेंगा उघडल्या की त्यात दाणे किती भरलेत ते कळतं. एका भागात पाऊस झाला आणि दुसऱ्या भागात पिके करपली, तर तालुक्याची सरासरी या दोन शेतांमधला फरक कसा दाखवणार? शेतकऱ्याला झालेलं नुकसान समजून घ्यायचे असेल, तर पाहणी बांधावर जाऊन करावी लागेल.

गावनिहाय आणि पीकनिहाय नुकसान तपासा. पंचनाम्याची प्रत शेतकऱ्याला द्या आणि नोंदीत चूक असेल तर दुरुस्ती कुठे मागायची ते सांगा. किती मदत मंजूर झाली आणि ती खात्यात कधी जमा होईल, याची माहिती प्रत्येक पात्र शेतकऱ्याला द्या. पीकविम्याच्या दाव्यांची स्थिती स्पष्ट करा आणि प्रलंबित दावे निकाली काढण्याची मुदत ठरवा. जिथे चारा आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे, तिथे गावनिहाय व्यवस्था करा. पुढच्या पेरणीसाठी पैसा उभा करता यावा म्हणून नुकसानग्रस्तांच्या पीककर्जाच्या हप्त्यांचा फेरविचार करा. अंतिम पाहणीला वेळ लागणार असेल, तर जिथे नुकसान स्पष्ट आहे तिथे तातडीची अंतरिम मदत द्या.

मदत ठरवताना बियाणे, खत, मजुरी आणि मशागतीवर झालेला खर्च लक्षात घ्या. पाहणी किती क्षेत्रावर झाली आणि कोणते शिवार बाकी आहे, ते गावाला कळवा. अर्ज भरताना किंवा कागदपत्रे जोडताना अडचण येत असेल, तर गावातच ठरावीक दिवशी अर्ज आणि दुरुस्त्या स्वीकारण्याची व्यवस्था करा.

वन्यप्राण्यांपासून पीक आणि माणसांचं रक्षण करा

दिवसभर राबून रात्री पुन्हा शेतात पहारा देणाऱ्या कुटुंबाला विचारा, रानडुकरांचा कळप शेतात शिरला की काय होते. उभे पीक तुडवले जाते, काढणीला आलेला माल उद्ध्वस्त होतो आणि त्या पिकावर केलेला खर्च एका रात्रीत वाया जातो. वारंवार नुकसान होणाऱ्या शिवारात रात्रीचा पहारा देताना माणसांच्या जिवाचीही चिंता असते. नुकसान झाल्यावर तक्रार करायची कुठे, पाहणीला कोण येणार आणि ती किती दिवसांत होणार, याची स्पष्ट माहिती प्रत्येक गावाला हवी. पाहणीला उशीर झाला तर नुकसानीच्या खुणा पुसल्या जाऊ शकतात आणि पुढची मशागतही अडते. शेतकऱ्याने पाठवलेल्या फोटोंसह नुकसानीची तारीख आणि शेताचं ठिकाण नोंदवा. नुकसान मोजताना पिकाची अवस्था आणि क्षेत्र लक्षात घ्या. भरपाई किती आणि कशी ठरली, हे शेतकऱ्याला कळवा.

वन विभाग आणि कृषी विभागाने वारंवार नुकसान होणारी शिवारे एकत्र पाहावीत. गावकऱ्यांशी चर्चा करून सुरक्षित सामूहिक कुंपण, वन्यप्राण्यांची हालचाल कळवण्याची व्यवस्था आणि तातडीचा संपर्क क्रमांक उपलब्ध करून द्यावा. नुकसानीची नोंद, पाहणी आणि भरपाईचे वेळापत्रक जाहीर करावं. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात माणूस जखमी झाल्यास तातडीची मदत कुठून मिळेल, हेही ग्रामपंचायतीत स्पष्टपणे लावावं. शेतात पुन्हा पेरणी करण्याचा निर्णय घेताना त्या कुटुंबाला आपल्या पिकाच्या संरक्षणाची खात्री वाटली पाहिजे.

शेतापर्यंत बारमाही रस्ता द्या

शेताचा रस्ता पावसात चिखलात गेला की खताची पोती डोक्यावरून न्यावी लागतात. काढणीच्या दिवशी ट्रॅक्टर शेतापर्यंत येऊ शकला नाही, तर मजुरी आणि वाहतुकीचा खर्च वाढतो. भाजीपाला किंवा इतर नाशवंत माल वेळेत बाजारात पोचला, तरच त्याला चांगला भाव मिळण्याची संधी असते. शेतात एखादी आपत्कालीन परिस्थिती उद्भवली, तर वाहन पोचण्यासाठीही हाच रस्ता लागतो. एखाद्या गावात मुख्य रस्ता चांगला झाला, तरी गावापासून शिवारात जाणाऱ्या वाटांची अवस्था वेगळी असू शकते.

गावच्या नकाशावर शेतरस्ते आणि पाणंद रस्ते दाखवा. जिथे वाट बंद झाली आहे किंवा तिच्यावर वाद आहेत, तिथे मोजणी करा आणि संबंधितांचे म्हणणे ऐकून प्रकरणांचा निपटारा करा. ज्या मार्गावर दर पावसाळ्यात पाणी साचते, तिथे निचऱ्यासह बारमाही वाहतुकीची सोय करा. किती रस्त्यांना मंजुरी मिळाली, निधी किती आहे आणि कोणते काम कधी पूर्ण होणार, याची यादी ग्रामसभेसमोर ठेवा. पावसाळ्याआधी कोणते रस्ते वाहतुकीसाठी खुले होतील, याचे उत्तर संबंधित विभागाने गावकऱ्यांना द्यावे.

एका पाणंद रस्त्याचा उपयोग अनेक शेतकऱ्यांना होतो. सर्वाधिक शेतांना जोडणारे आणि पावसाळ्यात वारंवार बंद पडणारे रस्ते गावकऱ्यांच्या सल्ल्याने आधी हाती घ्या. रस्त्याचं काम पूर्ण झाल्यावर शेतीची वाहनं त्यावरून प्रत्यक्ष जाऊ शकतात का, हे गावकऱ्यांसोबत पाहा. पुढच्या पावसाआधी देखभालीची जबाबदारीही निश्चित करा.

शेतीला दिवसा आणि पुरेशा दाबाने वीज द्या

विहिरीत पाणी असूनही कमी दाबामुळे मोटार चालत नसेल, तर पिकाला पाणी कसे द्यायचे? वीज मध्यरात्री आली, तर अंधारात शेत गाठावे लागते. रोहित्र वारंवार बिघडले किंवा पुरवठा खंडित झाला, तर पिकाला पाणी देण्याची वेळ चुकते. मोटार बिघडली, तर दुरुस्तीचा खर्च आणि पाणी उशिरा दिल्याने पिकाचे नुकसान, दोन्ही शेतकऱ्यालाच सोसावे लागते. पुरवठ्याची वेळ ठरलेली असेल, तर मजूर, पाणी आणि शेतातली बाकीची कामं यांचं नियोजन करता येतं.

वीज वितरण यंत्रणेला विचारा, आपल्या गावच्या कृषी वीजवाहिनीची शेवटची तपासणी कधी झाली? कमी दाबाच्या तक्रारी असलेल्या ठिकाणी प्रत्यक्ष मोजमाप करा. रोहित्रावर भार जास्त असेल तर त्याची क्षमता वाढवा आणि जीर्ण वाहिन्यांची दुरुस्ती करा. शेतीपंपांना दिवसा, निश्चित वेळेत आणि योग्य दाबाने वीजपुरवठा करण्याचे गावनिहाय वेळापत्रक द्या. बिघाडाची तक्रार नोंदवल्यावर तिचा क्रमांक आणि दुरुस्तीची अपेक्षित वेळ कळवा. ज्या गावांत तक्रारी वारंवार येतात, तिथे दुरुस्तीचे काम कोणत्या तारखेपर्यंत पूर्ण करणार, हे लेखी सांगा.

पिकांना पाण्याची गरज वाढते त्या काळात कोणत्या वीजवाहिनीवर भार वाढू शकतो, हे आधी तपासा. बिघाड झाल्यास लागणारे सुटे भाग आणि बदली रोहित्र जवळच्या केंद्रावर तयार ठेवा. कृषी वीजवाहिनी बंद पडली, तर किती शेतांचा पुरवठा किती वेळ खंडित झाला, याची नोंद ठेवा.

शेतीच्या पाण्याचे नियोजन गावासमोर ठेवा

पिकाला पाणी नेमके कधी मिळते, यावर उत्पादन अवलंबून असते, कालव्याचे आवर्तन वेळेत जाहीर झाले, तर त्यानुसार शेतकरी पीक आणि पेरणीचे नियोजन करू शकतो. कालव्याच्या सुरुवातीला असलेल्या शेताला पाणी मिळाले, तरी शेवटच्या टोकापर्यंत ते पोचले का, याची प्रत्यक्ष पाहणी हवी. पावसावर अवलंबून असलेल्या गावात शेततळे, बांधबंदिस्ती किंवा पाणी जमिनीत मुरवण्याच्या कामांपैकी कोणत्या कामाचा उपयोग होईल, हे त्या गावच्या भूप्रदेशानुसार ठरवावे लागते.

उपलब्ध पाणीसाठा, शेतीसाठी ठरवलेले वाटप आणि आवर्तनांच्या तारखा जाहीर करा. कालव्याची गळती थांबवण्याचे आणि बंद पाट पुन्हा सुरू करण्याचे वेळापत्रक द्या. ज्या गावांना सिंचनाची सोय हवी आहे, तिथे पाणलोटाची पाहणी करून योग्य कामांचा आराखडा ग्रामसभेसमोर मांडा. आधी मंजूर झालेल्या कामांची सध्याची स्थिती सांगा. काम झाल्यावर किती शेतांपर्यंत पाणी पोचले , याची माहिती प्रत्यक्ष लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांकडून पडताळा. पुढील हंगामात कोणत्या गावाला कोणत्या कामाचा फायदा मिळेल, हे प्रशासनाने पेरणीपूर्वी स्पष्ट करावे, पाणीसाठा कमी असेल, तर कोणत्या निकषांवर वाटप होईल, हे संबंधित गावांना आधीच कळवा. आवर्तनाच्या वेळी कालव्याच्या टोकापर्यंत पाणी पोचलं नसेल, तर तक्रार घेणारा अधिकारी कोण आणि पुढच्या आवर्तनाआधी कोणती दुरुस्ती होणार, याची माहिती द्या.

मायबहिणींनो, मागण्या मांडण्यात पुढे या

पेरणीपासून काढणीपर्यंत राबणाऱ्या, जनावरांची देखभाल करणाऱ्या आणि उत्पन्न कमी झाले की घरखर्चाचा मेळ बसवणाऱ्या मायबहिणींना संकटाचा संपूर्ण हिशेब ठाऊक असतो. पाण्यासाठी किती फेऱ्या वाढल्या, मजुरीचा खर्च कुठे वाढला आणि पीक गेल्यावर घरात कोणत्या खर्चाला कात्री लावावी लागली, हे त्या नेमके सांगू शकतात. मायबहिणींनो, ग्रामसभेत स्वतःचा अनुभव मांडा आणि सरकारला जाब विचारणाऱ्या शिष्टमंडळात पुढे या. प्रत्यक्ष शेती करणाऱ्या महिलांचे आणि भाडेतत्त्वावर शेती कसणाऱ्यांचे नुकसान कसे नोंदवणार, हा प्रश्नही निवेदनात घ्या. तरुणांनी तक्रारी, नुकसानग्रस्त शिवारे आणि मंजूर कामांची स्थिती नोंदवावी. त्या नोंदींमुळे गावाचं म्हणणं अधिक नेमकेपणाने मांडता येईल.

गावातून मागणी उभी करा आणि लेखी उत्तर मिळवा

ग्रामसभेत आपल्या गावातील प्रश्नांना प्राधान्यक्रम द्या. कुठे पाणंद रस्ता खंडित आहे, कोणत्या शिवारात वन्यप्राण्यांचा वारंवार उपद्रव होतो, कोणत्या रोहित्रावर कमी दाबाची तक्रार आहे आणि कोणत्या भागात दुष्काळी पाहणी बाकी आहे, हे ठिकाणासह नोंदवा. या नोंदींचं एकत्रित निवेदन तहसील आणि जिल्हा प्रशासनाकडे द्या. आयात-निर्यात धोरणाचे प्रश्न केंद्र सरकारपर्यंत पोचवण्यासाठी लोक प्रतिनिधींना त्यावर भूमिका मांडायला सांगा. प्रत्येक मागणीसमोर जबाबदार विभाग, ठरलेली कृती आणि अंतिम तारीख लेखी मागा.

शांततापूर्ण मोर्चा, धरणे आणि शिष्टमंडळाच्या माध्यमातून आपली बाजू ठामपणे मांडा. निवेदन दिल्यानंतर गावात बैठक घेऊन काय उत्तर आले ते सगळ्यांना सांगा. ज्या कामाची मुदत दिली आहे, ते वेळेत पूर्ण झाले का ते तपासा. ज्या प्रश्नावर उत्तर बाकी आहे, तो पुन्हा संबंधित अधिकाऱ्यासमोर ठेवा. गावोगावच्या नोंदी तालुक्यात एकत्र आल्या, तर कोणती अडचण एका शिवारापुरती आहे आणि कोणत्या प्रश्नासाठी जिल्हाभर निर्णय हवा, हे स्पष्ट होईल.

शेतकरी बांधवांनो आणि मायबहिणींनो, हीच वेळ आहे. पेटून उठा. आपल्या शेतात काय घडतेय ते आपल्या शब्दांत सांगा. एकमेकांच्या गावातल्या प्रश्नांना साथ द्या. पेरणीपूर्वी स्पष्ट आयात-निर्यात धोरण, दुष्काळात बेळेवर मदत, वन्यप्राण्यांपासून संरक्षण, शेतापर्यंत बारमाही रस्ता, दिवसा पुरेशा दाबाची वीज आणि पिकाला वेळेवर पाणी या मागण्या घेऊन एकजुटीने रस्त्यावर उतरा. सरकारला ठामपणे विचारा, 'आमच्या प्रत्येक प्रश्नावर तुम्ही कोणता निर्णय घेणार आणि तो कोणत्या तारखेपर्यंत अमलात आणणार?'

विलास तुळशीराम ताथोड
राज्य कार्यकारणी सदस्य
शेतकरी संघटना अकोला
मो नं ९३७२४४०६६३

फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे मुंबईत अग्निकल्लोळ!

सणासुदीच्या काळात मुंबई व परिक्षेत्रात कमालीचे वाढलेले वायू प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाने फटाके फोडण्यावर काही निर्बंध व नियम लागू केले होते. मात्र नेहमीप्रमाणे यंदाही मुंबईत फटाकेबंदी पायदळी तुडवण्यात आली. उच्च न्यायालयाचे आदेश आणि पोलिसांची नियमावली कागदावरच राहिली आणि प्रत्यक्षात शहरात रात्री उशिरापर्यंत बेधुंदपणे सुरु असलेल्या फटाक्यांच्या आतिषबाजीमुळे मुंबईला भीषण अग्निकल्लोळाचा सामना करावा लागला. फटाक्यांमुळे उडालेल्या आगडोंबामुळे एकाच दिवशी मुंबईत १३७ आगीच्या घटना घडल्या. तसेच ठाणे, भिवंडी, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई आणि भाईंदर परिसरातही दिवाळीच्या पहिल्या रात्री फटाक्यांमुळे आगीच्या अनेक घटना घडल्या. दरवर्षी वाढत्या जीवघेण्या प्रदूषणाच्या पार्श्वभूमीवर फटाकेबंदीचे आदेश दिले जातात. 'आम्ही नाही सुधारणार, बंदी असली तरी फटाके वाजवणारच' अशी कायद्याला आव्हान देणारी उर्मट मनोवृत्ती बाळगणारे आणि आपल्या निष्काळजीपणामुळे मोठी आग लागून इतरांच्या जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण करणाऱ्या या अविचारी आणि अविवेकी लोकांवर प्रशासनाने कडक कारवाई करणे गरजेचे आहे.

प्रदीप मोरे

'कोण म्हणतो महागाई वाढली?'

सालाबादप्रमाणे यंदाही देशभरात दीपावली उत्साहात साजरी झाली. राज्यावर दुष्काळाचे संकट आणि महागाईचा भस्मासूर असतानाही दिवाळीवर त्याचा काहीच परिणाम झाला नाही. रोज महागाईच्या नावाने बोंबा मारणाऱ्या नागरिकांनी यंदा यथेच्छ खरेदी करून 'कोण म्हणतो महागाई वाढली?' असा प्रश्नच उभा केला. कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्सच्या अंदाजानुसार यंदाच्या दिवाळीत देशभरात ६ ते ७ लाख कोटी रुपयांची विक्रमी उलाढाल झाली. यात सुमारे ५.४० लाख कोटी रुपयांचा वस्तूंचा व्यापार आणि ६५ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त सेवा क्षेत्रातील उलाढाल आहे. दिल्लीत एकट्या दिवाळी हंगामात ८० हजार ते १ लाख कोटी, मुंबईत धनत्रयोदशीच्या एकाच दिवशी सराफा बाजारात ६,५०० कोटी, पुण्यात ५ हजार कोटी, नागपुरात ४.५ हजार कोटी, नाशिकमध्ये ८०० कोटी आणि अमरावतीत अंदाजे ५० कोटींची उलाढाल झाली. एकीकडे हा उत्साह होता, तर दुसरीकडे फटाके आणि दिव्यांच्या निष्काळजीपणामुळे राज्यात शेकडो आगीच्या घटना घडून या उत्सवावर विरजण पडले.

नागपुरातील साई डायनामिक्स शोरूमला आग लागून ५० दुचाकी जळून खाक झाल्या. नाशिकमधील आर. के. ट्रेडर्सच्या गोदामात कोट्यवधींचा माल जळाला. मुंबई-ठाण्यात १४० आगीच्या घटना घडल्या, त्यातील १३७ केवळ फटाक्यांमुळे होत्या. लोखंडवाल्यातील ३२ मजली इमारतीला लागलेल्या आगीत एका ५६ वर्षीय सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला. ठाण्यातील कार्लाय इमारतीत रॉकेटमुळे लागलेली आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाला ६ तास लागले. पुण्यात ८१ तर पिंपरी-चिंचवडमध्ये ५१ आगींच्या घटना नोंदवल्या गेल्या. सर्वात हृदयद्रावक घटना धाराशिव जिल्ह्यातील येडशी गावात घडली. पणतीमुळे लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील ६ जणांचा होरपळून मृत्यू झाला. दिवाळीचे अजून दोन दिवस बाकी असल्याने आगींच्या घटनांत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. फटाक्यांमुळे हवेची गुणवत्ताही प्रचंड खालावली. नागपूरचा हवेचा गुणवत्ता निर्देशांक २३९, पुण्याचा २२१, मुंबईचा १७१ वर गेला. पुण्यातील कोंढव्यात ४१७ तर वानवडीत ५१७ पर्यंत निर्देशांक गेला. मुंबईत रात्रीच्या वेळी काही ठिकाणी ४०० ते ४५० चा टप्पा ओलांडला गेला. इश्र २.५ आणि इश्र १० चे प्रमाण वाढल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दम्याच्या रुग्णांना श्वसनाचा त्रास, डोळ्यांची जळजळ आणि खोकला सुरू झाला आहे. पुन्हा एन-९५ मास्क लावण्याची वेळ आली आहे.

दरवर्षी न्यायालय फटाके फोडण्याची वेळ ठरवून देते. प्रशासन साधेपणाने दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करते. पण आपण 'नळी फुंकिली सोनारे, इकडून तिकडून गेले वारे' ही वृत्ती सोडायला तयार नाही. कायदे कागदावरच राहिले आहेत. प्रशासन वर्षाचे १२ महिने सुस्त असल्याने त्याची अंमलबजावणी होत नाही.

प्रदीप व्ही. खोलमकर,
नाशिक

बुधवार, दि. ११ नोव्हेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

धरण उशाला अण,कोरड घशाला.!

हक्काच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांचा पुसद-नागपूर महामार्गावर रास्तारोको!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. १० : पुसधरणातील पाणीसाठा स्थानिक शेतकऱ्यांच्या हक्काचा असून, पाण्याअभावी खरीप हंगामातील तूर, हळद, ऊस आणि फळबागा करपण्याच्या मार्गावर आहेत. "धरण उशाला आणि कोरड घशाला अशी परिस्थिती पुसद तालुक्यातील शेतकऱ्यांची झाली आहे".





अशा परिस्थितीत शेतकऱ्यांनी हक्काच्या पाण्यासाठी आंदोलन करावे लागत असल्याने संतप्त शेतकऱ्यांनी ९ नोव्हेंबर २०२६ रोजी दिवाळीच्या दिवशी पुसद-नागपूर महामार्गावरील जनता शिक्षण प्रसारक मंडळाच्या फार्मसी कॉलेज जवळ रास्ता रोको करून आंदोलन केले अत्यंत दुर्दैवी प्रकार आहे. पुस धरणातील पाणी इतर जिल्ह्यांना वळविण्याचा प्रयत्न झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही देण्यात आला. यावेळी आंदोलनाचे मार्गदर्शक मनीष जाधव म्हणाले की, धरणात पाणीसाठा उपलब्ध असतांना स्थानिक शेतकऱ्यांना पाण्यापासून वंचित ठेवणे अन्यायकारक आहे. या प्रश्नावर राजकारण न करता प्रशासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि तातडीने पाण्याची आवर्तने सोडण्याची व्यवस्था करावी. यावेळी शेतकऱ्यांनी तातडीने पाण्याचे आवर्तन सोडून करपणाऱ्या पिकांसह गुरे-ढोरांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, आवर्तन सुरू असतांना वीजपुरवठा खंडित करू नये तसेच शेवटच्या शेतकऱ्यापर्यंत पुरेशा दाबाने पाणी पोहोचेल, अशी व्यवस्था करावी, अशी मागणी केली. यासह इतर मागण्याही करण्यात आल्या. हे आंदोलन सर्वपक्षीय तसेच विविध सामाजिक संघटनांच्या सहभागातून करण्यात आले. यासाठी शेतकरी नेते मनीष जाधव नगरपरीषदेचे माजी पाणी सभापती राजू दुधे, माजी नगर सेवक अभय गडम, अरुण जाधव, विकास राठोड, अविनाश गायकवाड, प्रेमराव खरगर, दिलीप बेडे, रमेश जाधव, माधव पडघणे, किशोर राठोड (काटखेडा), दीपक गायकवाड यांच्यासह शेकडो कार्यकर्ते व शेतकरी बांधव उपस्थित होते. यावेळी पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी अमोल जाधव यांना पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेंद्र गर्जेंद्र क्षीरसागर यांना निवेदन देण्यात आले.

वरिष्ठांच्या आदेशानुसार रोटेशननुसार पाणी सोडू

दरम्यान पूस धरणातुन पाणी सोडले असल्याचे काही राजकीय क्षेत्रातील लोकांनी सांगितले असता त्या बाबत माहिती घेण्यासाठी पाटबंधारे विभागाचे उपविभागीय अधिकारी अमोल जाधव यांना संपर्क साधला असता पूस धरणातुन १५ नोव्हेंबर ला पाणी सोडणार असून आंदोलन कर्ते ६ रोटेशन मध्ये पाणी देण्याची मागणी करीत आहे. मात्र धरणातील पाणी साठा पाहता २ ते ३ रोटेशन पाणी देण्याचे नियोजन असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे.

दोन महिने उलटूनही साहिलच्या कुटुंबाला न्यायाची प्रतीक्षाच!

विधानसभा अधिवेशनादरम्यान मुख्यमंत्री यांच्या निवासा समोर आंदोलनाचा इशारा.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



यवतमाळ, दि. १० : मुंबईतील आयआयटीच्या वसतिगृहात गळफास घेऊन आत्महत्या केलेल्या यवतमाळच्या साहिल वाकोडे याच्या मृत्यूला दोन महिने उलटूनही कुटुंबीयांना न्याय मिळालेला नाही. या प्रकरणात अद्याप ठोस कारवाई झाल्याचा दावा परिजनांकडून केला जात नसल्याने कुटुंबाचा संताप वाढत आहे. तपास आणि कारवाईबाबतची प्रतीक्षा आता संपणार कधी, असा सवाल उपस्थित करीत साहिलचे वडील रवींद्र वाकोडे यांनी थेट आंदोलनाचा इशारा दिला आहे.

साहिल हा मुंबईतील आयआयटीमध्ये द्वितीय वर्षात शिक्षण घेत होता. दोन महिन्यांपूर्वी वसतिगृहात त्याने गळफास घेऊन जीवन संपविले. या घटनेने वाकोडे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. घटनेनंतर कुटुंबीयांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्याची मागणी केली होती. मात्र, दोन महिने उलटूनही अपेक्षित न्याय मिळत नसल्याची भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली आहे. दरम्यान, आगामी ७ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर रवींद्र वाकोडे यांनी आंदोलनाचा निर्धार व्यक्त केला आहे. संबंधित प्रकरणात लवकरात लवकर कारवाई करून न्याय न मिळाल्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे. साहिलच्या मृत्यूमागील परिस्थितीचा सखोल तपास, जबाबदारी निश्चित करणे आणि कुटुंबाला न्याय मिळवून देणे या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. दोन महिन्यांनंतरही कुटुंबाला न्यायासाठी आंदोलनाचा मार्ग स्वीकारावा लागत असेल, तर या प्रकरणातील तपासाच्या प्रगतीबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आहे.

थोडक्यात



सफाई कर्मचाऱ्यांना मिठाई वाटप करून शहर काँग्रेसतर्फे दिवाळी साजरी.

बाभुळगाव : शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्याचा सन्मान करून त्यांच्यासोबत दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यात आला. यावेळी या प्रसंगी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रकाशचंदजी छाजेड, आरोग्य सभापती तथा नगरसेवक शेख कादरभाई, नन्नाभाऊ महाजन, मुन्नाभाऊ छल्लाणी, नगरसेवक अक्षय राऊत, काँग्रेस शहराध्यक्ष प्रदीपभाऊ नांदुरकर, दैनिक नवराष्ट्रचे पत्रकार राजुभाऊ नवाडे, दैनिक दिव्य मराठीचे पत्रकार प्रविणभाऊ लांजेकर, दैनिक भास्करचे पत्रकार शहेजादभाई, अंकुशभाऊ सोयाम, निखिलजी गाडगे आदी उपस्थित होते.

नगर वाचनालयात उद्यापासून भव्य दिवाळी अंक प्रदर्शन

नगराध्यक्ष विद्याताई आत्राम यांच्या हस्ते उद्घाटन; वाचकांसाठी विविध विषयांवरील अंकांची मेजवानी

वणी : येथील नगर वाचनालय, वणीच्या वतीने बुधवार, ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता भव्य दिवाळी अंक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन नगर परिषदेच्या अध्यक्ष विद्याताई सचिन आत्राम यांच्या हस्ते होणार आहेत.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगर वाचनालयाचे अध्यक्ष तथा माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुरवार राहणार असून, प्रमुख अतिथी म्हणून नगर परिषदेचे उपाध्यक्ष राकेश बुग्गेवार उपस्थित राहणार आहेत.
या प्रदर्शनात महाराष्ट्रातील नामांकित साहित्यिकांचे वाचनीय दिवाळी अंक उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.साहित्य,आरोग्य, विनोद,महिला विशेष, ज्योतिष,आध्यात्म, रहस्यकथा,चित्रपट,पाककृती आणि पर्यटन अशा विविध विषयांवरील दिवाळी अंकांचा या प्रदर्शनात समावेश असणार आहे. त्यामुळे साहित्यप्रेमी,वाचनप्रेमी आणि विविध विषयांची आवड असलेल्या वाचकांसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे. दिवाळी अंकांच्या माध्यमातून समृद्ध साहित्यपरंपरेचा परिचय व्हावा,वाचनसंस्कृतीला चालना मिळावी आणि वाचकांना नव्या साहित्याची ओळख व्हावी,हा या प्रदर्शनामागील उद्देश आहे. वणी शहरातील नागरिकांनी या प्रदर्शनाला आवर्जून भेट देऊन साहित्याचा आनंद घ्यावा,असे आवाहन नगर वाचनालयाच्या वतीने करण्यात आला आहे.

मुकुटबनमध्ये अवैध दारू विक्रीचा संशय

वणी : वणी रोडवरील देशी दारू दुकानातून ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात पुरवठा होत असल्याचा नागरिकांचा आरोप।
अडेगाव, गणेशपुर,खडकी खातेरा परिसरातील गावांमध्ये दारू पोहोचत असल्याची चर्चा; पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह? झरी-मुकुटबन येथील वनी रोडवरील देशी दारू दुकानातून मोठ्या प्रमाणात दारूचा पुरवठा आळेगाव, गणेश यासह परिसरातील विविध गावांमध्ये केला जात असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे. ग्रामीण भागात दारू पोहोचवून विक्री केली जात असल्याची चर्चा असून, या प्रकारामुळे गावातील सामाजिक वातावरणावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता नागरिकांनी व्यक्त केली आहे. विशेष म्हणजे, शासनाने निर्धारित केलेल्या दरापेक्षा जास्त किमतीने दारू विकली जात असल्याचाही आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे ग्राहकांची आर्थिक लूट होत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. या संपूर्ण प्रकाराकडे स्थानिक पोलीस प्रशासन तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुर्लक्ष होत आहे का, असा सवाल आता नागरिक उपस्थित करीत आहेत.
संबंधित देशी दारू दुकानाची सखोल चौकशी करून दारूच्या साठ्याची, विक्रीच्या नोंदींची, वाहतुकीची आणि निर्धारित दरांची तपासणी करावी. आरोपांमध्ये तथ्य आढळल्यास संबंधितांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

निधन

सुनील चांडोळे यांचे निधन



बाभुळगाव : पंजाबराव देशमुख बँक, शाखा यवतमाळ येथे कार्यरत माजी शाखा व्यवस्थापक तथा बाभूळगाव शहराचे रहिवासी सुनील चांडोळे यांचे दि. ९ रोजी दुपारी १२.३० वाजताचे सुमारास हृदयविकाराने दुःखद निधन झाले. त्यांच्यामागे त्यांच्या पत्नी, एक मुलगा, भाऊ, बहिणी, आई असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या अकाली जाण्याने परिवारात तसेच परिसरात शोक कळा पसरली. अत्यंत मनमिळावू स्वभावाची व्यक्ती तसेच मित्र परिवारामध्ये दिलदार वृत्तीचे मित्र म्हणून त्यांची ख्याती होती. त्यांचेवर बाभुळगाव येथील मोक्षधामात अंत्यविधी करण्यात आला.

झरी जामनी तालुक्यात दुष्काळी परिस्थितीत आशेचा किरण

'किसान' व 'सेवावर्धिनी'च्या वतीने ६ गावांतील ९० हून अधिक कुटुंबांना 'दिवाळी स्नेह भेट'!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी , दि. १० : या वर्षी पर्जन्यमानामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती आणि त्यामुळे ग्रामीण भागातील कुटुंबांसमोर उभी ठाकलेली आर्थिक अडचण लक्षात घेता, सणाच्या आनंदातही चिंता दाटली होती.

अशा या कठीण काळात आदिवासी बांधवांच्या दारी आनंदाची दिवाळी साजरी व्हावी, या उदात हेतूने किसान बहुउद्देशीय संस्था, बिरसाई पेठ, शिबला (ता. झरी जामनी, जि. यवतमाळ) आणि सेवावर्धिनी संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. तालुक्यातील आदिवासी गाव आणि पोडांवर भेट घरोघरी जाऊन गरजू कुटुंबांना मदत पोहोचवण्याचा विडा या संस्थांनी उचलला. ६ गावांतील ९० हून अधिक कुटुंबांना दिवाळी किट भेट देऊन त्यांची दिवाळी गोड करण्याचा एक छोटासा पण महत्त्वाचा प्रयत्न संस्थेच्या माध्यमातून करण्यात आला.

हा स्तुत्य उपक्रम किसान बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष पुनाजित कुळमेथे, संस्थेचे संचालक सदस्य तथा प्राचार्य डॉ. अनिल कोरपेनवार, सामाजिक कार्यकर्ते बंडू आडे, समन्वयक विद्यानंद अहिरे तसेच संस्थेच्या इतर कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत व हस्ते प्रत्यक्ष भगिनींना साडी, फराळ व मिठाईच्या किटचे वाटप करून पार पडला. "संकटाच्या काळात एकमेकांना साथ देऊया, आदिवासी बांधवांच्या प्रत्येक घरी आनंदाचा दिवा लावूया," हा संदेश देत या दोन्ही संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी भेट दुर्गम भागात पोहोचून हा उपक्रम यशस्वी केला. दुष्काळाच्या सावटात आपल्या हक्काची माणसूकी आणि मदतीचा हात गाव आणि पोडांवर पोहोचल्यामुळे स्थानिक आदिवासी भगिनींच्या चेहऱ्यावर दिवाळीचा खरा आनंद व कृतज्ञता दिसून आली. या उपक्रमाबद्दल सर्व स्तरातून 'किसान' बहुउद्देशीय संस्था आणि 'सेवावर्धिनी' संस्थेच्या कार्याचे कौतुक होत आहे.

नाईक परिवाराची दिवाळी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या अंगणात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



महागाव, दि. १० : दिवाळी म्हणजे केवळ दिव्यांची रोषणाई, फराळ आणि फटाक्यांचा उत्सव नव्हे, तर दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंदाचा प्रकाश निर्माण करण्याचा सण होय. याच माणुसकीच्या भावनेतून नाईक परिवाराने गौळ मांजरी येथील शेतकरी, कष्टकरी आणि ग्रामस्थांसोबत दिवाळी साजरी केली. राज्यमंत्री इंद्रनीलभाऊ नाईक आणि सौ. मोहिनीताई नाईक यांनी सहकुटुंब गावाला भेट देत ग्रामस्थांसोबत दिवाळीचा आनंद वाटून घेतला. या भेटीत पदाचा मोठेपणा बाजूला ठेवत आपुलकीचे नाते आणि माणुसकीचा ओलावा अनुभवायला मिळाला.

सध्या शेतकरी बांधव विविध संकटांचा सामना करीत आहेत. एल निनोच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेली दुष्काळजन्य परिस्थिती, शेतीचे नुकसान आणि ग्रामीण भागातील विविध समस्यांबाबत इंद्रनीलभाऊ नाईक यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला. त्यांच्या अडचणी जाणून घेत योग्य उपाययोजनांसाठी प्रयत्न करण्याची ग्वाही दिली. गावातील चिमुकल्यांसोबत फटाके फोडून आणि त्यांना फटाक्यांचे बाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला. वृद्ध माता-पित्यांना थंडीपासून संरक्षण मिळावे यासाठी ब्लँकेटचे वाटप करण्यात आले. तसेच ग्रामस्थांना दिवाळीची भेट म्हणून विविध गोड पदार्थ आणि आनंदाचा शिधा देण्यात आला. या उपक्रमात मोहिनीताई नाईक यांनी गावातील माता-भगिनींशी साधलेला संवाद, वृद्ध महिलांची घेतलेली आस्थेने विचारपूस आणि त्यांच्याशी व्यक्त केलेली आपुलकी ग्रामस्थांच्या मनाला भावणारी ठरली. काही नाती रक्ताची असतात, तर काही नाती माणुसकीच्या धाग्यांनी जोडली जातात. एखाद्या वृद्ध मातेच्या डोक्यावर प्रेमाने हात ठेवणे, तिच्या सुख-दुःखाची विचारपूस करणे आणि गरजू कुटुंबाच्या आनंदात सहभागी होणे, यासाठी पदाची नव्हे तर संवेदनशील मनाची गरज असते. नाईक परिवाराच्या या दिवाळी उपक्रमातून हाच सामाजिक संदेश देण्यात आला. दिवाळीच्या रोषणाईपेक्षा माणसांच्या चेहऱ्यावरील आनंद अधिक महत्त्वाचा असतो, याची प्रचिती या भेटीतून आली. गावातील शेतकरी, कष्टकरी, वृद्ध माता-पिता आणि चिमुकल्यांसोबत साजरी झालेली ही दिवाळी केवळ एक कार्यक्रम न राहता आपुलकी, संवाद आणि सामाजिक जाणीव जपणारा अनुभव ठरली. इंद्रनीलभाऊ नाईक आणि सौ. मोहिनीताई नाईक यांच्या या भेटीने गौळ मांजरी येथील ग्रामस्थांच्या आठवणीत आनंदाचे क्षण निर्माण केले.

आरेगाव येथे शॉर्टसर्कीटने पावनेदोन एकर ऊस जळाला

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पुसद, दि. १० : शेतात ऊभ्या असलेल्या विजेच्या खांबावर शॉर्टसर्किट झाल्याने आरेगाव येथे गावानजीक असलेल्या गुणवंतराव बादराव ठेंगे यांच्या शेतातील दोन एकर शेतातील ऊस जळाल्याने अंदाजे दिड ते दोन लाख रुपयाचे नुकसान झाले आहे.

प्राप्त माहितीनुसार आज दि.१० नोव्हेंबर रोजी दिड वाजताच्या सुमारास शेतातील विजखांबावर शॉर्टसर्किट झाल्याने ऊसाने पेट घेतला. ऊसाने पेट घेतल्याचे लक्षात येताच गावकऱ्यांनी शेताकडे धाव घेऊन आग विझविण्याचा प्रयत्न केला परंतु ऊसाचा पाला वाळलेला असल्याने ऊसाने सर्वबाजुने पेट घेतला व अर्ध्यातासातच संपूर्ण ऊस आगीच्या भक्ष्यस्थानी पडला. दरम्यान ऊस जळण्याच्या घटना घडत असतात.मागील वर्षी ही भगवान आनंदराव ठेंगे यांचा याच शेताला लागुन असलेला अडिच एकर ऊस जळाला होता.विज वितरण कंपनीकडुन कोणतीही प्रतीबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत नसल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे दरवर्षी मोठे नुकसान होते.जळालेल्या ऊसाला कारखाना गाळापास नेल्यानंतर ऊस दरातुन पंधरा टक्के वजा करुन शेतकऱ्याचे बिल अदा करते.यामुळे शेतकऱ्याचे दुहेरी नुकसान होते.विज वितरण कंपनी जळालेल्या ऊसाची तावडतोब नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकऱ्याकडुन केली गेली आहे.

अगोदरच कमी पावसामुळे ऊसाची वाढ न झाल्याने ऊसाच्या वजनात घट येण्याची भीती असतांना आगीमुळे गुणवंतराव ठेंगे यांचे मोठे नुकसान झाले आहे.घटनेची माहिती मिळताच विज वितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन आपला अहवाल देणार असल्याचे सांगीतले. "आरेगाव परीसर हा "शुगरकेन बेल्ट" म्हणुन ओळखला जातो.ओलीताची सोय असल्याने ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणावर केल्या जाते.अशातच विज वितरण कंपनीच्या हलगर्जीपणामुळे

माजी विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव! टाकळी जिल्हा परिषद शाळेत माजी विद्यार्थी सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



झरी, दि. १० : ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन विविध क्षेत्रांत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा गौरव करण्याचा प्रेरणादायी सोहळा जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा, टाकळी येथे सोमवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. अधिकारी, कर्मचारी, डॉक्टर, शिक्षक, अभियंते तसेच शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करून त्यांच्या यशस्वी वाटचालीचे कौतुक करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालेंद्र गोपेवार होते. प्रमुख अतिथी म्हणून दुर्गाबाई बुर्रेवार, केंद्र समन्वयक विपीन मुस्कावार, उपाध्यक्ष वनिता चिन्नमवार तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत मुख्याध्यापक अनिल चिंतकुंटलावार सर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी माजी विद्यार्थी सागर टोंगलवार, दिलीप सीतावार, सुरेश मंचलवार, जीवन गोपेवार, व्यंकटी मंचलवार, वैभव पोतराजवार, दत्ता बुर्रेवार, अशोक बुर्रेवार, कुणाल गोपेवार, नंदू रोडावर, श्रीकांत बत्तुलवार, उदय कुरेट्टीवार, संजय टोंगलवार, गजानन टोंगलवार, दशरथ बुर्रेवार, अजय दुम्मनवार, भावना गोपेवार आणि डॉ. आकाश दुधबावणे यांच्यासह विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. ग्रामीण भागातील शाळेतून घडलेले विद्यार्थी विविध उच्च पदांवर पोहोचणे ही अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले. माजी विद्यार्थ्यांच्या यशामुळे शाळेची आणि गावाची मान उंचावली असून, त्यांच्या यशस्वी वाटचालीत शिक्षकांनी दिलेले ज्ञान, संस्कार आणि मार्गदर्शन यांचा मोलाचा वाटा असल्याचेही त्यांनी नमूद केले. शाळा ही केवळ शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारे संस्कारकेंद्र आहे. माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेशी असलेले नाते कायम जपावे आणि आपल्या अनुभवातून सध्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून त्यांच्यासाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण करावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेतील विद्यार्थिनी आचल दुधबावणे आणि प्रणवी पोतराजवार यांनी आत्मविश्वासपूर्ण व प्रभावी सूत्रसंचालन केले. तर सना दुधबावणे हिने आभार प्रदर्शन केले. लहान वयात विद्यार्थिनींनी दाखविलेल्या वक्तृत्वकौशल्याचे उपस्थितांनी विशेष कौतुक केले. कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जुन्या आठवणींना उजाळा, कर्तृत्ववान माजी विद्यार्थ्यांचा सन्मान आणि नव्या पिढीला प्रेरणेची शिदोरी, अशा त्रिवेणी संगमाने हा सोहळा रंगला. माजी विद्यार्थी आणि शाळा यांच्यातील ऋणानुबंध अधिक दृढ करणारा हा उपक्रम शाळेच्या वाटचालीतील एक अविस्मरणीय आणि अभिमानास्पद ठरला.

खडकी जवळ भिषण अपघात : दोन तरुण गंभीर जखमी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



राळेगाव , दि. १० : राळेगाव तालुक्यातील खडकी गाव जवळ भीषण अपघात. दोन तरुण गंभीर जखमी. वडकी येथे यवतमाळ रोड वर खडकी गावा जवळ सिमेंट काकरेट रोड वर रोडच्या मधोमध जॉइंट मध्ये पडले मोठ्या भेगा मुळे भीषण अपघात फैशन प्रो दुहो. चाकीनेदोन तरुण. मनोज देविदास देशमुख वय वर्ष ४०. गणेश हरिभाऊ फडकाडे वर्ष २५. हे दोघेहो. सराई येथील असून आपल्या दुईचाकीने जात असताना खडकी जवळ त्याच्या सिमेंट भेगी मधील त्या चा.गाडीमधील mh३२ r३८२०.. फैशन प्रो दुहो. चाकीनेदोन तरुण. मनोज देविदास देशमुख वय वर्ष ४०. गणेश हरिभाऊ फडकाडे वर्ष २५. हे दोघेहो. सराई येथील असून आपल्या दुईचाकीने जात असताना खडकी जवळ त्याच्या सिमेंट भेगी मधील त्या चा.गाडीमधील समोरील चाक. अचानक फसले गाडी वेगात असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले आणी अपघात दोन्ही तरुण रस्त्यावरून दूर फेकले गेले आणि हा अपघात इतका भीषण होता की तेनचा डोक्याला व हाता पायाला गंभीर दुखापत झाली.

साखऱ्यात माणुसकीचा दीप उजळला; निराधार महिलांची दिवाळी गोड!

स्वप्निल (सोनू) उप्पलवार यांचा स्तुत्य पुढाकार

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



पांढरकवडा, दि. १० : दिवाळीचा आनंद केवळ स्वतःपुरता मर्यादित न ठेवता समाजातील वंचित आणि निराधार घटकांच्या जीवनातही आनंदाचा प्रकाश पोहोचविण्याचा स्तुत्य उपक्रम साखरा येथे राबविण्यात आला.विधवा, निराधार व गरजू महिलांना दिवाळीनिमित्त फराळासह जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून त्यांची दिवाळी आनंदमयी करण्यात आली.सध्या शेतकरी संकटात असून ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थितीही प्रतिकूल आहे.अशा परिस्थितीत गरजू महिलांना सणाचा आनंद घेता यावा, या सामाजिक भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला.यावेळी महिलांना दिवाळी फराळ, अन्नधान्य किट, खाद्यतेल, तांदूळ, गहू, साखर, मीठ, चहापुडा, साबुदा, लुगडे, शर्ट, बनियन तसेच थंडीपासून बचावासाठी मोजे व व्हॅसलीन आदी वस्तूंचे वाटप करण्यात आले.'एक हात मदतीचा... एक दिवा माणुसकीचा!' या भावनेतून नमो बहुउद्देशीय शिक्षण व व्यायाम प्रसारक मंडळाच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या सामाजिक कार्यासाठी नगरसेवक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष स्वप्निल (सोनू) उप्पलवार यांनी पुढाकार घेतला. ते स्वतानी फाउंडेशनचे संस्थापक सदस्यही आहेत.सणासुदीच्या काळात समाजातील दुर्लक्षित घटकांना आधार देत त्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठरला.दिव्यांच्या रोषणाईसोबत माणुसकीचा प्रकाशही गरजूंच्या जीवनात पोहोचविणारी साखरा येथील ही दिवाळी सर्वांसाठी प्रेरणादायी ठरली.

बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

आयटीआयः घोषणा नियमितीकरणाची, कृती मात्र नव्या भरतीची

तासिका निदेशकांमध्ये संताप, तीन महिन्यांत नियमित करण्याचे आश्वासन हवेतच

चांदूर रेल्वे/वार्ताहर

महाराष्ट्र राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) गेल्या अनेक वर्षांपासून अत्यल्प मानधनावर तासिका तत्त्वावर सेवा बजावणाऱ्या निदेशकांच्या नियमितीकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. एका बाजूला तासिका निदेशकांना नियमित सेवेत सामावून घेण्याचे आश्वासन शासनाकडून दिले जात असताना, दुसरीकडे याच निदेशक संवर्गातील तब्बल १ हजार ६२९ पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) भरण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. शासनाच्या या परस्परविरोधी भूमिकेमुळे वर्षानुवर्षे सेवा देणाऱ्या तासिका निदेशकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, आता या प्रश्नावर आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याची तयारी सुरू झाली आहे.

राज्यातील विविध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अनेक तासिका निदेशक मागील पाच वर्षांपासून किंवा त्याहून अधिक काळ सातत्याने प्रशिक्षणाचे काम करीत आहेत. अत्यंत अल्प मानधनावर काम करूनही त्यांनी हजारो प्रशिक्षणार्थींना तांत्रिक शिक्षण आणि कौशल्य प्रशिक्षण दिले आहे. संबंधित निदेशकांकडे आवश्यक तांत्रिक



दुसरीकडे १,६२९ पदे एमपीएससी मार्फत भरण्याची प्रक्रिया सुरू

पात्रता, प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि प्रदीर्घ प्रशिक्षणाचा अनुभव असतानाही त्यांना अद्याप नियमित शासकीय सेवेत सामावून घेण्यात आलेले नाही. त्यामुळे त्यांच्या सेवासुरक्षेसह भवितव्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

विशेष म्हणजे, तासिका निदेशकांच्या नियमितीकरणासंदर्भात महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा बजावलेल्या निदेशकांच्या प्रकरणी नियमितीकरणाबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिल्याची माहिती मिळाली आहे. तसेच या निदेशकांची आवश्यक चाचणी यापूर्वीच घेण्यात आली आहे. त्यामुळे पुन्हा परीक्षा घेण्याऐवजी पूर्वी झालेल्या चाचणीचा निकाल, तांत्रिक पात्रता, सेवाकालावधी आणि अनुभव विचारात घेऊन नियमितीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी त्यांची मागणी आहे.

दरम्यान, १८ मार्च २०२६ रोजी तासिका निदेशकांच्या प्रश्नावर महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चा झाली होती. यावेळी कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी येत्या तीन महिन्यांत तासिका निदेशकांना नियमित करण्याची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी घोषणा केली होती. तसेच मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार यासंदर्भातील कार्यवाही सुरू असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र, या घोषणेला जवळपास आठ महिने उलटून गेले तरी नियमितीकरणाबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नसल्याने शासनाच्या आश्वासनाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. ६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या एमपीएससी गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ च्या शुद्धिपत्रकात औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील निदेशक संवर्गातील तब्बल १ हजार ६२९ पदांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये शिल्पनिदेशकांची १ हजार ३८८ पदे, तर गणित व चित्रकला निदेशकांची २४१ पदे आहेत. एकीकडे अनेक वर्षांपासून तात्पुरत्या स्वरूपात सेवा देणाऱ्या अनुभवी तासिका निदेशकांना नियमित करण्याचे आश्वासन दिले जात आहे, तर दुसरीकडे त्याच संवर्गातील रिक्त पदे एमपीएससीमार्फत भरण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. त्यामुळे नियमितीकरणाच्या प्रतीक्षेत असलेल्या निदेशकांमध्ये असंतोष अधिक तीव्र झाला आहे. शासन आपल्या आश्वासनाची पूर्तता करून या निदेशकांना न्याय देणार की त्यांना पुन्हा आंदोलनाच्या मार्गावर जाण्यास भाग पाडणार, याकडे राज्यातील तासिका निदेशकांचे लक्ष लागले आहे.

आधी आमचा विचार करा, त्यानंतर उर्वरित पदे भरा!

सध्या तासिका निदेशकांना नियमित करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्र्यांनी विधानमंडळात दिली होती. आम्ही दाखल केलेल्या याचिकेवर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) पाच वर्षांपेक्षा अधिक सेवा असलेल्या निदेशकांना नियमित करण्याबाबत महत्त्वपूर्ण निर्णय दिलेला आहे. असे असतांना आता विभागाने १ हजार ६२९ पदांची भरती करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यामुळे आधी अनेक वर्षांपासून सेवा देणाऱ्या तासिका निदेशकांचा विचार करावा आणि त्यानंतर उर्वरित रिक्त जागा भराव्यात, ही आमची मागणी आहे. शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष न दिल्यास वेळप्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करू.

टी. बी. टांगले,
उपाध्यक्ष, आयटीआय शिल्प निदेशक वेल्फेअर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य

न्याय मिळवून देण्यासाठी पाठपुरावा

सदर प्रकरणाबाबत अधिक माहिती घेऊन कौशल्य विकास विभागाच्या मंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आहोत. तासिका निदेशकांना न्याय मिळवून देण्यासाठी निश्चितच प्रयत्न करू.

किरण सरनाईक,
शिक्षक आमदार, अमरावती विभाग

दहावी-बारावीच्या फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षांचे वेळापत्रक जाहीर

अमरावती/का.प्र.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) लेखी व प्रात्यक्षिक परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा ८ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२७ या कालावधीत, तर दहावीची लेखी परीक्षा १५ फेब्रुवारी ते १५ मार्च २०२७ या कालावधीत होणार आहे. बारावीच्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापनाच्या परीक्षा २० जानेवारी ते ६ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत, तसेच दहावीच्या या परीक्षा २८ जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२७ या कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत. परीक्षांचे सविस्तर वेळापत्रक मंडळाच्या www.mahahsscboard.in या अधिकृत संकेतस्थळावर ६ नोव्हेंबर २०२६ पासून उपलब्ध करून देण्यात आले आहे. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक हे अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. असे आवाहन सचिव डॉ. दिपक माळी यांनी केले आहे.

महाकाली माता मंदिरात भक्तांची बरकत मिळविण्यासाठी लोटली गर्दी

स्मशानभूमी पर्यंत भक्तांच्या लागल्या रांगा;४३ वर्षांची परंपरा

अमरावती/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही हिंदू स्मशानभूमी परिसरात असलेल्या महाकाली मंदिरात भाविकांची दिवाळीच्या दिवशी अलोट गर्दी उसळली. महाकाली मातेच्या दर्शना सोबतच येथे मिळणाऱ्या आगळ्या वेगळ्या पैशांच्या प्रसादाची भाविकांना विशेष ओढ असते. लाह्या बत्ताशां सोबतच चक्क दहा आणि वीस कधी-कधी शंभर आणि पाचशे रुपयांच्या अगदी कोऱ्या नोटा प्रसाद म्हणून वितरित केल्या जातात. हा प्रसाद म्हणजे मातेची बरकत असून तो घरी नेऊन देवघरात किंवा तिजोरीत ठेवल्यास वर्षभर घरात सुख समृद्धी नांदते अशी भाविकांची श्रद्धा आहे. याच श्रद्धेपोटी दिवाळीच्या रात्री हजारो भाविकांनी महाकाली मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली. माहिती



अनुसार दिवाळीच्या रात्री आठ वाजल्यापासून महाकाली मंदिरात भाविकांची गर्दी वाढण्यास सुरुवात झाली. रात्री जसजसा वेळ पुढे सरकत गेला तसतशी दर्शनासाठी येणाऱ्यांची संख्या वाढत गेली.

महाकाली मातेचे दर्शन घेऊन बरकतीचा प्रसाद मिळवण्यासाठी भाविकांना तब्बल एक ते दोन तास प्रतीक्षा करावी लागत होती. मंदिराचे मुख्य पुजारी शक्ती महाराज यांच्या हस्ते भाविकांना प्रसादासोबत दहा ते वीस रुपयांच्या कोऱ्या नोटा वितरित करण्यात येत होत्या. कोणाला एक कोणाला दोन तर काही भाविकांना चार ते पाच नोटा प्रसाद रूपाने मिळाल्या. पहाटे अडीच ते तीन वाजेपर्यंत मंदिरातील बरकतीचा हा सोहळा सुरू होता. एखादी शंभर आणि पाचशे रुपयांची नोटही त्यातून प्रसाद म्हणून भाविकाला मिळायची.महाकाली मंदिरातील या बरकतीच्या परंपरेला यंदा ४३ वर्षे पूर्ण झाली असल्याचं मंदिरातील मुख्य पुजारी शक्ति महाराज यांनी सांगितले.

देवघरात किंवा तिजोरीत ठेवतात पैशांचा प्रसाद

महाकाली मंदिरातून मिळणाऱ्या पैशांच्या प्रसादाला भाविकांच्या दृष्टीने विशेष महत्त्व आहे. हा केवळ पैशांचा प्रसाद नसून मातेचा आशीर्वाद आणि घरात बरकत आणणारे शुभचिन्ह असल्याची श्रद्धा आहे. त्यामुळे भाविका प्रसाद घरी नेऊन देवघरात किंवा तिजोरीत जपून ठेवतात. या प्रसादासाठी लहान मुलां पासून ज्येष्ठांपर्यंत महिला पुरुष आणि युवतींची मोठी उपस्थिती होती. अमरावती शहरात सोबतच लगतच्या गावांमधूनही भाविक महाकाली मातेची बरकत घेण्यासाठी आले होते.

त्यामुळे नेहमी शांत असणारा हिंदू स्मशानभूमीचा परिसर दिवाळीच्या रात्री भक्तिमय गर्दीने अक्षरशः गजबजुन गेला होता. संपूर्ण परिसराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते

पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

दिवाळीच्या रात्री महाकाली मंदिरात होणारी भाविकांची प्रचंड गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरासह हिंदू स्मशानभूमी परिसरात पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.भाविकांना शिस्तबद्ध पद्धतीने दर्शन घेता यावे रांगेत गोंधळ होऊ नये आणि परिसरातील सुरक्षा व्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांकडून विशेष नियोजन करण्यात आले होते. पोलीस उपायुक्त शामकांत घुगे यांनीही मंदिर परिसरातील बंदोबस्ताची पाहणी केली.

दिलीप बोबडे यांची पुरस्कारासाठी निवड



अचलपूर- राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांच्या वतीने अचलपूर शहरातील देवडी येथील पब्लिक वेलफेअर सोसायटी द्वारा संचलित राष्ट्रीय हायस्कूचे शिक्षक दिलीप बोबडे यांची 'आयडॉल शिक्षक २०२६-२७' या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे. शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित भावनेने कार्य करणारे दिलीप बोबडे यांच्या यशामुळे राष्ट्रीय हायस्कूल चे मुख्याध्यापक, सहकारी शिक्षकांमध्ये, मित्रपरिवारात तसेच शैक्षणिक वर्तुळात आनंदाचे वातावरण आहे. त्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या जात आहे.

राष्ट्रसंतांना 'भारतरत्न' संदर्भात निवृत्ती मोकद्दम यांचा मुख्यमंत्र्यांशी संवाद



तिवसा/वार्ताहर

सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रसंत 'भारतरत्न' जन आंदोलन समितीचे संयोजक मुकुंद पूनसे यांचे सहकारी निवृत्ती मोकद्दम यांनी राष्ट्रसंतांना 'भारतरत्न' मिळावा या मागणी करिता क्रांतिदिनी क्रांतीज्वाला प्रज्वलित करून मुकुंद पुनसे यांच्या नेतृत्वात शेकडो गुरुदेव भक्तांनी,अन्नत्याग आंदोलनाच्या माध्यमातून महाराष्ट्रभर सुरू करण्यात आलेल्या जन आंदोलनाची माहिती देत सविस्तर चर्चा केली व 'भारतरत्नाची' मागणी करत,मुकुंद पूनसे यांच्या वतीने निवेदनाची एक प्रत,थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ संत नव्हते,तर ते मानवतेचे महान पुजारी होते. परंतु राष्ट्रसंताचे,राष्ट्रहिताचे कार्य,आणि जनभावनेचा आदर म्हणून त्यांना 'भारतरत्न' मिळावा, यासाठी शासन सकारात्मक आहे,' अशी ग्वाहीही मुख्यमंत्री यावेळी दिली.

१४ व १५ नोव्हेंबरला सहावे राज्यस्तरीय शब्दवेल साहित्य संमेलन

विविध साहित्यिक कार्यक्रमांसह पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन

अमरावती/का.प्र.

सर्जनशील शब्दवेल साहित्य संघ, पनवेल, यशवंतराव चव्हाण सेंटर,अमरावती आणि श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहावे राज्यस्तरीय शब्दवेल साहित्य संमेलन २०२६' चे आयोजन शनिवार, दि. १४ व रविवार, दि. १५ नोव्हेंबर २०२६ रोजी अमरावती येथील ज्ञानमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख साहित्यनगरी, श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय येथे करण्यात आले आहे. द्विशताब्दी जयंती महोत्सवानिमित्त हे संमेलन सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांना समर्पित करण्यात आले आहे.या संमेलनाचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक मा. इंद्रजीत भालेराव असून, उद्घाटक म्हणून श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष मा. दिलीपबाबू इंगोले उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेंद्र मेटे, तर संमेलन कार्याध्यक्ष म्हणून डॉ. राजेश मिरगे काम पाहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून यशवंतराव चव्हाण सेंटरचे कार्याध्यक्ष रमेश अंधारे, प्रदीप देशमुख, डॉ. स्मिता देशमुख आणि रामदास गायधने यांची उपस्थिती लाभणार आहे.संमेलनाच्या पहिल्या दिवशी ग्रंथदिंडी, उद्घाटन सोहळा आणि शब्दवेल दिवाळी अंक २०२६ चा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर बालकवींचे 'इटुकले-पिटुकले' बालकविसंमेलन, निमंत्रित कवींचे कविसंमेलन, कथाकथन, महिला कविसंमेलन, 'बोलक्या बाहुल्यांचा खेळ' तसेच विविध साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. दुसऱ्या दिवशी शब्दवेल वार्षिक पुरस्कार वितरण व पुस्तक प्रकाशन सोहळा, साहित्यकृतींवरील परिसंवाद, गझल मुशायरा, बोलीभाषा कविसंमेलन आणि समारोपीय सोहळा आयोजित करण्यात आला आहे. 'शेती, शेतकऱ्यांचे समग्रजीवन आणि मराठी साहित्य' या विषयावर परिसंवाद होणार असून, विविध मान्यवर वक्ते आपले विचार मांडणार आहेत. बोलीभाषा कविसंमेलनातून महाराष्ट्रातील विविध बोलीभाषांचे सौंदर्य आणि सांस्कृतिक वैभव अधोरेखित केले जाणार आहे.

या संमेलनात शब्दवेल जीवनगौरव, बोलीभाषा संवर्धन, उत्कृष्ट साहित्य संस्था गौरव, हास्यकवी गौरव, आदी विविध पुरस्कारांचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच हरिदास तुळशीरामजी राऊत स्मृती प्रदर्शनांतर्गत छायाचित्रे, दुर्मीळ भांडी, रेडिमेड रांगोळी आर्ट आणि विविध कलाविष्कारांचे प्रदर्शनही भरविण्यात येणार आहे. या साहित्य सोहळ्याला महाराष्ट्रातील विविध भागांतील साहित्यिक, कवी, लेखक, समीक्षक, कलाकार आणि साहित्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.



'एडीफाय शाळेने दिला पर्यावरणपूरक संदेश

अमरावती- एडीफाय शाळेत दिवाळी उत्सव मोठ्या उत्साहात, आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात श्री महालक्ष्मी पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक तुषार येरपुडे व शाळा प्रशासन प्रमुख अतुल अंबारे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. या निमित्ताने विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याचा संदेश देण्यासाठी शिक्षकांच्या माध्यमातून एक सुंदर मार्गदर्शनपर नाटिका सादर करण्यात आली. नाटिकेचे दिग्दर्शन सांस्कृतिक विभागाचे प्रमुख भारत मोंढे यांनी केले. नाटिकेमध्ये ईशान कापडिया, अब्दुल सलीम, सुरेश झालटे, अनुजा देशमुख, दीपाली गायकवाड, विद्या तिखिले, मनीषा गवई, हर्षाली तायडे या शिक्षकांनी उस्फुर्तपणे सहभाग घेतला. इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी स्वामिनी रेचे हिने सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. मनन चोपडा आणि मनु पाटील यांनी दिवाळी सणाचे महत्त्व सांगितले.शाळेचे मुख्याध्यापक तुषार येरपुडे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे संचालन डॉ.संगीता गावंडे यांनी केले.एडीफाय शाळा व्यवस्थापनाचे अध्यक्ष डॉ.पुरणलाल हबलानी,संचालक रवी इंगळे संचालक शिवा रामा कृष्णा यांनी शुभेच्छा दिल्या.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात दुर्मिळ शस्त्रक्रिया

अमरावती/का.प्र.

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे मूत्राशयाच्या कर्करोगावरील अत्यंत दुर्मिळ शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. मूत्राशयाचा कर्करोग हा एक कॉमन कॅन्सर असून, विशेष करून तंबाखू सेवन व धूम्रपान यामुळे अशा रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झालेली आहे.

सामान्यतः मूत्राशयाच्या कॅन्सरची दुर्बीणद्वारे शस्त्रक्रिया पुरेशी असते . परंतु जर कॅन्सरचे प्रमाण जास्त असेल आणि तो पसरलेला असेल , तर त्याचा परिणाम किडनीवर होतो. म्हणून Radical Cystectomy



हा एक उत्तम पर्याय आहे. परंतु ही शस्त्रक्रिया अतिशय जोखमीची आणि धोकादायक असते. पेशंटचा संपूर्ण मूत्राशय काढून टाकावा लागतो. तसेच या शस्त्रक्रियेला लागणारा वेळ, कुशलता, एकाग्रता, समन्वयकता आदी आवश्यक असते व ती दुर्मिळ आहे.

ही शस्त्रक्रिया विशेष उल्लेखनीय आहे कारण मूत्राशय संपूर्ण काढून टाकल्यानंतर पर्यायी व्यवस्था आतड्याचे काही भाग वापरून निर्माण करण्यात आली. Neo-Bladder तयार करण्यात आला. ही शस्त्रक्रिया प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत करण्यात आली. सदर शस्त्रक्रिया विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अतुल यादगिरे व डॉ. पूजा पाटील यांच्या मार्फत करण्यात आली. सदर शस्त्रक्रियेमधे भूलतज्ञ डॉ राखी वानखडे, डॉ किरण पारिसे, डॉ अभिनव निकम, डॉ स्नेहा चव्हाण, डॉ अभिजीत वानखडे, डॉ नंदिनी चव्हाण, डॉ आदित्य तेवरे तसेच अधीसेविका चंदा खोडके, मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार संगीता आष्टेकर, मनीषा रामटेके , प्रियांका गायकवाड, वैष्णवी मरकाळे, सुमित्रा कोरे , वैभवी कोठाळकर, ईश्वरी येवले, वंदना जाधव, लक्ष्मण वालुकर, शारदा राठोड, अथर्व लोंढे, शंकर झायटे, लक्ष्मी सोनोने इ. मोलाचे सहकार्य होते.

विजय मर्चेंट ट्रॉफीसाठी युवराजसिंग यादवची निवड

अचलपूर/वार्ताहर

अचलपूर-परतवाडा येथील भाजपा शहराध्यक्ष कुंदन यादव यांचे चिरंजीव युवराजसिंग कुंदन यादव याची बीसीसीआयच्या १६ वर्षाखालील विजय मर्चेंट ट्रॉफी २०२६-२७ स्पर्धेसाठी विदर्भ क्रिकेट संघात निवड झाली आहे. नागपूर येथील विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या (व्हीसीए) संघातून तो या स्पर्धेत खेळणार असून त्याच्या निवडीमुळे अचलपूर-परतवाडा शहराच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. युवराजसिंग हा अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा क्रिकेटपटू असून, गोल्डन किड्स ज्युनिअर कॉलेजमध्ये अकरावी वाणिज्य शाखेत शिक्षण घेत आहे. नुकत्याच अमरावती येथे झालेल्या आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत गोल्डन किड्स संघाने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत युवराजसिंगला 'मॅन ऑफ द टूर्नामेंट' पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच २०२५-२६ मधील भास्कर जोशी सामन्यांमध्येही त्याने उत्कृष्ट कामगिरी करीत सर्वोत्तम खेळाडूचा मान मिळविला होता. डावखुरा फलंदाज आणि अष्टपैलू खेळाडू म्हणून युवराजसिंगने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सातत्यपूर्ण कामगिरीच्या बळावर त्याने विदर्भ क्रिकेट असोसिएशनच्या संघात स्थान मिळविले. बीसीसीआयच्या विजय मर्चेंट ट्रॉफी स्पर्धेत खेळण्याची संधी मिळविणारा तो अचलपूर-परतवाडा परिसरातील पहिला खेळाडू ठरल्याचा दावा करण्यात येत आहे. १४ नोव्हेंबर ते ८ डिसेंबरदरम्यान गुजरातमधील वडोदरा येथे ही स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेतील पाच सामन्यांसाठी नागपूरचा विदर्भ क्रिकेट संघ ११ नोव्हेंबर रोजी रवाना होणार आहे. युवराजसिंगच्या निवडीबद्दल यादव परिवारासह अचलपूर - परतवाडा आणि अमरावतीच्या क्रीडा क्षेत्रातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

दिवाळी जोरात छुपी महागाई त्याहून जोशात!

शास्त्रशुद्ध पद्धतीने कारणमीमांसा करता येईल अशी गेल्या दशकापूर्वीपर्यंतची महागाई होती. परंतु आजच्या महागाईच्या बहुतांश कारणांमध्ये तर्क सापडत नाही की त्यामागचा शास्त्रीय आधारही मिळत नाही. बेहिशेब स्वार्थाला लबाड वैशिष्ट्यांचा फसवा पेहराव, असे या आजच्या महागाईचे वर्णन करता येईल. विवेक हरवलेली ग्राहक जागरुकता ही कालच्या गोंधळात अधिक भर घालत आहे. गरज नसतानाही अत्यावश्यकता निर्माण करणाऱ्या आजच्या व्यापार – व्यवहार पद्धती या अर्थशास्त्राहून अधिक मानसशास्त्राचा आधार घेताना दिसतात. तेव्हा, आजच्या महागाईवर मौद्रिक वा राजकोषीय धोरणांपेक्षा कायदेशीर धोरणे अधिक परिणामकारक ठरू शकतात. मुक्त बाजार अर्थव्यवस्थेत 'भाववाढ' नियंत्रित ठेवण्यासाठी कायद्याचा बडगा उभारल्यावर जरी, 'स्वातंत्र्याशी, उद्यमशीलतेशी, भांडवलशाही अर्थव्यवस्थेशी प्रतारणा' करत असल्याची बांग उठली तरी, समाजाच्या सामूहिक कल्याणासाठी असे युद्धपातळीवर करण्याची गरज पडणार, एवढे निश्चित. तसे झाले नाही, तर 'आर्थिक अराजकते'ला सामोरे जाण्याची कधीतरी वेळ येणार.

आज मागणी व उत्पादनखर्च वृद्धीपेक्षा जर भाववाढीला कोण अधिक प्रभावित करत असेल तर ती 'नफाखोरी' होय. या नफाखोरीने स्वताची आणि स्वत:साठीच दहा अधिक तोंडे निर्माण केली आहेत आणि त्या प्रत्येकाच्या स्वार्थ संपन्नतेसाठी बेलगाम-अमर्याद निरंतर किंमती वाढवल्या जातात. जगभराच्या शक्यता लक्षात घेऊन अकाउंटिंग मध्ये केल्या जाणाऱ्या आवश्यक/अनावश्यक तरतुदी या कंपनी व भागधारकांच्या सुरक्षेची काळजी घेतात, परंतु अशी नफ्याची फेरफार ही आणखी जास्त नफ्यासाठी भाववाढीला प्रोत्साहन देत महागाईत भर घालत असते. ब्रॅण्ड इमेज व स्टेट्स वाढविण्यासाठी होणारा कोट्यवधींचा वायफळ झगमगाट हा तर महागाईला अधिक मारक ठरत आहे. जगात वा देशातील समाजव्यवस्थेत दिसणारी उत्पन्नातील मोठी तफावत आणि त्यातून रुंदावत चाललेली समाजिक विषमता हे याचेच अपत्य होय.

आज माणसाला माणूस म्हणून नव्हे तर ग्राहक म्हणूनच बघितले जाते. आनंदात असेल तर तो चैनीच्या वस्तू/सेवा उत्पादकांसाठी एक संभाव्य ग्राहक ठरतो. दु:खात असेल तर व्यसनजन्य वस्तू उत्पादकांसाठी संभाव्य ग्राहक ठरतो. आजारी असेल तर वैद्यकीय क्षेत्र त्याच्या त्याही परिस्थितीमध्ये त्याचा खिसा रिकामा करायला टपूनच बसलेले असते. माणसामध्ये कोणत्याही क्षणाला कुठल्याही भावभावना निर्माण झाल्या तरी त्या-त्या भावनेला गोंजारायला, शमवायला एक नव्हे तर अगणित दुकाने उघडीच असतात. प्रत्येक व्यक्तीला म्हणजेच ग्राहकाला त्याच्या जन्म ते मृत्यूपर्यंत सेवा/वस्तू चिटकवून फायदा कमावण्यासाठी प्रत्येक उद्योग धडपडत असतो. त्याला स्वताकडे खेचण्यासाठी प्रत्येक व्यवसाय जाळे टाकत असतो. दुर्दैव हे की तो आयुष्यभर स्वताला अनावश्यक अशा अगणित गरजांमध्ये जखडवून, त्या गरज-निर्मात्यांचा फायदा करण्यासाठीच जगत असतो. त्यातील अनेक गरजा या मुळात त्याच्या नव्हत्याच. परंतु तरीही त्यांवर आवश्यकतेचा साज चढवून त्या त्याच्या गळ्यात बांधल्या गेल्या. याचा अर्थ, आपण विकत घेत असलेल्या अर्ध्याहून अधिक वस्तूंची अत्यावश्यकताच नसते, म्हणजे त्या घेतल्या नाही तरी जीवनात तिळमात्र फरक पडणारा नसतो, परंतु तरीही त्या घेतल्या जाव्यात यासाठी असं काही मानवी मनाचे खेळ केले जातात की मग आपात्कालीन आवश्यकत्यांप्रमाणे त्यांकरिता घाई, हट्ट, दाखवला जातो. मार्केटिंगच्या मोहिनीत अडकून – फसून घेतलेल्या या वस्तुंचा निमित्तमात्र वापर झाल्यानंतर त्या कचऱ्याचा ढिगारा/भंगाराचे वजन वाढवतात. संसाधनांच्या अशा या अपव्यामुळे किंमती वाढत असतात. माणुस जेवढा अधिक आधुनिक होत आहे तेवढाच तो बेफिकीर, बेपर्वा होत आहे.



'वन युझ' म्हणजे आनंद-मनोरंजन-आरामासाठी पण फक्त एका वापरासाठी होणा-या खरेदीचे प्रमाण जरी पाहिले तर ते इतके आहे की, त्यातील निदान टाळता येणाऱ्यांची जरी खरेदी टाळली तरी खूप फरक पडू शकतो. दुरुस्ती, पुनर्वापर, पुनर्चक्रण, अपव्यय टाळण्याच्या सवयी वगैरेंचा अंगीकार जर समाजाने केला तर क्रांती घडेल, वस्तू/सेवांचे भाव नियंत्रणात राहतील – सर्वांना परवडतील. पण असे करण्याने 'प्रतिष्ठा कमी होते' हा अडथळा जर आणि जोवर मान्य असेल, तर आणि तोवर छुपी महागाई वाढत राहील, 'विकास' सुद्धा ठराविक वर्गांचाच होत राहील.


ईएमआय, क्रेडिट कार्ड, कन्झ्यूमर लोन्स, काळा पैसा वगैरेंमुळे तर खरेदीला संयम व समज राहिलेला नाही. मोबाईल पेमेंट ॲप्स मुळे तर 'खिसापाकीट पाहूनच पैसे खर्च' करण्याचा प्रकारच संपला आहे. काढला फोन-केलं स्कॅन. का? कशाला? किती याचा विचार तेव्हा होतो जेव्हा खिशात मोजकेच पैसे असतात तेव्हा ते दिवसभर पुरवण्यासाठी मग भावनिक आवेगातून होणार्या अनावश्यक खरेदीला आपोआप चाप बसतो. पण आता फोनवर अख्खे बँकखाते उघडे करून ठेवले गेल्यामुळे ते उपसताना काहीच विचार केला जात नाही. आजच्या भाववाढीमागचे हे एक कारण होय.

आपल्या देशाची विक्रमी लोकसंख्या ही इथे ग्राहकांची कमी नाही, याची हमीच देते. त्यामुळे इथे काहीही म्हणजे काहीही खपते. याचाच आधार घेऊन वस्तू व सेवांच्या किंमती या सहज वाढवल्या जातात. अर्थशास्त्रीय नियमांच्या नाकावर टिच्चून. किमतींचा विचार न करता खरेदी करणार्यांची संख्या इतकी आहे की वाढीव किमतीलाही सगळा माल विकता येतो हे आता विक्रेत्यांच्या ध्यानात आले आहे. तेव्हा व्यवहारी जागरुक ग्राहकाला विचारतो कोण! पैशापैशाची घासाघीस करणारा पाहिजे कोणाला? इथे उत्पादन होते ते नफ्यासाठी आणि नफ्याकरिता प्रमाणाबाहेर अवाजवी किंमत वाढवल्या जातात आणि त्या अशाच वाढत राहाव्यात यासाठी तो 'चालायचेच' वृत्ती असलेला ग्राहक त्यात भर घालत असतो. सूक्ष्म स्तरावरील प्रत्येक व्यवहाराचा सामूहिकरीत्या व्यापक स्तरावर काय समाजपरिणाम होत असतो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे वैयक्तिक खर्च पद्धती प्रवृत्तींतून कायम होत जाणारा किंमतींचा नवनवीन उच्चतम स्तर. हे सगळे होत असताना सरकार मात्र 'मुक्त अर्थव्यवस्थेच्या' सबबीखाली यात हस्तक्षेप करणे टाळते, परंतु यामुळे शेवटच्या स्तरावरील समाजगटाचे ग्राहक म्हणून अस्तित्व हे केवळ जीवनावश्यक वस्तू व सेवांपुरतेच टिकून राहाते. सामाजिक विषमतेवर आधारलेल्या भाववाढीची ही उर्ध्वगामी प्रगती अशीच कायम राहिली तर निम्न मध्यमवर्गही कालांतराने त्याच अस्तित्वहीनतेच्या पंगतीत जाऊन बसणार. याचा अर्थ असा की, विकास होत असल्याचे तर दाखवले जाणार परंतु तो खऱ्या अर्थाने एका विशिष्ट वर्गाचा होतो आहे हे मात्र दडवले जाणार. राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या विकासदराचे विक्रमी आकडे मिरवले जातात. त्या आड सगळी बहुसंख्य बेकारी, बेरोजगारी, गरीबी, भ्रष्टाचार, अवैधता, असंवैधनिकता, कुशासन हे पद्धतशीरपणे झाकले जाते.

व्यापार-उद्योग हा अर्थव्यवस्थेचा कणा होय. राष्ट्राची प्रगती ही विशेषकरून यांवरच अवलंबून असते. व्यापार,उद्योग वाढण्यासाठी त्यांना चांगला नफा मिळणे अत्यावश्यकच. त्यातूनच उद्योग अधिक व्यापक व विस्तारीत होत, रोजगार निर्माण करतो, त्याचे उत्पादन वाढते आणि त्याचा परिणाम उत्पादनखर्च कमी होण्यास मदत होते. हे पाहता वस्तू/सेवांचे भाव कमी नाही पण निदान स्थिर राहणे तरी अपेक्षित असते किंवा सामंजस्यपणाच्या दृष्टीने त्यात परिस्थितीनुरूप टप्प्याटप्प्याने थोडी वृद्धी होणे देखिल स्वागतार्ह असेल. परंतु ते असे न होता, फार फार मोठा नफा कमविण्याच्या स्वार्थाने, नको त्या निरुपयोगी वैशिष्ट्यांचे आकर्षण निर्माण करून किंमती भारी वाढवल्या जातात. एकाचे सगळे अनुकरण करतात आणि किंमती या वरवरच तरंगत राहतात. त्यातल्या त्यात एखादा जर कमी (योग्य) किंमतीत विकत असेल तर, त्याची वस्तू/सेवा ही निकृष्टच असावी, या विचाराची आजची ग्राहक मानसिकता त्यावरही नफाखोरीचे संस्कार करते (यावर जणू उदार उ:शाप म्हणून दिवाळीसारख्या सणासुदीला आजकाल, 'ऑनलाइन' खरेदी अत्यंत पडेल दरांमध्ये शक्य होते. पण मग वर्षभर याच वस्तूंचे दर ८० किंवा ५० टक्क्यांनी अधिक कसे काय असतात, हा प्रश्न ना ग्राहक विचारतो ना कोणती यंत्रणा)!

आज अल-निनो च्या सावटाखाली निर्माण झालेली दुष्काळ परिस्थिती ही येणाऱ्या काळात अधिक भयावह होण्याची शक्यता आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य हे सगळ्यावर परिणाम करणार. पण त्याचा सर्वाधिक परिणाम हा महागाईच्या रूपात त्रास देणार. ग्रामीण भागाला याच्या यातना किती सहन होतील, सांगता येत नाहीत. या परिस्थितीत महागाई ही त्यांच्याकरिता दुष्काळात तेरावा महिना ठरणार. याला जबाबदार कोण? याबाबतीत सरकारकडून अपेक्षा ठेवणे मूर्खपणाचेच होय. ग्राहक म्हणुन आपण जी व्यवहार्य जागृकता, विवेक, संयम, संवेदनशीलता दाखवणे आवश्यक आहे, ती कृतीतून दाखवत नाही आहोत, ही वस्तुस्थिती आहे. 'वन युझ' म्हणजे आनंद-मनोरंजन-आरामासाठी पण फक्त एका वापरासाठी होणार्या खरेदीचे प्रमाण जरी पाहिले तर ते इतके आहे की, त्यातील निदान टाळता येणाऱ्यांची जरी खरेदी टाळली तरी खूप फरक पडू शकतो. दुरुस्ती, पुनर्वापर, पुनर्चक्रण, अपव्यय टाळण्याच्या सवयी वगैरेंचा अंगीकार जर समाजाने केला तर क्रांती घडेल, वस्तू/सेवांचे भाव नियंत्रणात राहतील – सर्वांना परवडतील. पण असे करण्याने 'प्रतिष्ठा कमी होते' हा अडथळा जर आणि जोवर मान्य असेल, तर आणि तोवर छुपी महागाई वाढत राहील, 'विकास' सुद्धा ठराविक वर्गांचाच होत राहील.

अजित कवटकर



दिवाळी आणि बाजार

दिवाळीच्या मुहूर्तावर झालेल्या शेअर बाजारातील व्यवहारांनी भारतीय बाजारपेठेत पुन्हा उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे. मुहूर्त ट्रेडिंगच्या दिवशी निर्देशांक किंचित घसरले असले तरी ब्रॉडर मार्केटमधील मोठ्या प्रमाणावरील वाढ, धनत्रयोदशीपासूनची दमदार तेजी, परकीय गुंतवणुकीचा परतलेला ओघ, रुपयाची सुधारलेली स्थिती आणि स्वस्तावलेले कच्चे तेल यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास बळावला आहे. जागतिक बाजारातील बदलत्या परिस्थितीत भारत परदेशी गुंतवणूकदारांसाठीही आकर्षक पर्याय ठरत आहे.

दिवाळीच्या मुहूर्तावर झालेल्या शेअर बाजारातील व्यवहारांनी भारतीय बाजारपेठेत पुन्हा उत्साहाचे वातावरण निर्माण केले आहे. मुहूर्त ट्रेडिंगच्या दिवशी निर्देशांक किंचित घसरले असले तरी ब्रॉडर मार्केटमधील मोठ्या प्रमाणावरील वाढ, धनत्रयोदशीपासूनची दमदार तेजी, परकीय गुंतवणुकीचा परतलेला ओघ, रुपयाची सुधारलेली स्थिती आणि स्वस्तावलेले कच्चे तेल यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास बळावला आहे. जागतिक बाजारातील बदलत्या परिस्थितीत भारत परदेशी गुंतवणूकदारांसाठीही आकर्षक पर्याय ठरत आहे.

दिवाळीत लक्ष्मीपूजनाच्या दिवशी शेअर बाजारात आयोजित केल्या जाणाऱ्या मुहूर्ताच्या सौद्यांचे शेअर गुंतवणूकदारांच्या दृष्टीने विशेष महत्त्व. या शुभ मुहूर्तावर केलेली गुंतवणूक वर्षभर समृद्धी, लाभ आणि संपत्ती घेऊन येते, या श्रद्धेपायी या वेळी प्रतीकात्मक स्वरूपात शेअर्सची खरेदी-विक्री केली जाते. शेअर बाजारातील आधुनिक मुहूर्त ट्रेडिंगची सुरुवात १९५७ मध्ये बॉम्बे स्टॉक एक्स्चेंजमधून झाली तर १९९२ पासून नॅशनल स्टॉक एक्स्चेंजनेही ही परंपरा सुरू ठेवली. भारतीय शेअर बाजारात दिवाळीच्या आणि

नवीन हिंदू आर्थिक वर्षाच्या (संवत २०८३) स्वागतासाठी रविवारीही 'मुहूर्ताचा सौदा' दरवर्षीप्रमाणे उत्साहात पार पडला. हा 'मुहूर्ताचा सौदा' अत्यंत चढ-उताराचा ठरत बाजार किंचित घसरणीसह बंद झाला. मुख्य निर्देशांक घसरणीसह बंद झाले असले तरी ब्रॉडर मार्केटमध्ये इतर समभागांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. बाजारात ३,१३६ शेअर वाढीसह बंद झाले तर केवळ ९१३ शेअर्समध्ये घसरण पाहायला मिळाली. म्हणजेच बहुतांश गुंतवणूकदारांसाठी हा मुहूर्त फायदेशीर ठरला. एकूणच भारतीय शेअर बाजारातील गुंतवणूकदारांसाठी ही दिवाळी उत्साहवर्धक ठरली आहे.

धनत्रयोदशीला सेन्सेक्स १,७१८.०१ अंकांनी झेपावून ८१,०२८ वर, तर निफ्टी ४९३ अंकांनी वाढून २५,०३० वर बंद झाला. हा २७ फेब्रुवारीनंतरचा त्याचा सर्वोच्च स्तर असल्याने दिवाळीपूर्वीचे वातावरण यापेक्षा चांगले असूच शकत नाही. ४० वर्षांच्या इतिहासात प्रथमच धनत्रयोदशीदिवशी निर्देशांकात इतकी भक्कम वाढ झाली. निफ्टीची अंकांतील ही आतापर्यंतची सर्वात मोठी साप्ताहिक वाढ, तर टक्केवारीतील झेप फेब्रुवारी २०२१ नंतरची सर्वोत्तम ठरली. बीएसईवरील कंपन्यांच्या बाजारमूल्यातही सुमारे २८ लाख कोटींची भर पडली. खरेदीची लाट आणि गुंतवणुकीचा ओघ उद्योगविश्वाला मागणीचा संदेश देतात; सामान्य गुंतवणूकदारांच्या पोर्टफोलिओचे बाजारमूल्य वाढते आणि कंपन्यांना भांडवल उभारणी सुलभ होऊ शकते. सलग सात सत्रांची तेजी गुंतवणूकदारांचा विश्वास परतल्याचे दाखवते.

तेजीला अर्थव्यवस्थेची काही ठोस साथ आहे. रिझर्व्ह बँकेने २०२६-२७ च्या वास्तविक जीडीपी वाढीचा अंदाज ७.१ टक्के ठेवला. पहिल्या तिमाहीतील ७.८ टक्के वाढ खासगी उपभोग आणि गुंतवणुकीने समर्थित होती. सणासुदीतील वाहन आणि टिकाऊ वस्तूंच्या मागणीने विक्रीला हातभार लावला. बँकिंग आणि वित्तीय सेवांतील मोठ्या समभागांनी वाढीला सर्वाधिक आधार दिला.वाहन, ग्राहक टिकाऊ वस्तू आणि काही तंत्रज्ञान समभागांतही खरेदी झाली. पुढे २०२६-२७ च्या अर्थसंकल्पातील १२.२ लाख कोटींचा सार्वजनिक भांडवली खर्च हा रस्ते, रेल्वे, ऊर्जा, बांधकाम आणि भांडवली वस्तूंना काम देऊ शकतो. तो खासगी गुंतवणूक, रोजगार आणि उत्पादनक्षमतेत रूपांतरित झाला तर पायाभूत सुविधा व उत्पादन क्षेत्रातील वाढ कंपन्यांच्या नफ्यात उतरेल. आता रुपया २२ एप्रिलनंतर प्रथमच डॉलरच्या तुलनेत ९४ च्या खाली स्थिरावला. दहा वर्षांच्या भारतीय सरकारी रोख्यांवरील परतावा ७.२ टक्क्यांपर्यंत घसरला. गेल्या आठवड्यात तो जवळपास ७.५ टक्क्यांवर पोहोचला होता. परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी पुन्हा गुंतवणूक करण्यास सुरुवात केली असून या महिन्यात आतापर्यंत भारतीय शेअर बाजारात सुमारे ४.१ अब्ज डॉलर्सची निव्वळ खरेदी केली आहे. जानेवारी-ऑक्टोबर आणि संपूर्ण २०२५ मध्ये त्यांनी अनुक्रमे २३.२ अब्ज डॉलर्स आणि १८.९ अब्ज डॉलर्सची निव्वळ विक्री केली होती. या वरवरच्या बदलामागे तीन प्रमुख कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे, अर्थातच, ब्रेंट क्रूडच्या किमती गेल्या आठवड्यातील ११८ डॉलर्सच्या उच्चांकावरून १०० डॉलर्स प्रति बॅरलच्या खाली आल्या आहेत. हे अमेरिकेच्या मध्यावधी निवडणुकांमध्ये डेमोक्रॅट्सच्या दणदणीत विजयाच्या पार्श्वभूमीवर घडले आहे. या निकालांमुळे किमान सध्या तरी डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाकडून इराणविरुद्ध लष्करी कारवाई वाढण्याची चिंता कमी झाली आहे आणि पश्चिम आशियातील संघर्षावर राजनैतिक तोडगा निघेल, अशी अपेक्षाही वाढली आहे. स्वस्त तेल आणि डेमोक्रॅट्सनी दोन्ही सभागृहांवर नियंत्रण मिळवल्यामुळे महागाईचा धोका कमी झाला आहे. तसेच ट्रम्प यांच्या आक्रमक एकतर्फी धोरणांवर आधारित अमेरिकेकडून नवीन शुल्क आकारणीचा धोकाही कमी झाला आहे. अमेरिकन ट्रेझरी यील्ड गेल्या महिन्यातील जवळपास ५.४ टक्क्यांच्या उच्चांकावरून ४.८ - ४.९ टक्क्यांपर्यंत खाली आले आहेत.

आशियाई प्रमुख बाजारपेठांमध्ये केवळ भारताच्या बाजारपेठेतच वाढ दिसून आली. या बदलाची कारणे पाहायची झाल्यास जागतिक शेअर बाजाराची स्थिती पहावी लागेल. अमेरिकेतील एआयचा फुगा फुटण्याच्या मार्गावर असून आता परदेशी गुंतवणूकदार परत येण्याची आशा निर्माण झाली आहे. जगभरात एआय आणि सेमीकंडक्टर कंपन्यांच्या शेअर्सची मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे.

अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांमध्ये डेमोक्रॅटिक पक्षाच्या विजयानंतर, या कंपन्यांना अधिक कठोर नियमांना सामोरे जावे लागेल अशी भीती आहे. परिणामी, परदेशी गुंतवणूकदार आता अधिक चांगले मूल्यांकन आणि मजबूत आर्थिक पाया असलेल्या बाजारपेठांच्या शोधात आहेत. अशा परिस्थितीत भारत त्यांच्यासाठी एक आकर्षक पर्याय ठरू शकतो.

भाऊबीजेचे शास्त्र आणि प्रथा!



भाऊबीजेच्या दिवशी बहिणीने भावाला ओवाळायचे असते तसेच त्याच्या दीर्घायुष्या साठी प्रार्थनाही करायची असते. असे म्हणतात या दिवशी बहीण भावाकरिता जी प्रार्थना यमाईदेवीकडे करते त्या प्रार्थनेनुसार भावाला फळ मिळते आणि भाऊ आणि बहीण यांमध्ये असलेला देवाणघेवाण हिशोब कमी होण्यास मदत होते. बहीण विवाहित असेल तर या दिवशी भावाने बहिणीच्या घरी जाऊन तिच्या हातचे भोजन ग्रहण करावे. या दिवशी पत्नीच्या हातचे अन्न ग्रहण करू नये अशी पूर्वापार चालत आलेली प्रथा आहे. मात्र या प्रथा आजच्या पिढीपैकी अनेकांना माहित नाहीत. काळानुसार सण उत्सव साजरा करण्याच्या पद्धती बदलू लागल्या आहेत. आता तर रक्षाबंधन आणि भाऊबीज साजरा करताना बहिणीला उत्सुकता असते ती भाऊ आपल्याला कोणती भेटवस्तू देणार आहे त्याची. बहिणीने भावाला ओवाळल्यावर भावाने प्राणपणाने तिचे रक्षण करण्याचे वचन तिला द्यावे, बहीण लहान असेल तर तिला आशीर्वाद द्यावेत.

कालानुरूप या आशीर्वादाला भेटवस्तूचे स्वरूप प्राप्त झाले. आशीर्वाद आणि शुभेच्छांना खरेतर मोल नसते मात्र सद्यस्थितीला आपल्याला भाऊबीजेला काय भेटवस्तू हवी याची मागणी बहिणीकडून आधीच केली जाऊ लागली आहे. भावाने प्रेमाने दिलेल्या भेटवस्तूंमध्ये पसंत नापसंत पाहिली जाऊ लागली आहे. भाऊबीज हा खरेतर भाऊ आणि बहीण यांमधील स्नेहाचा आध्यात्मिक सण आहे त्यामुळे तो शास्त्र आणि प्रथा विचारांत घेऊनच साजरा व्हायला हवा.

मोक्षदा घाणेकर

'राष्ट्रीय शिक्षण दिन'

'राष्ट्रीय शिक्षण दिन' भारताचे पहिले शिक्षण मंत्री भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी ११ नोव्हेंबर रोजी 'राष्ट्रीय शिक्षण दिन' साजरा केला जातो. शिक्षण ही केवळ नोकरी मिळवण्याची शिडी नसून माणसाला माणूस बनवणारी आणि राष्ट्राला समृद्धीकडे नेणारी एक निरंतर चालणारी जीवनशैली आहे, हाच या दिवसाचा मुख्य संदेश आहे .आज ज्या आय आय टी आणि युजीसी सारख्या शिखर संस्थांवर देश अभिमानाने उभा आहे, त्यांची पायाभरणी मौलाना आझाद यांच्याच कार्यकाळात झाली.शिक्षण हे समाजाच्या प्रत्येक क्षेत्राचा कणा आहे, आणि जेव्हा हे शिक्षण 'परिचर्या' म्हणजेच नर्सिंग क्षेत्राशी जोडले जाते, तेव्हा ते केवळ बौद्धिक राहत नाही, तर त्याला आत्मिक आणि मानवी सेवेचे परिमाण लाभते.

शिक्षणाने समृद्ध करूया देशाचे भविष्य, परिचर्येने निरोगी राखूया सर्वांचे आयुष्य! परिचर्या शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञान नसून, ते एका जिवाला नवजीवन देणारे आणि समाजाला आरोग्याची संजीवनी देणारे पवित्र व्रत आहे.आजच्या आधुनिक युगात परिचर्या शिक्षण (नर्सिंग एज्युकेशन) झपाट्याने बदलत आहे. केवळ प्राथमिक शुश्रूषा करण्यापलीकडे जाऊन आजच्या परिचारिका आणि परिचारक उच्चशिक्षित, तंत्रज्ञानात कुशल



आणि गंभीर वैद्यकीय परिस्थिती हाताळण्यात सक्षम होत आहेत. बी.एससी. नर्सिंग, एम.एससी. नर्सिंग आणि या क्षेत्रातील संशोधन (रिसर्च) मुळे आरोग्य व्यवस्थेला एक नवी दिशा मिळाली आहे.मौलाना अबुल कलाम आझाद यांनी अशा शिक्षण पद्धतीचा पुरस्कार केला होता जी देशाला आत्मनिर्भर बनवेल आणि मानवी मूल्यांची जपणूक करेल. देशातील आरोग्य व्यवस्था बळकट करायची असेल, तर उच्च दर्जाचे परिचर्या शिक्षण तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील मुलींना आणि मुलांना नर्सिंग शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून आपण मौलाना आझाद यांचे महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करत आहोत.एक उत्तम शिक्षक ज्याप्रमाणे विद्यार्थ्याचे भविष्य घडवतो, त्याचप्रमाणे एक नर्सिंग ट्यूटर (नर्सिंग एज्युकेटर) देशाचे 'आरोग्यदूत' घडवत असतो. कोरोना महामारीच्या काळात जगाने परिचारिकांचे महत्त्व अनुभवले आहे.

राष्ट्रीय शिक्षण दिनाच्या निमित्ताने, परिचर्या शिक्षा दर्जा अधिक उंचावण्याचा संकल्प करणे हीच मौलाना आझाद यांना खरी श्रद्धांजली ठरेल. सामान्य शिक्षण आपल्याला जगायचे कसे हे शिकवते, तर परिचर्या शिक्षण दुसऱ्याचा जीव कसा वाचवायचा आणि जगाला आरोग्यसंपन्न कसे करायचे हे शिकवते कारण पुस्तकी ज्ञानाने विचार सुसंस्कृत बनतात, तर नर्सिंग शिक्षणाने मानवी सेवा सार्थ ठरतात!

तारा व्दा. शर्मा

गोकुळ दूध संघाची निवडणूक आणि वृत्ती!..

कोल्हापूर येथील बहुचर्चित गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळाच्या अटीतटीच्या निवडणुकीत सत्तारूढ युती सरकारप्रणीत पॅनेलला मोठा झटका बसला आहे. या निवडणुकीत महाविकास आघाडीप्रणीत पॅनेलने १३ जागा जिंकून बाजी मारली असून, युती समर्थित पॅनेलला १२ जागांवर समाधान मानावे लागले आहे. मात्र, महाविकास आघाडीकडे बहुमत असतानाही अध्यक्षपदाच्या निवडीवरून मोठा कायदेशीर आणि राजकीय पेच निर्माण झाला आहे.

गोकुळ दूध संघाच्या नियमानुसार अध्यक्ष निवडीच्या बैठकीसाठी किमान आवश्यक गणसंख्या (कोरम) उपस्थित असणे बंधनकारक असते. निवडणुकीत दोन्ही पॅनेलमध्ये अवघ्या एका जागेचा फरक (१३ विरुद्ध १२) असल्यामुळे आणि पराभूत गट बैठकीस अनुपस्थित राहिल्यास कोरम अभावी सभा रद्द करावी लागत आहे. पराभूत पॅनेल सहजासहजी विजयी गटासोबत येण्याची शक्यता नसून, विरोधी गटातून फूट पडल्याशिवाय अध्यक्ष निवडणे शक्य होत नाही. भविष्यात सहकारी संस्थांमध्ये अशी राजकीय कोंडी निर्माण होऊन कामकाज ठप्प होऊ नये, म्हणून राज्य सरकारने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमात सुधारणा करून शासनामार्फत नामनिर्देशित सदस्यांच्या नियुक्तीबाबत बदल केले आहेत.महाराष्ट्रात सत्तापालट झाल्यानंतर सहकार क्षेत्रावर वर्चस्व मिळवण्यासाठी सहकार कायद्यातील कलमांचा वापर करण्याची परंपरा जुनीच आहे. २०१९ मध्ये महाविकास आघाडी सरकार सत्तेत आल्यानंतर भाजप समर्थित प्रशासक मंडळ बदलून स्वतःला अनुकूल तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली होती, तर सत्ता बदलानंतर युती सरकारनेही तीच रणनीती वापरून विरोधी पक्षांच्या ताब्यातील संस्थांवर चौकशा लावल्या.आज जे पक्ष किंवा नेते विरोधी पक्षात बसून 'राजकीय सूडबुद्धी' किंवा 'धाडसत्राची' ओरड करत आहेत, त्यांनीसुद्धा सत्तेवर असताना नेमके हेच केले होते. त्यामुळे विरोधात असताना घसा कोरडा करून घ्यायचा आणि सत्तेत आल्यावर स्वतःच्या फायद्यासाठी कायदेशीर प्रक्रियेचा वापर करायचा, म्हणजेच 'आपले ठेवायचे झाकून आणि दुसऱ्याचे पाहायचे वाकून' असा हा प्रकार आहे. या राजकीय साठमारीत कोणताच पक्ष धुतल्या तांदुळासारखा उरलेला नाही. सहकार हा शेतकरी आणि दुग्ध उत्पादकांच्या कल्याणा साठी स्थापन झाला आहे; त्यामुळे सर्वच राजकीय पक्षांनी आत्मपरीक्षण करून सहकार क्षेत्रातील स्वायत्तता, नैतिकता आणि पारदर्शकता जपण्याची अत्यंत गरज आहे.

अविनाश देशपांडे

■ बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सदय

अकोला
जिल्हा विशेष

१० कोटींचा निधी वळता करण्याला नागपूर खंडपीठाची स्थगिती

आमदार नितीन देशमुख यांची याचिका; शासनाला उत्तर सादर करण्याचे निर्देश

■ प्रतिनिधी | अकोला ■



बाळापुर विधानसभा मतदारसंघातील विकास कामांसाठी मंजूर करण्यात आलेला १० कोटी रुपयांचा निधी इतरत्र वळता करण्यात आल्याच्या मुद्द्यावर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात १० नोव्हेंबर रोजी सुनावणी पार पडली असता, न्यायमूर्ती एम. एम.नेरलीकर यांनी स्थगिती आदेश जारी केला. तसेच या संदर्भात राज्य शासनाला उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

बाळापुर विधानसभा मतदारसंघातील जिल्हामार्ग तसेच ग्रामीण रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. या रस्त्यांवरील खड्ड्यांमुळे अनेक अपघात होऊन निष्पाप नागरिकांचा बळी गेला आहे. मागील सात वर्षांच्या कालावधीत खड्ड्यांमुळे ८५१ अपघात घडले आहेत. या अपघातांमध्ये ३३४ निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडले तसेच ११० जण गंभीर जखमी झाले. ही बाब आमदार नितीन देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन त्यांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच रस्ते दुरुस्तीसाठी १५० कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करण्याची मागणी केली होती. आमदार देशमुख यांच्या पत्राची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी तातडीने पहिल्या टप्प्यात १० कोटी रुपये मंजूर केले; परंतु, २ नोव्हेंबर रोजी हा निधी वाशिम जिल्ह्यातील विकास कामांवर वळता करून बाळापुर मतदारसंघातील प्रस्तावित कामांवरील निधी रद्द करण्यात आल्याची बाब उजेडात आली. या विरोधात उद्धवसेनेचे उपनेता आमदार नितीन देशमुख यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात याचिका दाखल केली. संबंधित याचिकेवर न्यायमूर्ती एम. एम. नेरलीकर यांच्यासमोर सुनावणी पार पडली असता, न्यायमूर्तींनी निधी वळता करण्याला स्थगिती दिली आहे. याचिकाकर्त्यांच्या वतीने ए. आर. देशपांडे यांनी बाजू मांडली.

शेतकऱ्यांसाठी आंदोलने केल्यामुळेच निधी रद्द

पश्चिम विदर्भातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने भरीव आर्थिक मदत द्यावी, यासाठी आमदार नितीन देशमुख यांनी पाच जिल्ह्यांमध्ये आंदोलनाचा बिगुल फुंकला होता. तसेच ३० ऑक्टोबर रोजी वाशिम जिल्ह्यात समृद्धी महामार्ग रोखण्यासाठी आंदोलन केले होते. या आंदोलनाचा धसका घेऊनच भाजपच्या एका स्थानिक आमदाराने मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक विद्याधर महाले यांना हाताशी धरून १० कोटी रुपयांचा निधी रद्द केल्याचा आरोप आमदार देशमुख यांनी पत्रकार परिषदेतून केला होता.

याचिकाकर्त्यांमध्ये सरपंचांचा समावेश

उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत बाळापुर मतदारसंघातील विविध गावांमधील सरपंचांचा समावेश आहे.

रस्ते दुरुस्तीसाठी शासनाकडून मंजुरी

आमदार नितीन देशमुख यांच्या पत्रानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीन प्रमुख रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्याचे निर्देश संबंधित विभागाला दिले होते. त्यानुषंगाने २१/०९/२०२६ रोजीचे तीन शासन निर्णय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. 'अमृतकाल रस्ते विकास आराखड्यांतर्गत' दिनांक २ नोव्हेंबर रोजीच्या पत्रान्वये, उपरोक्त रस्त्यांसाठी मंजूर केलेली रक्कम अचानकपणे दुसऱ्या रस्त्याच्या बांधकामाकडे वळविण्यात आल्याचा मुद्दा उच्च न्यायालयात प्रभावीपणे मांडण्यात आला.

सीसीटीएनएसमध्ये अकोला पोलिसांची विजयाची हॅट्ट्रिक!

सलग तिसऱ्यांदा राज्यात प्रथम; २०१ पैकी २०१ गुणांसह १०० टक्के यश, अमरावती परिक्षेत्रातही अव्वल

■ प्रतिनिधी | अकोला ■



गुन्हे तपास, प्रतिबंधात्मक कारवाई आणि पोलीस कामकाजात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्याच्या बाबतीत अकोला पोलीस दलाने पुन्हा एकदा आपली कामगिरी सिद्ध केली आहे. गुन्हे आणि गुन्हेगारांचा मागोवा घेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या सीसीटीएनएस (क्राईम अँड क्रिमिनल ट्रॅकिंग नेटवर्क सिस्टीम) प्रणालीच्या राज्यस्तरीय मूल्यांकनात अकोला पोलिसांनी सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक पटकावला आहे. जुलै २०२६ च्या मूल्यांकनात २०१ पैकी २०१ गुण मिळवत शंभर टक्के यश संपादन केले. विशेष म्हणजे, अमरावती पोलीस परिक्षेत्रातही अकोला जिल्हा अव्वल ठरला आहे.

पोलीस दलाच्या कामकाजात सुसूत्रता आणण्यासाठी देशभरात सीसीटीएनएस प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे. पोलीस ठाण्यांमधील गुन्ह्यांची नोंद, तपासाची माहिती आणि विविध अभिलेखांचे ऑनलाइन संकलन या प्रणालीद्वारे केले जाते. ई-तक्रार, अनोळखी मृतदेहांची ओळख, बेपत्ता व्यक्तींचा शोध, वाहनांची पडताळणी, गुन्हे प्रतिबंध आणि गुन्हे उघडकीस आणण्यासाठी ही प्रणाली महत्त्वाची ठरते.

अकोला पोलीस दलाने या प्रणालीचा केवळ तांत्रिक वापर न करता दैनंदिन कामकाजात प्रभावी अंमलबजावणी केली. सर्व गुन्ह्यांची माहिती प्रसिद्ध करून सिटीझन पोर्टलवर नागरिकांसाठी शंभर टक्के माहिती उपलब्ध करून देण्यात आली. गुन्हे अन्वेषणासाठी सीआरआय-मॅक आणि आयसीजेएस यांसारख्या पोर्टलचा प्रभावी वापर करण्यात आला. महिला व बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये आयटीएसएसओ पोर्टलच्या माध्यमातून दोषारोपपत्र विहित मुदतीत दाखल करण्यावर भर देण्यात आला.

याशिवाय सराईत गुन्हेगारांविरुद्ध प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई, अनोळखी मृतदेह आणि बेपत्ता व्यक्तींची ओळख पटविण्यासाठी सीसीटीएनएसचा वापर तसेच प्राप्त ई-तक्रारींचे शंभर टक्के निराकरण करण्यात आले. या सर्व बाबींची राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, पुणे यांच्याकडून तपासणी करून घटकनिहाय गुणांकन केले जाते. त्यानुसार मासिक राज्यस्तरीय क्रमवारी जाहीर करण्यात येते.

जुलै महिन्याच्या मूल्यांकनात राज्यातील एकूण ५३ पोलीस घटकांमध्ये अकोला पोलीस दलाने पूर्ण गुण मिळवत अव्वल स्थान कायम राखले. सलग तीन महिने नव्हे, तर सलग तिसऱ्यांदा प्रथम क्रमांक मिळविण्याची ही कामगिरी अकोला पोलीस दलासाठी विशेष अभिमानाची ठरली आहे.

या यशामागे पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचे मार्गदर्शन आणि नियमित आढावा यंत्रणा महत्त्वाची ठरली.

सीसीटीएनएस अंमलदारांचे नियमित प्रशिक्षण, पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्यांच्या आढावा बैठका, गुन्हे परिषदांमध्ये प्रणालीच्या कामकाजाचे मूल्यमापन तसेच पोलीस ठाण्यांना भेटी देऊन तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यावर भर देण्यात आला.

सीसीटीएनएसचे नोडल अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर, सहायक पोलीस निरीक्षक पुष्पलता शिरसाट (वाघ), पोलीस हेड कॉन्स्टेबल सतीश जयराम भातखडे, निखिल भास्करराव सावळे, रामसिंग रामधन जाधव, पोलीस कॉन्स्टेबल शुभम संजय सुरवाडे, नारायण लक्ष्मण नाईक आणि महिला पोलीस कॉन्स्टेबल वैशाली रामराव काळपांडे यांनी या कामगिरीसाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे आणि उपविभागीय स्तरावरील सीसीटीएनएस अंमलदारांचेही या यशात योगदान आहे.

महानगरात पहिल्यांदाच राज्यस्तरीय ख्रिस्ती कविसंमेलन; काव्यरचनांनी रंगला साहित्यसोहळा

विविध जिल्ह्यांतील कवींचा सहभाग; मान्यवरांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन आणि पुरस्कार वितरण



■ प्रतिनिधी | अकोला ■

मानवता, साहित्य आणि सांस्कृतिक विचारांचा संगम घडविणारे राज्यस्तरीय ख्रिस्ती कविसंमेलन अकोल्यात उत्साहात पार पडले. अकोल्यात प्रथमच आयोजित या दोन दिवसीय साहित्य सोहळ्यात राज्याच्या विविध भागांतून आलेल्या कवी, साहित्यिक आणि साहित्यप्रेमींनी सहभाग नोंदविला. निमंत्रित कवींच्या बहारदार काव्यरचनांनी संमेलनाला विशेष रंगत आणली.

मानवता प्रतिष्ठानच्या पुढाकारातून ख्रिस्तवाणी शब्दगाणी समूह आणि दयासागर सामाजिक आरोग्य व बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने ७ व ८ नोव्हेंबर रोजी या संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. पुणे, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, अकोला, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, वर्धा, सोलापूर, दौंड, बारामती आणि बेळगाव आदी ठिकाणांहून साहित्यिक व प्रतिनिधी उपस्थित होते.बिशप सतीश यंगड यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन करण्यात आले. नागपूर येथील प्रा. गिरीश खत्री यांनी संमेलनाध्यक्षपद भूषविले. यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. अनुपमा उजगरे यांच्या 'ज्योतिबा एक महात्मा' या पुस्तकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यासोबतच डॉ. संगीता साने आणि ज्योती सूर्यवंशी यांच्या पुस्तकांचेही प्रकाशन करण्यात आले.

संमेलनाच्या निमित्ताने आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात साहित्य व सामाजिक-सांस्कृतिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मान्यवरांचा गौरव करण्यात आला. डॉ. अनुपमा उजगरे यांना 'पंडिता रमाबाई गौरव पुरस्कार', दिलीप क्षीरसागर यांना 'मानवता संगीत गौरव पुरस्कार', तर आचार्य जयप्रकाश आढाव यांना 'मानवता सांस्कृतिक कार्य गौरव पुरस्कार' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.या साहित्य सोहळ्यात ख्रिस्ती तसेच ख्रिस्तेतर कवींचे स्वतंत्र काव्यविश्व रसिकांसमोर उलगडले. निमंत्रित कवींनी आपल्या आशयपूर्ण आणि बहारदार रचना सादर करत उपस्थितांची मने जिंकली. विविध विषयांवरील कवितांच्या सादरीकरणातून साहित्यिक अभिव्यक्तीला व्यासपीठ मिळण्यासोबतच सामाजिक सलोखा आणि साहित्यिक संवादालाही चालना मिळाली.

संपूर्ण संमेलनाचे आयोजन डॉ. संगीता साने यांनी केले. बिशप प्रदीप वाघमारे, कवयित्री स्वरलता आंग्रे, कवी आनंद चोपडे आणि कवयित्री डॉ. अपूर्वा वानखेडे यांनी विविध सत्रांचे सूत्रसंचालन केले. राज्यभरातील साहित्यिकांच्या सहभागामुळे अकोल्यातील हा पहिलाच राज्यस्तरीय ख्रिस्ती कविसंमेलन साहित्यविश्वात लक्षवेधी ठरला.

राजस्थानी सेवा संघाचे दिवाळी स्नेहमिलन उत्साहात संपन्न

■ प्रतिनिधी | अकोला ■

राजस्थानी समाजाच्या विकासासाठी सेवाभावी कार्य करणाऱ्या राजस्थानी सेवा संघाचे दीपावली स्नेहमिलन सोहळा उत्साहात संपन्न झाला.सोमवारी स्थानिक रायली जीन येथील ओसवाल भवनात ओसवाल समाजाच्या आतिथ्यात आयोजित या समारंभाचे अध्यक्षस्थान राजस्थानी सेवा संघाचे अध्यक्ष राजेश जैन यांनी भूषवले.वक्ते म्हणून जालना येथील जीवनप्रेरक इंद्रकुमार गादिया हे होते. तर मंचावर सेवा संघाचे महासचिव नरेश बियाणी, आ वसंत खंडेलवाल, माजी आ बबनराव चौधरी, माजी महापौर मदन भरगड, मनपा स्थायी समितीचे सभापती विजय अग्रवाल, ओसवाल भवन ट्रस्टचे अध्यक्ष विनोद गोलेछा, सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष अँड मोतीसिंग मोहता, अग्रवाल समितीचे अध्यक्ष महेंद्र खेतान, शांतीलाल भाला, संजय खंडेलवाल, दिलीप खत्री, सोनार कमलकिशोर वर्मा, अँड. सुभाषसिंह ठाकूर, जाट समाजाचे रमेश राजोरिया, सेन समाजाचे धनराज अजाडीवाल, जांगीड समाजाचे मंगेशकुमार जांगीड, जिनगर समाजाचे दीपक साकला, कुमावत बेलदार समाजाचे अध्यक्ष अँड पप्पू मोरवाल, अजय सेंगर, जगदीश प्रजापत, विजय तिवारी, निकेश गुप्ता, संध्या अग्रवाल आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेची घंटा पुन्हा वाजली; माजी विद्यार्थ्यांची रंगली एकदिवसीय शाळा!

भीकमचंद खंडेलवाल विद्यालयात १९८८ च्या तुकडीचे १२ वे स्नेहमिलन

■ प्रतिनिधी | अकोला ■



शाळेतील वर्गखोली, प्रार्थना, पीटीचा तास, गुरुजनांचे मार्गदर्शन आणि मित्रांसोबतच्या आठवणी... आयुष्याच्या धावपळीत मागे पडलेले हे दिवस पुन्हा एकदा अनुभवण्याची संधी भीकमचंद खंडेलवाल विद्यालयाच्या १९८८ च्या माजी विद्यार्थी तुकडीने उपलब्ध करून दिली. डाबकी रोडवरील या विद्यालयात माजी विद्यार्थ्यांची आगळीवेगळी एकदिवसीय शाळा भरली.

विशेष म्हणजे, सलग बाराव्या वर्षी हा उपक्रम त्याच शाळेत, त्याच वर्गखोलीत आणि त्याच गुरुजनांच्या सानिध्यात उत्साहात पार पडला.

नोकरी, व्यवसायानिमित्त विविध ठिकाणी स्थायिक झालेले वर्गमित्र दिवाळीच्या सुट्टीत अकोल्यात एकत्र येतात. याच संधीचे औचित्य साधत श्री. राम भिरड यांच्या संकल्पनेतून या अनोख्या स्नेहमिलनाची सुरुवात झाली. गेल्या १२ वर्षांपासून सर्व वर्गमित्र या दिवसाची आतुरतेने वाट पाहतात. यंदाही शाळेची प्रार्थना आणि पीटीच्या तासाने जुन्या आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांनी रांगेत वर्गात प्रवेश केला. जणू काही पुन्हा एकदा शालेय जीवनात परतल्याचा आनंद प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसत होता.

या तुकडीला घडविणारे शिक्षक मारोती गोतमारे, विनायक जोशी तसेच विद्यालयाचे विद्यमान मुख्याध्यापक अभय वानखडे यांची उपस्थिती या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरली. विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत शिक्षकांचे योगदान अनमोल असते. आई-वडिलांकडून मिळणाऱ्या संस्कारांइतकेच शाळेतील गुरुजनांचे मार्गदर्शन व्यक्तिमत्त्व घडविण्यात महत्त्वाचे असते. याच भावनेतून माजी विद्यार्थ्यांनी गुरुजनांना आमंत्रित करून त्यांच्याप्रति कृतज्ञता आणि आदर व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक गेल्या १२ वर्षांपासून संपूर्ण तुकडीला एकत्र बांधून ठेवणारे संयोजक राम भिरड यांनी केले. यावेळी तुकडीतील डॉ. निशिकांत देशपांडे, कृतिशील शिक्षक मधुसूदन घोडे आणि डॉ. कृष्णकांत वक्टे यांचा उपस्थित गुरुजनांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पसायदान आणि त्यानंतर दिवाळीच्या फराळाच्या गोडव्याने या स्नेहमिलनाची सांगता झाली.

स्नेहमिलनासोबत सामाजिक बांधिलकीही

केवळ जुन्या आठवणींना उजाळा देणे एवढ्यापुरताच या माजी विद्यार्थ्यांचा उपक्रम मर्यादित नाही. स्नेहमिलनासोबत सामाजिक दायित्वाची जाणीवही त्यांनी जपली आहे. दरवर्षी स्थानिक गायत्री बालिकाश्रमातील एका अनाथ मुलीचे पालकत्व स्वीकारून तिच्या संपूर्ण वर्षभराच्या शैक्षणिक खर्चाची जबाबदारी सर्व वर्गमित्र मिळून पार पाडतात. याशिवाय दहावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षेपूर्वी सराव प्रश्नसंचांचे वाटपही केले जाते. मैत्रीचा धागा जपत गुरुजनांप्रति कृतज्ञता व्यक्त करणे आणि त्याचवेळी गरजू विद्यार्थिनीच्या शिक्षणाला हातभार लावणे, अशा दुहेरी उद्देशाने १९८८ च्या या तुकडीने स्नेहमिलनाची एक वेगळीच परंपरा निर्माण केली आहे.

सनदी लेखापाल वर्गाचा आदिवासी बांधवांसाठी कपडे व मिष्टान्न वाटप उपक्रम



■ प्रतिनिधी | अकोला ■

द इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया च्या डब्ल्यूआयआरसी अकोला शाखा आणि विकासा अकोला शाखेच्या संयुक्त विद्यमाने दिवाळी निमित्त अकोट येथे आदिवासी बांधवांसाठी एका विशेष 'कपडे आणि मिष्टान्न वाटप मोहिमेचे' साकार करण्यात आली.या सामाजिक उपक्रमाला आयसीएआय अकोला शाखेचे चेअरमन सीए रोमिल सोजतिया आणि विकासा चेअरमन सीए धीरज चांडक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. याप्रसंगी डब्ल्यूआय आर सी अकोला शाखा कमिटीचे सदस्य आणि विकासा मॅनेजमेंट कमिटीचे सर्व सदस्य उपस्थित होते. त्यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.'छोटी कृती,मोठा प्रभाव!' या ब्रीदवाक्याखाली राबवण्यात आलेल्या या मोहिमेच्या निमित्ताने दिवाळीच्या सणाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी अकोट परिसरातील गरजू आदिवासी कुटुंबांना आधार देण्यासाठी कपडे व लहान मुलांना मिष्टान्न आणि खाऊचे वाटप करण्यात आले.

आश्रय नगरच्या काकडा आरतीस भक्तांचा प्रतिसाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

दाबकी नगर येथील आश्रय नगर येथील हनुमान शिव मंदिरात दीपावली पर्वात आयोजित काकडा आरतीस भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. एक महिना चालणाऱ्या या काकडा आरती प्रारंभ दिनी भव्य दिंडी सोहळा संपन्न झाला.ही दिंडी वारकरी व भजनी मंडळ व टाळ मृदुंगाच्या गजरात हनुमान शिव मंदिर अंबिका नगर येथुन निघुन परिसरातील पाण्याची टाकी आश्रयनगर,नागोबा मंदिर, गुरुदत्त नगर, श्री हनुमान मंदिर, नंदाने मंगल कार्यालय आदी अंबिका नगर,आश्रय नगर , गुरुदत्त नगर परिसरात जाऊन श्री हनुमान शिव मंदिर अंबिका नगर येथे या दिंडीचे समापन झाले.

'मौलाना अबुल कलाम आझाद' महान विचारवंत, स्वातंत्र्य सेनानी आणि भारताचे शिक्षण निर्माते

अकोला : भारताच्या इतिहासात काही अशाच मोजक्या व्यक्ती आढळतात, ज्यांचे जीवन आणि कार्य देश आणि समाजासाठी मार्गदर्शक ठरले आहे. मौलाना अबुल कलाम आझाद या प्रबुद्ध आणि सर्वोच्च शिखरावर पोहोचलेल्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक आहेत. मौलाना अबुल कलाम आझाद केवळ स्वातंत्र्यलढ्याचे एक निःस्पृह सेनानीच नव्हते, तर उच्च कोटीचे मुफस्सिर-ए-कुराण (कुराणचे स्पष्टीकरण करणारे), विचारवंत, साहित्यिक आणि स्वतंत्र भारताचे पहिले शिक्षण मंत्रीसुद्धा होता. मौलाना अबुल कलाम आझाद संपूर्ण जीवन राष्ट्रप्रेम, ज्ञानप्रेम आणि मानवी मूल्यांच्या जपणुकीसाठी समर्पित होते.

Change In Name

I have changed my name from
KANTA RAJABHAU DESHAMUKH
-TO- **KANTA RAJABHAU DESHMUKH**
Passport No. U1442044 My Address is AT. GORDHA POST. HINGANI. BK TQ. TELHARA DIST. AKOLA. PIN-444103

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं.१८२२/२०२६ — प्रोसेस नं.१३८८४/२०२६
चौ.ता. १०/१२/२०२६ — दिनांक : २९/१०/२०२६

अर्जदार : १. शोभा प्रल्हादराव राकेश २. राजेश प्रल्हादराव राकेश दोघेही रा. झेन बिल्डिंग, गौरक्षण रोड, भक्ती धाम मंदिराच्या मागे, नगर परिषद कॉलनी, पो. गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला. अर्जदार क. २ सध्या रा. बी / २ - ए, गेट नं. ३ अभिमानश्री सोसायटी, पाषाण रोड, औंध, पुणे ता. जि. पुणे.

विरुध्द

गैरअर्जदार : निल

मयताचा पत्ता : - मयत : प्रल्हादराव रामचंद्र राकेश

पत्ता :- रा. झेन बिल्डिंग, गौरक्षण रोड, भक्ती धाम मंदिराच्या मागे, नगर परिषद कॉलनी, पो. गांधीनगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रल्हादराव रामचंद्र राकेश यांचे दि. ११/०८/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १० / १२/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

जाहीर सूचना माझे पक्षकार य ांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. संदीप बबनराव काकडे, रा. अकोला, ता. आणि जि. अकोला हे मौजे शिवार, ता. व जि. अकोला. येथील सर्व्हे क्र. ३/२ मधील अकृषक लेआउट प्लॉट क्र. ५४, एकूण क्षेत्रफळ २८५.०० चौ.मी. पैकी ४६.४६ चौ.मी. त्यावरील बांधकामासह, हि मालमत्ता खरेदी करण्याचा करार श्री. संतोष मधुकर सोनुने, याच्याशी केला असून, श्री. संतोष मधुकर सोनुने हे सदर मालमत्ता रजिस्टर खरेदी क्र. ६६३, दिनांक २६/०२/२०२२ अन्वये मालकी व ताब्यात आहे. सदर मालमत्तेची श्री. शिवलाला क्षिराम वैराळे व श्रीमती. जानवी जगदीश घुगे यांच्या मधील जुनी मूळ खरेदी क्र. ६६४, दि. १०/०२/२०१४ हरवले /गहाळ झाले आहे. माझे पक्षकार सदर मालमत्तेवर ICICI Home Finance Company मार्फत कर्ज घेत असून त्याकरिता नमूद मालमत्ता गहाण देत आहेत, म्हणून सदर गहाळ दस्ताची अत्यन्त अवशक्त आहे. तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि, सदर मालमत्तेवर कोणाचाही कुटल्याही प्रकारचा हिस्सा, अधिकार किंवा गहाण, दान, बक्षीस, तं ोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंवा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ७ दिवसांच्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुटल्याही प्रकारे काहीहि ऐक हक्क, अधिकार, हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार/देणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- १०/११/२०२६

Adv. Gaurav S. Deshmukh
Flat no. S-4 on 2nd Floor,
'Vaishnavi Complex'
MSEB Power House,
Gourakshan Road. Tq. And
Dist. Akola (MH) 444001
Mob. No. 9028232246

जाहीर नोटीस

जाहीर सूचना माझे पक्षकार य ांनी दिलेल्या महिती वरून सर्व नागरिकांना तसेच वित्तीय संस्था व बँक यांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते कि, माझे पक्षकार श्री. आशिष गंगाधर पवार, रा. बोरगाव मंजू, ता. आणि जि. अकोला यांच्या मालकी व ताब्यातील मालमत्ता मौजा/कसबे बोरगाव मंजू, ता. आणि जि. अकोला येथील सर्वे नं. ३३६/क, मधील अकृषक लेआउट प्लॉट नं. ३३, या पैकी उत्तरेकडील क्षेत्रफळ ७५.०० चौ. मी. हा प्लॉट श्री. मधुकर गणपतराव चुंबळे याच्या कडून र.द.क्र. १९४७; दि. १३/०५/२०१९ ने खरेदी केली असून सदर मालमत्तेची जुने मूळ नोंदणीकृत खरेदीखत ज्याचे र.द.क्र. ८१५; दि. २१/०२/२०१३ व र.द.क्र. ३३७३; दि. ०७/१०/२००९, हि गहाळ झाल्या आहेत, जर कोणालाही ती मिळाले असल्यास खाली संपर्क साधावा. तसेच सदर मालमत्तेवर AU Small Finance Bank Ltd मार्फ त कर्ज घेत असून त्याकरिता माझे पक्षकार हे वरील नमूद मालमत्ता गहाण देत आहेत, त्याकरिता सदर दस्ताची अत्यन्त आवशक्यता आहे. तरी जाहीर नोटीस द्वारे, आपणास कळविण्यात येते कि,सदर मालमत्तेवर कोणाचाही कुटल्याही प्रकारचा हिस्सा,अधिकार किंवा गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केला असल्यास, तथा ताबा असल्यास, किंवा कुठलाही दिवाणी अथवा फौजदारी दावा प्रलंबित व निकाली असल्यास, संबंधित व्यक्तीने नोटीस वृत्तपत्रात जाहीर झाला तारखे पासून ३० दिवस च्या आत संपर्क साधावा; तसे न केल्यास सदर मालमत्तेवर कोणाचाही कुटल्याही प्रकारे काहीहि ऐकू हक्क, अधिकार,हित-संबंध आणि आक्षेप नसल्याचे समजले जाईल.तसेच भविष्यात सदर गहाळ दस्त विचारात घेऊन कुठलाही व्यवहार जसेकी खरेदी, गहाण, दान, बक्षीस, तोंडी करार केलेले आढळल्यास त्यास सर्वस्वी लिहून घेणार जबाबदार राहील.

अकोला
दिनक:- ०९/११/२०२६

Adv. Gaurav S. Deshmukh
Flat no. S-4 on 2nd Floor,
'Vaishnavi Complex'
MSEB Power House,
Gourakshan Road. Tq. And
Dist. Akola (MH) 444001
Mob. No. 9028232246

जनमाध्यम प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३२८
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठीत सवय

फळबागा वाळू देणार नाही ,अमर काळेंच्या पाठपुराव्याने विंधन विहिरींना मुभा

दुष्काळी निर्बंधांना उस अपवाद; पर्यायी सिंचन नसलेल्या संत्रा उत्पादकांना मोठा दिलासा

वर्धा/जनमाध्यम

भूजल पातळी खालावण्याच्या भीतीने विंधन विहिरी खोदण्यावर बंदी घालणाऱ्या प्रशासनाला अखेर फळबागधारक शेतकऱ्यांच्या संकटाची दखल घ्यावी लागली. पाण्याअभावी वर्षानुवर्षे जोपासलेल्या संत्रा आणि इतर फळबागा डोळ्यांदेखत वाळत असताना केवळ निर्बंधांचा बडगा दाखवून चालणार नाही, अशी भूमिका घेत खा.अमर काळे यांनी प्रशासनाकडे जोरदार पाठपुरावा केला. त्यांच्या मागणीला यश आले असून, सिंचनाचा अन्य कोणताही पर्याय उपलब्ध नसलेल्या फळबागधारकांना विशेष बाब म्हणून विंधन विहिरी खोदण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

जिल्ह्यात यंदा पाणीटंचाईचे संकट गंभीर बनले आहे. भूजल पातळी आणखी खालावू नये, यासाठी प्रशासनाने विंधन विहिरी खोदण्यावर निर्बंध घातले होते.मात्र, या निर्बंधांचा सर्वाधिक फटका संत्रा उत्पादक आणि इतर फळबागधारक शेतकऱ्यांना बसत होता.अनेक शेतकऱ्यांनी वर्षानुवर्षे कष्ट,भांडवल आणि मेहनत खर्च करून फळबागा उभ्या केल्या आहेत. आता पाण्याअभावी त्या वाळण्याच्या मार्गावर असताना विहीर खोदण्यासही बंदी असल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडले होते.

ही परिस्थिती लक्षात घेऊन खासदार अमर काळे यांनी जिल्हाधिकारी वर्धा आणि अमरावती यांच्याकडे पत्राद्वारे शेतकऱ्यांची व्यथा मांडली. पाणीटंचाईच्या काळात भूजल संवर्धनाचे महत्त्व मान्य असले तरी ज्या शेतकऱ्यांकडे सिंचनासाठी दुसरा कोणताही पर्याय नाही, त्यांच्या फळबागा वाचविण्यासाठी



विशेष परवानगी देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काळे यांच्या मागणीची जिल्हा प्रशासनाने दखल घेत हा विषय शासनाकडे पाठविला. मुख्यमंत्री स्तरावरही या प्रश्नाचा सकारात्मक विचार करण्यात आला.अखेर पर्यायी जलस्रोत नसलेल्या फळबागधारक शेतकऱ्यांना विशेष बाब म्हणून विंधन विहिरी खोदण्याची मुभा देण्यात आली.

केवळ विहिरी खोदण्याची परवानगी नव्हे,तर शेतकऱ्यांच्या वर्षानुवर्षाच्या कष्टांना जगविण्याचा हा निर्णय आहे. संत्रा बागा आणि इतर फळबागा वाचविण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार आहे. विशेषतः पाण्याचा अन्य स्रोत नसलेल्या शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.

या निर्णयाबद्दल खा.अमर काळे यांनी प्रशासनाचे आभार मानले असून, शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सकारात्मक भूमिका घेतल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

संकटाच्या काळात शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहून त्यांचे प्रश्न शासनदरबारी मांडण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचे शेतकरी वर्गातून स्वागत होत आहे.

गुन्हे वृत्त

सिंदी रेल्वे यार्डातील घटना; मृताची ओळख पटविण्याचे प्रयत्न

वर्धा - सिंदी रेल्वे स्थानकाच्या यार्ड परिसरातील डाऊन मेन लाईनवर एका ३५ वर्षीय व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. ७ नोव्हेंबर रोजी ही घटना उघडकीस आली. रेल्वे रुळावर मृतदेह आढळल्याची माहिती मिळताच परिसरात चर्चा सुरू झाली. सिंदी रेल्वे स्थानकाच्या यार्डमधील डाऊन मेन लाईन परिसरात संबंधित व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वर्धा लोहमार्ग पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ वर्षे असल्याचे सांगण्यात आले. मात्र, वृत्त लिहिस्तोवर मृताची ओळख पटलेली नव्हती. मृत्यू नेमका कोणत्या कारणाने झाला, याबाबतही स्पष्टता नव्हती. या प्रकरणी वर्धा लोहमार्ग पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून मृताची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. पुढील तपास लोहमार्ग पोलिस करीत आहेत.

लघुशंकेसाठी थांबणे वृद्धाच्या जीवावर बेतले

सेलू - रस्त्याच्या कडेला लघुशंकेसाठी दुचाकी थांबवून उभ्या असलेल्या वृद्धाला भरधाव कारने धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जखमी झाला. ही घटना सेलू पोलिस ठाण्याच्या हद्दीतील केळझर परिसरात घडली. बाबा हरीभाऊ शंभरकर (७४), रा. दादाजी धुनिवाले चौक, वर्धा हे दुचाकीने प्रवास करीत होते. दरम्यान, केळझर परिसरात ते लघुशंकेसाठी थांबले असताना एमएच २७ डीएल १५८८ क्रमांकाच्या कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या धडकेत शंभरकर जखमी झाले.घटनेनंतर या प्रकरणी जखमी शंभरकर यांनी सेलू पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी ८ नोव्हेंबर रोजी संबंधित कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या अपघाताचा पुढील तपास सेलू पोलिस करीत आहेत.

काँक्रिट मटेरियल वाहतूक करताना अपघात

तळेगाव (श्या.पंत.) - काँक्रिट मटेरियल घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरवरून पडल्याने २१ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. दीपक रंजीत मुंडा (२१), रा. किन्हाळा, ता. आष्टी असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेमुळे किन्हाळा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. दीपक मुंडा हा काँक्रिट मटेरियल घेऊन जाणाऱ्या ट्रॅक्टरवर होता. दरम्यान, प्रवासादरम्यान तो ट्रॅक्टरवरून खाली पडला. या घटनेत त्याला गंभीर दुखापत झाली. त्यातच त्याचा मृत्यू झाला.घटनेची माहिती मिळताच संबंधित यंत्रणेकडून नोंद घेण्यात आली. याप्रकरणी ८ नोव्हेंबर रोजी तळेगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. दीपकच्या मृत्यूमुळे त्याच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

गवळणीने वाढविली दिवाळीची शान

मोबाईलच्या आभासी दुनियेत हरवणाऱ्या लोककलेला उजाळा

साहूर/जनमाध्यम

आजच्या सोशल मीडियाच्या झगमगाटात गावागावांतील पारंपरिक लोककला आणि संस्कृतीच्या पाऊलखुणा पुसट होत चालल्या आहेत. मोबाईलच्या पडद्यावर मनोरंजन शोधणाऱ्या नव्या पिढीला आपल्या समृद्ध लोकपरंपरेचा विसर पडत असताना साहूर आणि सावंगा (पुनर्वसन) येथील हौशी तरुणांनी मात्र दिवाळीच्या पाडव्याला गौळण काढून संस्कृतीची ज्योत तेवत ठेवली. ढोलकीचा ठेका, झांजेचा निनाद, लोकगीतांचा गजर आणि गौळणीच्या नृत्याने गावोगावी दिवाळीचा आनंद द्विगुणित केला.

एकेकाळी दिवाळीचा पाडवा म्हटला की गावातील गल्लीबोळांतून गौळण निघायची.पारंपरिक वेशभूषा, लोकवाद्ये आणि लोकगीतांच्या माध्यमातून आबालवृद्धांचे मनोरंजन व्हायचे. ही केवळ करमणूक नव्हती, तर गावातील माणसांना एकत्र आणणारी आणि मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारी लोकपरंपरा होती. मात्र,आधुनिक मनोरंजनाच्या साधनांमुळे ही कला हळूहळू लोप पावत आहे.

अशा परिस्थितीत साहूर आणि सावंगा येथील उत्साही नागरिकांनी ही परंपरा पुन्हा जिवंत करण्याचा



प्रयत्न केला. गोंदिया येथील पुरुष नृत्यकलाकार रश्मी याला नऊवारी साडी नेसवून पारंपरिक वेशभूषेत सजविण्यात आले होते. झांज, चोनकं आणि ढोलकीच्या तालावर थिरकणाऱ्या गवळनीने गावातील प्रत्येक गल्लीबोळ गाजविला. गावातील पाटील, सरपंच आणि प्रतिष्ठित नागरिकांच्या घरी जाऊन गौळणीने लोकगीते आणि नृत्य सादर केले.

परंपरा जपणे म्हणजे संस्कृतीचे ऋण फेडणे

आजच्या पिढीने केवळ सोशल मीडियावर संस्कृतीचे फोटो आणि व्हिडिओ पाहण्यापेक्षा प्रत्यक्ष लोककलेत सहभागी होण्याची गरज आहे.

साहूरकरांच्या या उपक्रमाने मनोरंजनासोबतच गावपण, माणुसकी आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा संदेश दिला आहे. गवळणीच्या निमित्ताने दिवाळीचा पाडवा केवळ सण न राहता लोकसंस्कृतीचा उत्सव ठरला.

अवघ्या २१ व्या वर्षी ओम तिवारींची राज्य निवड समितीवर नियुक्ती

वर्धा- वयाच्या अवघ्या २१ व्या वर्षी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविणाऱ्या वर्ध्याच्या ओम सतीश तिवारी यांनी क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघाच्या निवड समितीवर सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली असून, आगामी राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्या व्यवस्थापकपदाची जबाबदारीही त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या दुहेरी नियुक्तीमुळे वर्ध्याच्या क्रीडा क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ओम तिवारी हे वर्धा जिल्हा हौशी टेबल टेनिस संघटनेचे सचिव असून, ओएसजी टेबल टेनिस अकादमी येथे मुख्य प्रशिक्षक म्हणून कार्यरत आहेत.विशेष म्हणजे, अवघ्या २१ व्या वर्षी राज्य निवड समितीवर स्थान मिळविणे आणि राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाच्या व्यवस्थापकपदाची जबाबदारी मिळणे ही त्यांच्या क्रीडा प्रवासातील महत्त्वाची उपलब्धी मानली जात आहे.

फुले विचारांचा वारसा तरुणाईने पुढे न्यावा - राज्यमंत्री पंकज भोयर

वर्धा/जनमाध्यम

आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात तरुणाईने उच्च शिक्षणासोबत सामाजिक जाणीव, संवेदन शीलता आणि विवेकही जोपासला पाहिजे. हातात आधुनिक तंत्रज्ञान असताना डोक्यात महात्मा फुले यांचे पुरोगामी विचार असणे ही काळाची गरज आहे.शिक्षणाच्या माध्यमातून अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद मिळते. त्यामुळे महात्मा फुले यांच्या विचारांचा वारसा नव्या पिढीने पुढे न्यावा, असे प्रतिपादन राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

श्री. माळी वैभव मासिकाच्या वतीने सत्यनारायण बजाज वाचनालय येथे गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.प्रा.धनंजय सोनटक्के होते. उद्घाटक म्हणून आनंदवन,वरोरा येथील विश्वस्त सुधाकरराव कडू उपस्थित होते. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ,विकास सावरकर, डॉ.सागर गौरकर,दीपक फुलकरी,विनय डहाके,डॉ. कल्याणी धाकूलकर,अमन सुतरकर,मुख्य आयोजक वासुदेव कडुकर,संदीप चिचाटे,रोहिणी पाटील आणि रिद्धी लेकुरवाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

महात्मा फुले यांच्या मते शिक्षण



श्री. माळी वैभवतर्फे ७० गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

हे केवळ नोकरी मिळविण्याचे साधन नसून माणसाला विचार करण्याची, अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि स्वतःचे अस्तित्व ओळखण्याची शक्ती देणारे माध्यम आहे. आजची तरुणाई तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जगाशी जोडली जात आहे.मात्र,या प्रगतीला सामाजिक बांधिलकीची जोड मिळणे आवश्यक असल्याचे भोयर यांनी नमूद केले. नगराध्यक्ष सुधीर पांगुळ यांनीही आपल्या मनोगतात महात्मा फुले यांच्या विचारांची आजच्या समाजाला नितांत गरज असल्याचे सांगितले. गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देणारा माळी वैभवचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री. माळी वैभव मासिकाच्या वतीने गेल्या १३ वर्षांपासून समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात येत आहे. दहावी,बारावी,पदवी,अभियांत्रिकी, वैद्यकीय,आर्किटेक्चर क्षेत्रासह विविध क्षेत्रांत प्रावीण्य मिळविणारे विद्यार्थी आणि खेळाडूंना या उपक्रमातून प्रोत्साहन दिले जाते. यंदा ७० गुणवंत विद्यार्थी व मान्यवरांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी वर्धेच्या गायिका प्रांजली गायकवाड आणि रिद्धी लेकुरवाळे यांनी क्रांतिगीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. संदीप चिचाटे यांनी सूत्रसंचालन केले. मुख्य आयोजक वासुदेव कडुकर यांनी प्रास्ताविक केले,तर डॉ.प्रा.संदीप काळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सतीश मेहत्रे, अनिल धाकूलकर, अरुण डेकाटे,अजय सुरसे, अशोक नंदरधने,प्रभाकर सुतरकर,पंकज गोरडे, अभिराज नागतोडे,स्मिता डहाके,चंदा डेकाटे,प्रियंका फुलकरी,संगीता बेंदेवार,श्रावणी सोनटक्के यांच्यासह माळी समाज बांधवांनी परिश्रम घेतले.

आरोग्यसेवेचा हात दुर्गम गावांपर्यंत; १,५९३ रुग्णांना मिळाला उपचारांचा आधार

दुर्गम भागातील २५६ जणांना मोफत उपचारांचा दिलासा

वर्धा/जनमाध्यम

आजारपण आले की उपचारांसाठी शहराकडे धाव घ्यावी लागते. आर्थिक परिस्थिती बेताची आणि गावापासून रुग्णालयाचे अंतर अधिक असल्याने अनेक ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिक उपचारांपासून वंचित राहतात. अशा गरजू रुग्णांच्या मदतीला धावून जात आरोग्यसेवेचा हात पुढे करण्याचे काम अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्च (एआयएचईआर) अंतर्गत आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयाने केले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील हिवरी आणि गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा येथे आयोजित महाआरोग्य शिबिरांत तब्बल १ हजार ५९३ रुग्णांची तपासणी करण्यात



आली. विशेष म्हणजे, गंभीर स्वरूपाच्या उपचारांची गरज असलेल्या २५६ रुग्णांना पुढील उपचारांसाठी वर्ध्यातील सावंगी रुग्णालयात पाठविण्यात आले आहे.

ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना त्यांच्या गावाजवळच मोफत आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी,या उद्देशाने या शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. हिवरी येथे आ. बाळासाहेब मंगुळकर, तर कुरखेडा येथे माजी आ.कृष्णाजी गजबे यांच्या सहकार्याने हे उपक्रम राबविण्यात आले. हिवरीत ५१४, तर कुरखेडा येथे १ हजार ७९ रुग्णांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

या शिबिरांमध्ये २५ पेक्षा अधिक डॉक्टर आणि २० आरोग्य कर्मचाऱ्यांनी सेवा दिली. उच्च रक्तदाब, मधुमेह, रक्तक्षय यांसारख्या आजारांची तपासणी करून अनेक आजारांचे प्राथमिक टप्प्यात निदान करण्यावर भर देण्यात आला. रुग्णांना वैद्यकीय सल्ला, आवश्यक औषधे, उपचार आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन मोफत देण्यात आले. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना या उपक्रमाचा मोठा आधार मिळाला.

तपासणीदरम्यान हिवरीतील ७८ आणि कुरखेडा येथील १७८ अशा एकूण २५६ रुग्णांना पुढील विशेष तपासणी व उपचारांची आवश्यकता असल्याचे आढळले. या सर्व रुग्णांना आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे), वर्धा येथे पाठविण्यात आले आहे. प्रधानमंत्री जनआरोग्य योजना अर्थात आयुष्मान भारतअंतर्गत या रुग्णांवर मोफत उपचार केले जाणार आहेत.

त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे उपचार टाळणाऱ्या रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. या उपक्रमाविषयी एव्हीबीआरएचचे उपसंचालक डॉ. अभिषेक जोशी यांनी ग्रामीण व आरोग्य सुविधांपासून वंचित भागांत आजारांचे वेळीच निदान आणि प्रतिबंधात्मक आरोग्यजागृती महत्त्वाची असल्याचे सांगितले.

एआयएचईआरचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निलेश अग्रवाल आणि रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ.अभय मुडे यांनीही अशा शिबिरांच्या माध्यमातून आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांपर्यंत दर्जेदार आरोग्यसेवा पोहोचविण्याचा प्रयत्न असल्याचे स्पष्ट केले.

हिवरी येथील शिबिराचे नेतृत्व डॉ. अभिषेक जोशी, तर कुरखेडा येथील शिबिराचे नेतृत्व डॉ. अभिषेक इंगोले यांनी केले. स्थानिक समन्वयक,स्वयंसेवक, मेडिकल सोशल वर्कर आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनीही सहकार्य केले.

रुग्णालयाची वाट दूर असली, तरी उपचारांची आशा दूर राहू नये, या सामाजिक भावनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाने ग्रामीण आणि आदिवासी भागातील गरजू रुग्णांना आरोग्याचा आधार दिला आहे.

सरकारी मदतीची दिवाळी काहींच्या दारी,तर अनेक शेतकऱ्यांच्या घरी अंधार

आष्टी शहीद/जनमाध्यम

एका बाजूला शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी पाच हजार रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला. काही शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ही रक्कम जमा झाली आणि त्यांच्या दिवाळीत थोडा गोडवा निर्माण झाला. मात्र, दुसरीकडे आष्टी तालुक्यातील अनेक पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात मदतीची रक्कम पोहोचलीच नाही. त्यामुळे कोणाच्या घरी दिवाळीचा आनंद, तर कोणाच्या घरी आर्थिक विवंचनेचा अंधार, असे चित्र निर्माण झाले आहे. महसूल विभागाच्या कामकाजातील कथित त्रुटींमुळे शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहिल्याचा आरोप होत असून प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

यंदा पावसाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला. पिकांचे नुकसान, उत्पादनातील घट आणि शेतीचा वाढता खर्च यामुळे शेतकरी आधीच आर्थिक संकटात सापडला आहे.

अशा परिस्थितीत शासनाकडून मिळणारे पाच हजार रुपयांचे अनुदान ही शेतकऱ्यांसाठी केवळ आर्थिक मदत नव्हती, तर सणासुदीच्या दिवसांत कुटुंबाला आधार देणारी आशा होती. मात्र, ही आशाही अनेकांच्या पदरी पडली नाही.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, काही गावांमध्ये तलाठ्यांनी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी केली नाही. पंचनाम्याच्या प्रक्रियेतही अनेक शेतकरी सुटल्याची तक्रार आहे.

काही ठिकाणी केवळ व्हॉट्सॲप ग्रुपवर संदेश पाठवून प्रशासनाने जबाबदारी पार पाडल्याचा आरोप होत आहे. प्रत्यक्ष शेतकऱ्यांशी संवाद साधून माहिती संकलित करण्याऐवजी कागदोपत्री प्रक्रियेलाच प्राधान्य दिले गेले का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मदतीची प्रतीक्षा अजूनही कायम

जोलवाडी येथील शेतकरी जयंत जाणे यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, जोलवाडी शिवारात त्यांची शेती असूनही शासनाकडून जाहीर करण्यात आलेल्या दुष्काळी निधीचे पाच हजार रुपये त्यांच्या खात्यात जमा झाले नाहीत. आपण एकटेच नव्हे, तर गावातील अनेक शेतकरी या मदतीपासून वंचित असल्याचे त्यांनी सांगितले.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे

(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १४ **अंक** - ३४३

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती- ४४४६०१

फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८


ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

संत आडकोजी महाराजांच्या जन्मोत्सवाचा भक्तिमय जागर

आर्वी/जनमाध्यम

संतपरंपरेचा वारसा, अध्यात्माची शिकवण आणि मानवसेवेचा संदेश देणारे परमहंस समर्थ आडकोजी महाराज यांचा २०५ वा जन्मोत्सव आणि १०५ वा पुण्यतिथी महोत्सव १२ ते १४ नोव्हेंबरदरम्यान पारसे भवन येथील जन्मभूमी संस्थानात भक्तिभावाने साजरा होणार आहे. यानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१२ नोव्हेंबरला कलश व तीर्थस्थापना, महाराजांच्या रजत पादुकांचा महाभिषेक, महापूजन आणि ध्वजारोहणाने महोत्सवाला प्रारंभ होईल. सामूहिक ध्यान, हरिपाठ,



१२ ते १४ नोव्हेंबर दरम्यान तीन दिवसीय सोहळा

भजन, गुरुचरित्र पारायण, संत जीवनदर्शन आणि संतचरित्र वाचन असे कार्यक्रम होणार आहेत. संत सयाजी महाराज, संत सचिन देव महाराज आणि संत शंकर महाराज यांची उपस्थिती लाभणार आहे. १३ नोव्हेंबरला समर्थ आडकोजी महाराजांच्या रजत चरण पादुकांची पालखीसह भव्य शोभायात्रा काढण्यात येणार आहे.

महोत्सवात विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सत्कारही करण्यात येणार असून, ह.भ.प. मयूर महाराज दरणे यांचे काल्याचे कीर्तन होईल.

बाहेरगावच्या भाविकांसाठी संस्थानच्या वतीने निवास व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महोत्सवाचा लाभ घ्यावा,असे आवाहन संस्थानचे अध्यक्ष प्रकाश कुटाफळे, सचिव सुरेंद्र पारसे आणि उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

येरड (खरबी) येथे फत्तेपूर बाबांची यात्रा भक्तिभावात संपन्न!

जनावरांचे रक्षणकर्ते म्हणून ख्याती; भाविकांनी केले मनोभावे दर्शन

चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः- चांदूर रेल्वे तालुक्यातील येरड (खरबी) येथे दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी सोमवार (दि. ९) रोजी फत्तेपूर बाबांची पारंपरिक वार्षिक यात्रा धार्मिक उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाली. या यात्रेच्या निमित्ताने भाविकांनी फत्तेपूर बाबांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेतले. अनेक वर्षांपासून चालत आलेली श्रद्धा आणि परंपरा यांचा सुंदर संगम या यात्रेच्या माध्यमातून पाहायला मिळाला.

येरड (खरबी) येथे फत्तेपूर बाबांचे पुरातन मंदिर असून, मंदिरात दगडाच्या मूर्तीची स्थापना श्रीमंत रघुजी राजे भोसले यांच्या काळात झाल्याचे सांगितले जाते. फत्तेपूर बाबांची मूर्ती कडुनिंबाच्या गोलाकार



झाडाखाली विराजमान आहे. विशेष म्हणजे हे कडुनिंबाचे झाड बाराही महिने हिरवेगार राहत असल्याने या स्थानाचे वेगळे वैशिष्ट्य आहे.

फत्तेपूर बाबा हे जनावरांचे देव म्हणून परिसरातील शेतकरी व पशुपालकांमध्ये विशेष श्रद्धास्थान आहे. त्यामुळे यात्रेच्या दिवशी शेतकरी, शेतमजूर व पशुपालक आपल्या गाई, म्हशी, बैल, शेळ्या आदी जनावरे व गवळणींना सजवून दर्शनासाठी आणतात. यंदाही अनेक भाविकांनी आपल्या जनावरांसह पारंपरिक पद्धतीने गवळणींना वाजतगाजत बाबांच्या दर्शनासाठी घेऊन आले. ही परंपरा यात्रेचे प्रमुख आकर्षण ठरली. यात्रेच्या निमित्ताने फत्तेपूर बाबांच्या चरणी हजारो नारळ अर्पण करण्यात आले. येरड (खरबी) एकालारा येथील ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यात्रेत आलेल्या हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच येरड, खरबी, एकलारा येथील अवधूत भजन मंडळ आणि बाहेरगावावरुन आलेल्या भजन मंडळींनी आपल्या सुमधुर वाणीतून अवधूती भजनांचे सादरीकरण केले. त्यामुळे मंदिर परिसरात आध्यात्मिक भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. यंदा परिसरात दुष्काळाचे सावट असल्याने दरवर्षीच्या तुलनेत यात्रेचा उत्साह काहीसा कमी होता. मात्र, परिस्थिती कशीही असली तरी फत्तेपूर बाबांवरील भाविकांची श्रद्धा आजही कायम असल्याचे दिसून आले. ग्रामस्थांनी यात्रेची परंपरा जपत धार्मिक कार्यक्रमांचे नियोजन केले. यात्रेदरम्यान शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तळेगाव दशासर पोलीस स्टेशनचे ठाणेदार किरण औटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

ग्रामीण विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करून ध्येय गाठावे!

खंडेराव देशमुख विद्यालयात करिअर व इनोव्हेशन अँड स्टार्टअप हबचा शुभारंभ

चांदुर रेल्वे/प्रतिनिधीः- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि क्षमता असूनही योग्य मार्गदर्शनाअभावी अनेकांना करिअरची दिशा निश्चित करता येत नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित माध्यमिक विद्यालय व खंडेराव देशमुख उच्च माध्यमिक विद्यालय, राजुरा येथे करिअर मार्गदर्शन केंद्र आणि इनोव्हेशन अँड स्टार्टअप हब सुरू करण्यात आले.

'परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी ध्येय निश्चित करून सातत्यपूर्ण अभ्यास, आत्मविश्वास, नियोजन आणि जिद्दीच्या बळावर यश संपादन करता येते. विद्यार्थ्यांनी



परिस्थितीला दोष देण्यापेक्षा उपलब्ध संधींचा शोध घेऊन आपल्या स्वप्नांच्या दिशेने प्रामाणिक प्रयत्न करावेत,' असे प्रेरणादायी आवाहन चांदूर रेल्वे पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी राणी माळवे यांनी केले. उद्घाटनप्रसंगी त्या विद्यार्थ्यांशी संवाद साधत होत्या. यावेळी त्यांनी स्पर्धा परीक्षेतील आपल्या यशस्वी प्रवासातील संघर्ष आणि अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य व्ही. डी. कापसे, तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. गजानन कोरे व विषयतज्ज्ञ विवेक राऊत उपस्थित होते. प्रा. गजानन कोरे यांनी स्पर्धा परीक्षांचे स्वरूप, अभ्यासाचे नियोजन आणि विविध शैक्षणिक व व्यावसायिक संधींबाबत मार्गदर्शन केले. विवेक राऊत यांनी विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी शोधणारे न बनता रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनावे, असे आवाहन केले. स्टार्टअप संकल्पना, व्यवसाय नियोजन आणि शासनाच्या विविध योजनांची माहितीही त्यांनी दिली. प्रास्ताविकातून सिनेट सदस्य डॉ. नितीन टाले यांनी केंद्रामागील संकल्पना स्पष्ट केली.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य व्ही. डी. कापसे यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण प्रयत्नांचे महत्त्व पटवून दिले. सूत्रसंचालन प्रा. आशिष बोरकर यांनी केले, तर आभार प्रा. शारदा हिवरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

मोठ्या भावावर केला जीवघेणा हल्ला

अमरावती/प्रतिनिधीः- दिवाळीनिमित्त आपल्या आईला भेटण्यासाठी लहान भावाच्या घरी गेलेल्या युवकावर त्याच्याच सख्ख्या भावाने धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना सोमवार ९ नोव्हेंबर रोजी रात्री ९.३० वाजेच्या दरम्यान फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नगीना मशिदीच्या मागे घडली. जखमी युवकाचे नाव शाम लक्ष्मण चंदनखेडे (वय ३५, रा. चपराशीपुरा) आहे. तर आरोपीचे नाव राम चंदनखेडे (वय ३३) असे आहे. जखमीच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी आरोपी राम चंदनखेडे याच्या विरुद्ध कलम १०९ (१), ३५१ (२) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

माहिती नुसार चपराशीपुरा निवासी शाम लक्ष्मण चंदनखेडे हा बांधकाम काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. दिवाळी सणानिमित्त तो ९ नोव्हेंबरच्या रात्री आपल्या सख्ख्या लहान भावाच्या घरी आईला भेटण्यासाठी गेला होता.

आई नगीना मशिदीच्या मागील परिसरात लहान भावाकडे राहते.शामने आईची विचारपूस केली. त्यावेळी लहान भाऊ राम याने अचानक खिशातून धारधार शस्त्र काढले आणि आपल्याच मोठ्या भावावर हल्ला केला. या हल्ल्यात शाम गंभीर जखमी झाला. हल्ल्यानंतर रक्तबंबाळ अवस्थेत पडलेल्या शामला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. तिथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली.

जखमी शाम चंदनखेडे याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी राम चंदनखेडे याच्या विरुद्ध हत्येच्या प्रयत्नासह धमकी दिल्याचा गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध पोलीस घेत आहेत. दिवाळीसारख्या सणाच्या दिवशी आईला भेटायला गेलेल्या भावावरच सख्ख्या भावाने हल्ला केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

भावाभावातील वाद नेमका



कशावरून झाला, याचा तपास पोलीस करीत आहेत. कौटुंबिक वादातूनच हा हल्ला झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

जुन्या वादात तरुणाच्या हत्येचा प्रयत्न

आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

अमरावती/प्रतिनिधीः- जुन्या वादातून चार युवकांनी मिळून आपल्याच ओळखीच्या युवकावर चाकूने हल्ला करून त्याची हत्या करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. या हल्ल्यात युवक गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.जखमी युवकाचे नाव युनूस खान युसूफ खान (वय ३९, रा. बिच्छू टेकडी)असे आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी रेहान (वय २५) आणि त्याच्या तीन साथीदारांविरुद्ध हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी कुशल तायवाडे करीत आहेत.

माहिती नुसार, राहुल नगर येथील इरफान अन्सारी नौशाद अन्सारी आणि रेहान (वय २५) यांच्यात काही कारणा वरून आधीपासून वाद सुरू होता. या वादाचेच पर्यवसान मारहाणीत झाले. रेहानने इरफान अन्सारी याला मारहाण केली होती.

या मारहाणी नंतर इरफानने ही माहिती आपल्या मित्रांना दिली. आपल्या सोबत झालेल्या मारहाणीचा जाब विचारण्यासाठी इरफान आपला मित्र युनूस खान याच्यासोबत रेहानकडे गेला. त्यावेळी रेहानसोबत त्याचे तीन साथीदारही तिथे उपस्थित होते. इरफान आणि युनूस यांनी रेहानला मारहाणीचे कारण विचारले असता दोन्ही गटात पुन्हा वाद वाढला. वाद टोकाला गेल्यावर रेहानने अचानक खिशातून चाकू काढला आणि इरफान सोबत आलेल्या त्याचा मित्र युनूस खान याच्यावर सपासप वार केले. या हल्ल्यात युनूस खान गंभीर जखमी होऊन रक्ताच्या थारोळ्यात खाली कोसळला.

घटनेची माहिती मिळताच फ्रेजरपुरा पोलीस पथक तातडीने घटनास्थळी पोहोचले. जखमी युनूस खान याला तातडीने जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले. तिथे त्याच्यावर उपचार सुरू आहेत. जिल्हा रुग्णालयात घेतलेल्या जबाबाच्या आधारावर पोलिसांनी कारवाई केली आहे.फ्रेजरपुरा पोलिसांनी रेहान आणि त्याच्या तीन साथीदारांविरुद्ध हत्येचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिस आरोपींचा शोध पोलीस घेत असून लवकरच त्यांना अटक करण्यात येईल. शहरात हाणामारी, चाकू हल्ल्यांच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

अमरावतीत कलाल समाजाचा तीन दिवसीय महाकुंभ!

-देशभरातील समाजबांधव अंबानगरीत येणार एकत्र -१३ ते १५ नोव्हेंबरदरम्यान विविध कार्यक्रम

अमरावती/प्रतिनिधी: - अंबानगरी अमरावती येथे कलाल कलार समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक एकजुटीचे दर्शन घडविणाऱ्या तीन दिवसीय महाकुंभाचे आयोजन करण्यात आले आहे. अखिल भारतीय कलाल कलार समाज सामिती आणि अखिल भारतवर्षीय हैहय कलचुरी महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने १३ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत हा महाकुंभ पार पडणार आहे. देशभरातील कलाल कलार समाजाचे पदाधिकारी, प्रतिष्ठित व्यक्ती, उद्योजक, व्यावसायिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने







अमरावतीत सहभागी होणार असल्याची माहिती महाकुंभाचे प्रमुख आयोजक तथा अखिल भारतीय कलाल कलार समाज समितीचे अध्यक्ष सुनील खराटे यांनी दिली.

महाकुंभाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सोमेश्वर पुसतकर सभागृहात शेतकरी व कृषी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता याच सभागृहात रोजगार, उद्योग व व्यवसाय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. याच दिवशी सायंकाळी ५ वाजता वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, महाकुंभाच्या कालावधीत १३ ते १५ नोव्हेंबर दरम्यान श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या प्रांगणात राज्यस्तरीय पुरुष व महिला क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या तीन दिवसीय महाकुंभाच्या यशस्वी आयोजनासाठी विविध समित्यांचे गठन करण्यात आले असून, हा महाकुंभ यशस्वी करण्याकरिता आयोजन समितीचे पदाधिकारी सुनील राऊत सचिव सचिन पहाडे, सुरेंद्र जयस्वाल ,विनोद भामकर,उमेश करोडदेव तसेच गजानन कोल्हटकर अथक परिश्रम घेत आहेत.

१५ नोव्हेंबरला कलाल समाजाचे भव्य महासंमेलन-

महाकुंभाचा मुख्य सोहळा १५ नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता पार पडणार आहे. या दिवशी शहरातील श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात अखिल भारतीय कलाल समाजाच्या महासंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. माजी खासदार नवनीत राणा यांच्या अध्यक्षतेखाली महासंमेलनाचे उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राज्याचे जलसंधारण मंत्री संजय राठोड आणि अखिल भारतवर्षीय हैहय कलचुरी महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष जयनारायण चौकसे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या महासंमेलनाला खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे, आमदार रवी राणा, आमदार संजय खोडके, प्रताप अडसड, उमेश यावलकर, आमदार गजानन लवटे, महापौर श्रीचंद तेजवानी, माजी आमदार जगदीश गुप्ता, डॉ. सुनील देशमुख, भाजप शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, राजेंद्र मेवाडा, नगरसेवक अजय जैस्वाल, ॲड. एम. एल. आय. हरिराम राय, नगरसेविका अंजली नाईक, प्रसिद्ध उद्योजक राजेंद्र जयस्वाल, नगराध्यक्ष सुनील चौथमल आणि पूनम चौधरी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाकुंभाचे प्रमुख आयोजक सुनील खराटे यांनी केले आहे.

भाऊबीज - एक अतूट बंधन

दिवाळीच्या दीपांत, उजळते एक नातं खास,
बहीण-भावाचा स्नेह, जणू ईश्वरालाच जिव्हाळ्याची आस ॥
ओवाळते भाऊराया, निरांजनाच्या ज्योतीने,
ओवाळणी भाऊरायास, मायेच्या अन् प्रेमाच्या मोतीने ।

लहानपणीचे भांडण, तेच आज आठवणीत हसवते,
राखीचा धाग्या प्रमाणे, भाऊबीजही मनाला स्पर्शते ।
बहीण म्हणते, भाऊ माझा, आधार माझ्या जीवनाचा,
भाऊ म्हणतो, ताई माझी, मान आहे घराण्याचा ।

कितीही दूर असले, तरी मनाने जवळ असतात,
संकटात धावून येणारे, हेच खरे रक्ताचे नातं असतात ।
आई-बाबांनंतर, हाच तर संस्काराचा दिवा,
बहिणीच्या सुखासाठी, भावाने सदैव झिजावा ।

आजच्या युगात, विसरू नका हे बंध आपुलकीचे,
मोबाईलच्या जगात, जपा क्षण हे प्रेमाचे ।
भाऊबीज शिकवते, प्रेम, त्याग आणि आदर,
यातच दडलेला आहे, आपल्या संस्कृतीचा आधार ।

बहिणीला द्या मान, तिच्या स्वप्नांना द्या बळ,
भावाच्या साथीने, ती करेल जीवन सफल ।
भाऊबीजेच्या दिवशी, घेऊया हा संकल्प मनात,
बहीण-भाऊ राहू एकत्र, सुख-दुःखाच्या प्रत्येक क्षणात ।

-डॉ शोभा गायकवाड
अध्यक्ष, हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ, भाषा विश्व साहित्य संस्था,आदिशक्ती बहु संस्था अमरावती

ब्रेक फेल झालेली एसटी घराच्या भिंतीवर आदळली!

धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः- शहरात रविवारी सकाळी सुमारे ९ वाजताच्या सुमारास एसटी बसचे अचानक ब्रेक फेल झाल्याने एकच खळबळ उडाली. अनियंत्रित झालेली बस रस्त्यालगत असलेल्या एका घराच्या भिंतीवर जाऊन आदळली. सुदैवाने बसचालकाने प्रसंगावधान राखत वेळीच योग्य निर्णय घेतल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेत घराच्या भिंतीचे नुकसान झाले असून, बसमधील प्रवासी आणि परिसरातील नागरिक सुखरूप बचावले. या घटनेमुळे धामणगाव शहरातील अरुंद रस्त्यांचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस प्रवाशांना घेऊन निर्धारित मार्गावरून जात होती. दरम्यान, सकाळी ९ वाजताच्या सुमारास अचानक बसचे ब्रेक निकामी झाले. बसवरील नियंत्रण सुटत असल्याचे लक्षात येताच चालकाने बस थांबविण्याचा प्रयत्न केला.

मात्र, सकाळची वेळ असल्याने रस्त्यावर नागरिकांची आणि वाहनांची मोठी वर्दळ होती. अशा परिस्थितीत समोरून जाणाऱ्या नागरिकांना धडक बसू नये, यासाठी चालकाने बस दुसऱ्या दिशेने वळविण्याचा प्रयत्न केला. मात्र, वेगावर नियंत्रण मिळवता न आल्याने बस थेट एका घराच्या भिंतीवर आदळली.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ६८
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात
आर.एम.जे.सी.क्र.७४६/२०२६ ने.ता.२८.१२.२०२६

अर्जदार - १. शेषराव नानाजी कोकरे, वय ४९ वर्षे, धंदा - शेती
रा.बेनोडा, ता.वरुड, जि.अमरावती
२. राजाभाऊ नाना कोकरे, वय ४७ वर्षे, धंदा - शेती
रा.अंबाडा. ता.मोर्शी, जि.अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार- निरंक

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ व २ चे वडील **नामे नाना शिवराम कोकरे** हे दि.**१९.०९.२०१०** रोजी अंबाडा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले असून अर्जदार नं.१ व २ यांची आई **अंजनीबाई नानाजी कोकरे** हिचा दिनांक **२८.०४.२०२१ रोजी** जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती येथे मृत्यू झालेला आहे. तसेच मयतांचे नांवे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

आदेशानुसार,
सहाय्यक अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क-स्तर
मोर्शी
शिक्का

जाहीर नोटीस

दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा प्र.श्रे.न्यायदंडाधिकारी, चांदूर बाजार, (कोर्ट नं.०७)
कि.कि.अर्ज क्रमांक ३९२/२०२६ ने.ता.१५.१२.२०२६

अर्जदार :सुभाष नानासाहेब भगत
वय ७० वर्षे, व्यवसाय - व्यापार
रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदारः मा.निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्माची नोंद
ग्रामपंचायत कार्यालय, शिरजगांव कसबा,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे होण्याबाबत

अर्जदार हा वरील कायमचा रहिवासी आहे. अर्जदार यांचा मुलगा नामे अमोल सुभाषपंत भगत यांचा जन्म दि.२६.०१.१९८० मध्ये राहते घरी शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला आहे.

ज्याअर्थी उपरोक्त वरील अर्जदार यांनी गैरअर्जदाराविरुध्द जन्म मृत्यू नोंदणी दुरुस्ती अधिनियम २०२६ चे कलम १३(३) प्रमाणे अर्ज दाखल केला आहे, त्याअर्थी सदर अर्जास गैरअर्जदार अथवा इतर कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत न्यायालयाच्या कामकाजाच्या दिवशी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने अगर नेमलेल्या वकीला दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार येथे हजर रहावे. अन्यथा गैरअर्जदाराच्या गैरहजेरीत प्रकरण पुढे चालविण्यात येईल.

आज दि.२८.१०.२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी दिले.
दिनांक २८.१०.२०२६

आदेशानुसार
क.लिपीक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार
शिक्का

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१९७/२०२६
वंदना व एक -वि- निरंक
पुढील ता.२४.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : १. वंदना विनायकराव गाढवे, वय ४७ वर्षे, धंदा - गृहिणी
रा.पांडे प्लॉट भिवापूर नगर, हनुमान मंदिरासमोर, अमरावती
२. निरज विनायक गाढवे, वय २४ वर्षे, धंदा - शिक्षण
रा.प्लॉट नं.२४, गोपालकृष्ण कॉलनी, रिंग रोड, रहाटगांव, अमरावती
-- विरुध्द --
गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **विनायक सिताराम्जी गाढवे** हे दिनांक 20.08.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **वंदना विनायकराव गाढवे अधिक एक** यांनी वरील्प्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वंदना विनायकराव गाढवे अधिक एक** वरील्प्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती
शिक्का

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सहदिवाणी न्यायाधीश(क.स्तर) अमरावती
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२४२२/२०२६
विजय -वि- निरंक
पुढील ता.११.१२.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार : 1. Vijay Madhukarrao Dongre
Age about 62 Yrs. Occu.: Labourer
R/o Prabhu Colony, Mahadeo Khori Road, Amravati.

-- विरुध्द --
गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** Rasika Vijay Dongare हे दिनांक 28.08.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Vijay Madhukarrao Dongre यांनी वरील्प्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Vijay Madhukarrao Dongreवरील्प्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५.११.२०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती
शिक्का

जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी **श्री.रोषण रामेश्वर साहू** यांच्याशी खालील मालमत्ता विकत घेण्याचा सौदा केलेला असून त्याची खरेदी लवकरच करण्याचे ठरलेले आहे, त्या मालमत्तेचे वर्णन येणेप्रमाणे--

स्थावर मालमत्तेचे वर्णन - नोंदणी पोट तुकडी अमरावती ग्रामीण कवेरीचे कक्षेतील व जि.प.अमरावतीचे हद्दीतील मौजे परसोडा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.४६/१ व ४६/२, गट क्र.२०९ मधील क्षेत्रफळ ०३हे.२३ आर शेतजमिनीचे मा.सहायक संचालक नगर रचना मुल्यनिर्धारण विभाग, अमरावती यांचे पत्र जा.क्र.अकृषक/मौ.परसोडा/ता.जि.अ./शेत सर्व्हे क्र.४६/१/४६/२/ससंनर-अम/९८२२, दि.१२.०२.१९८७ नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या अभिन्यासातील एकूण दोन प्लॉट्स ज्याचे वर्णन -

अ. क्र.	लेआऊट प्लॉट क्र.	संगणकीय भूमापन क्र. व उपविभाग	का.क्षेत्रफळ चौ.मी.	क्षेत्रफळ चौ.फुट
१	१	२०९/४६/१/४६/२/१	७८५	८४४६
२	२	२०९/४६/१/४६/२/२	६३६	६८४६
			१४२१	१५२९४

वरील दोन्ही प्लॉटस् ज्याची साईज मंजूर नकाशाप्रमाणे असून याचे एकत्रित क्षेत्रफळ १४२१ चौ.मी. (१५२९४ चौ.फुट असून याची सामाईक चतुःसिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - लेआऊट प्लॉट नं.३, पश्चिमेस - लेआऊटमधील रोड, उत्तरेस - लेआऊट प्लॉट नं.६, ७ व ८, दक्षिणेस - अमरावती ते आर्वी रोड

वरील वर्णन केलेली मिळकत विकत घेण्याचा सौदा माझे पक्षकाराने केलेला आहे तरी या नोटीसद्वारे सर्व लोकांना भागीदारी पेढी, सोसायटी, बँक व कंपनी इत्यादीना जाहीरपणे सुचित करण्यात येते की, वरील नमुद मामत्तेमध्ये अथवा त्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, हितसंबंध, अधिकार, धारणाधिकार, सुविधाधिकार, करार इत्यादी असल्यास सदर नोटीस प्रकाशित झाल्यापासून ७ दिवसांचे आत आपला आक्षेप असल्यास खालील पत्त्यावर संबंधित कागदपत्रासह येऊन भेटावे. असा कोणताही आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदरहू मालमत्तेची खरेदी घेतील व त्यानंतर सदर मिळकतीबाबत माझे पक्षकाराचे खरेदी व मालकी हक्काबाबत कोणत्याही प्रकारचा आक्षेप, वाद, अथवा हरकत विचारात घेतली जाणार नाही व माझे पक्षकार सदरहू मिळकतीचे खरेदीखत नोंदवून घेण्यास मोकळे राहतील, याची नोंद घ्यावी. सबब जाहीर सूचना
स्थळ - अमरावती
दिनांक ०६.११.२०२६

(ॲड.अतूल सोहोनी)
सोहोनी कॉम्प्लेक्स,
विवेकानंद कॉलनी, अमरावती

बुधवार, ११ नोव्हेंबर २०२६
E-paper - www.janmadhyam.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

विदर्भातील कापूस पिकाचे नुकसान

निसर्गाच्या लहरीपणाचा फटका; उत्पादनात घट, उत्पादक आर्थिक संकटात

अमरावती/का.प्र.

पश्चिम विदर्भातील खरिपातील कापूस हे प्रमुख पीक यंदा पावसाचा ताण आणि त्यानंतर उद्भवलेच्या अन्य संकटांमुळे संकटात आहे. बाजारात कापसाचे दरही कमी होत आहेत. रोगराईमुळे उत्पादनात घट येण्याची शक्यता असून, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे. दर्जा, ओलावा आदी कारपणे सांगून कापसाला बाजारात कमी दर दिले जात आहेत. दुसरीकडे, मजुरीचे दर वाढले असून, उत्पादन खर्चही अधिक आहे. त्यामुळे वाढता उत्पादन खर्च आणि घटते उत्पन्न यामुळे कापूस उत्पादक दुहेरी आर्थिक संकटात सापडले आहेत.

अमरावती विभागात कापसाच्या सरासरी लागवडीखालील १०.९२ लाख हेक्टर क्षेत्रापैकी १०.८० लाख हेक्टरवर लागवड झाली, हे प्रमाण ९९ टक्के आहे. मागील हंगामात कापसाला चांगला भाव मिळाल्याने यंदा शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कापसाची लागवड केली. मात्र, लागवडीनंतर ऑगस्ट-सप्टेंबर या दोन महिन्यांत पावसाचा सलग ५५ दिवसांचा खंड पडला. त्यामुळे कोरडवाहू भागातील कपाशीची वाढ खुंटली. फुलपात्या आणि बोंडांच्या परिपक्वतेच्या अवस्थेत पाणी न मिळाल्याने झाडांवर बोंडांची संख्या कमी राहिली. त्यातच ऑक्टोबरमध्ये तापमान वाढल्याने परिपक्व बोंडे एकाच वेळी



उमलली. परिणामी कपाशीची उलंगवाडी झाली असून, एक-दोन वेचण्यांतच हंगाम आटोपत आहे. अनेक भागात यंदा अवघे चार ते साडेचार क्विंटल उत्पादन मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही भरून काढणे कठीण झाले आहे.

यंदा पावसाने अपेक्षित साथ न दिल्याने पिकाच्या उत्पादनाबाबत चिंता निर्माण झाली आहे. कापूस हे महत्त्वाचे नगदी पीक असून शेतकऱ्यांसह जिनिंग-प्रेसिंग,वाहतूक आणि वस्त्रोद्योगाशी संबंधित रोजगार याच्याशी जोडलेले आहेत. त्यामुळे उत्पादन घटल्यास परिणाम ग्रामीण त्याचा अर्थव्यवस्थेवरही होण्याची शक्यता आहे.

दर टिकून राहणार?

केंद्र सरकारने मध्यम धाग्याच्या कापसासाठी प्रतिक्विंटल ८ हजार २६७ रुपये, तर लांब धाग्याच्या कापसासाठी ८ हजार ६६७ रुपये हमीभाव निश्चित केला आहे. मात्र, खुल्या बाजारात कापसाला प्रतिक्विंटल ८ हजार ९०० ते ९ हजार २५० रुपयांपर्यंतदर मिळत आहे. मात्र, सध्याचा दर टिकून राहणार की आवक वाढल्यानंतर त्यात घसरण होणार, याकडे शेतक-यांचे लक्ष लागले आहे.

जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने अडचण

काही शिवारात पीक कापणी प्रयोगांतर्गत कपाशीची वेचणी करण्यात आली. २० बाय १० मीटर क्षेत्रातील कपाशीची वेचणी केली असता ९ किलो १८० ग्रॅम कापूस मिळाला.या उत्पादनाच्या आधारे हेक्टरी उत्पादकता साडेचार क्विंटलच्या आसपास येत आहे.जमिनीत पुरेसा ओलावा नसल्याने आणि एकाच वेळी बहुतांश बोंडे फुटल्याने यापुढे उत्पादन मिळण्याची शक्यता कमी आहे. कोरडवाहू पट्टचात कपाशीचे हेक्टरी उत्पादन अवघे चार ते साडेचार क्विंटलपर्यंत मर्यादित राहण्याची शक्यता आहे.

बडनेऱ्यात ५१ फुटांच्या नरकासुराचे दहन

बडनेरा/वार्ताहर

दिवाळीच्या उत्साहाला सामूहिक आनंदाची जोड देणारा नरकासुर दहन सोहळा सोमवारी बडनेरा येथील जुन्या वस्तीतील सावता मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला. सावता युवक मंडळ द्वारा संचालित सार्वजनिक श्रीराम विजय महोत्सव समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्यात तब्बल ५१ फूट उंच प्रतीकात्मक नरकासुराच्या प्रतिमेचे आमदार रवी राणा यांच्या हस्ते दहन करण्यात आले. यावेळी झालेली सामूहिक फटाक्यांची आतषबाजी आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद यामुळे संपूर्ण परिसर जल्लोषात न्हाऊन निघाला.



बडनेरा आणि परिसरात या उत्सवाला 'गोरगरिबांची दिवाळी' म्हणून विशेष ओळख आहे. सावता युवक मंडळाच्या पुढाकारातून गेल्या ८८ वर्षांपासून ही परंपरा अखंडपणे जपली जात आहे. दिवाळीच्या काळात आयोजित होणाऱ्या या सोहळ्याची नागरिकांना दरवर्षी प्रतीक्षा असते. बडनेरा शहरासह आसपासच्या गावांमधील नागरिक,महिला,युवक आणि लहान मुलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उत्सवाचा आनंद लुटला. या कार्यक्रमाला उपमहापौर सचिन भेंडे,गटनेता नाना आमले,जयंत डेहनकर, नगरसेवक अजय जयस्वाल,किशोर जाधव,रंजना डोंगरे, किशोर पवार, विनायक ढोले, सुजय पवार व श्रीकांत येते यांची प्रमुख उपस्थिती होती. महोत्सवाच्या आठव्या दिवसापासून प्रभू श्रीरामचंद्रांच्या जीवनचरित्रावर आधारित श्री हनुमान रामायण प्रचारक रामलीला मंडळ, सतना यांच्याद्वारे रामलीला कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

या माध्यमातून धार्मिक व सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविले जाते. नरकासुराची भव्य प्रतिमा साकारण्यासाठी समितीचे कार्यकर्ते तब्बल १५ दिवस आधीपासून मेहनत घेतात. कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून साकारलेली ५१ फुटांची प्रतिमा आणि त्यानंतर होणारे भव्य दहन हे सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरले. कार्यक्रमाचे संचालन गौरव बांते यांनी केले. तर पोलीस निरीक्षक पूनित कुलट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, सामूहिक आतषबाजी आणि ८८ वर्षांची परंपरा यामुळे बडनेऱ्यातील नरकासुर दहन सोहळा यंदाही अविस्मरणीय ठरला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सौंदर्यीकरणाचे भूमिपूजन



शिराळा- गावाच्या विकासासाठी केवळ आश्वासनांची अपेक्षा न ठेवता, स्वतः पुढाकार घेऊन काय करता येते, याचा आदर्श सावंगा (आसरा) येथील ग्रामस्थांनी घालून दिला आहे. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारक व परिसर सौंदर्यीकरणाच्या महत्त्वाकांक्षी कार्याचा भूमिपूजन सोहळा डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे उत्साहात झाला.विशेष म्हणजे, या कामासाठी २०२० पासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत होता. आमदार, खासदार यांच्याकडे निवेदने, भेटी आणि विविध स्तरांवर प्रयत्न करूनही कामाला अपेक्षित गती मिळत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी लोकसहभागातून हे स्वप्न प्रत्यक्षात उतरवण्याचा निर्धार केला. समस्त खेडकर परिवार, भिमशक्ती युवा क्रीडा मंडळ आणि सहकारी मित्रांच्या पुढाकारातून या कार्याला गती मिळाली आहे. या कार्यासाठी योगदान देणारे देणगीदार, सहकारी, ग्रामस्थ आणि सर्व समाजबांधवांचे विशेष कौतुक होत आहे. सावंगा (आसरा) येथील ग्रामस्थांनी एकजुटीच्या बळावर सुरू केलेला हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी आहे.

काळाघोटा पारधी बेड्यावर पोलिसांची दिवाळी

ऑपरेशन कवच'मधून नशामुक्तीचा जागर, पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांची भेट

कुऱ्हा/वार्ताहर

दिवाळी म्हणजे आनंद,उत्साह आणि आपुलकीचा सण! मात्र, या आनंदापासून समाजातील कोणताही घटक वंचित राहू नये, या सामाजिक जाणिवेतून अमरावती ग्रामीण पोलिसांनी काळा घोटा येथील पारधी बेड्यावर दिवाळी साजरी करत माणुसकीचा अनोखा दीप प्रज्वलित केला. पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी पारधी बेड्याला सदिच्छा भेट देत नागरिकांसह चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.

काळा घोटा येथील पारधी बेड्यावर सुमारे ३०० ते ३५० नागरिक वास्तव्यास आहेत. या समाजातील नागरिकांच्या समस्या, दैनंदिन जीवनातील अडचणी आणि सामाजिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी नागरिकांशी थेट संवाद



साधला. केवळ कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी पार पाडणे एवढ्यापुरतेच पोलिसांचे कार्य मर्यादित नसून समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होणे ही तितकेच महत्त्वाचे आहे, याची प्रचिती या भेटीतून आली. यावेळी लहान मुलांना आणि नागरिकांना दिवाळी फराळासह शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. साहित्य मिळताच चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद या उपक्रमाचे खरे फलित ठरला. या उपक्रमात चांदूर रेल्वेचे उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश ताथोड, स्थानिक गुन्हे शाखेचे अधिकारी अशोक लाडे आणि कुऱ्हा पोलीस ठाण्याचे ठाणेदार शिवहरी सरोदे, प्रविण बाखडे,अनिल निंगोट,सागर निमकर उपस्थित होते.

'ऑपरेशन कवच'मधून व्यसनमुक्तीचा जागर

दिवाळीच्या आनंद सोहळ्याला सामाजिक प्रबोधनाची जोड देत अमरावती ग्रामीण पोलिसांच्या विशेष 'ऑपरेशन कवच' अभियानांतर्गत अमली पदार्थांच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करण्यात आली. 'नशेकडे जाणारी वाट, उद्ध्वस्त करते हसतं-खेळतं घर आणि थाट!' या संदेशातून व्यसनाचा फटका केवळ व्यक्तीलाच नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाला बसतो, याची जाणीव करून देण्यात आली. युवकांनी अमली पदार्थांच्या आहारी न जाता शिक्षण, आरोग्य आणि उज्ज्वल भवितव्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन पोलिसांनी केले. पोलिसांच्या या उपक्रमामुळे पारधी बेड्यावरील नागरिकांमध्ये आपलेपणाची भावना निर्माण झाली. गोडवा, शिक्षणाची प्रेरणा आणि नशामुक्तीचा संकल्प अशा तिहेरी संदेशातून पोलिसांनी सामाजिक बांधिलकी जपली. रक्षणासोबतच माणुसकीचे नाते जपणाऱ्या अमरावती ग्रामीण पोलिसांच्या या दिवाळी उपक्रमाने सामाजिक ऐक्याचा आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीचा संदेश दिला.

पूरग्रस्तांचे प्राण वाचविणाऱ्या युवकांचा आ.रोहित पवार यांच्या हस्ते गौरव!



चांदूर रेल्वे/वार्ताहर

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) चे शेतकरी नेते तथा आ.रोहित पवार यांचा संपूर्ण महाराष्ट्रात शेतकरी संवाद दौरा सुरू आहे. या दौऱ्यादरम्यान त्यांनी चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील विविध गावांना भेटी देत शेतकऱ्यांशी संवाद साधला. याच अनुषंगाने त्यांनी चांदूर रेल्वे तालुक्यातील राजुरा गावालाही भेट दिली. यावेळी त्यांनी गत ३१ जुलै रोजी आलेल्या भीषण पुरात सात नागरिकांचे प्राण वाचविण्यासाठी धाडसी प्रयत्न करणाऱ्या स्थानिक युवकांची भेट घेऊन त्यांचा शाल देऊन सन्मान केला.

गत ३१ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे राजुरा येथील खोलाड नदीला भीषण पूर आला होता. सायंकाळी सुमारे ७ वाजताच्या दरम्यान पुराच्या पाण्याच्या प्रचंड वेगात चारचाकी वाहनासह सात नागरिक अडकले होते. परिस्थिती अत्यंत गंभीर बनली होती. अशा संकटकाळात राजुरा येथील ग्रामस्थ, अपक्ष ग्रामपंचायत सदस्य भूषण शिवदास काळे आणि त्यांच्या मित्रपरिवाराने प्रसंगावधान राखत मदतकार्य सुरू केले. एनडीआरएफची टीम, तहसीलदार तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या तत्पर सहकार्याने संयुक्त बचावकार्य राबविण्यात आले. स्थानिक युवकांचे धाडस आणि प्रशासनाच्या मदतीमुळे या सातही नागरिकांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आणि मोठी जीवितहानी टळली. या धाडसी आणि माणुसकीच्या कार्याची दखल घेत आ. रोहित पवार यांनी स्वतः राजुरा गावात जाऊन बचावकार्यात सहभागी झालेल्या युवकांची भेट घेतली. त्यांच्या धाडसाचे आणि सामाजिक बांधिलकीचे कौतुक करत सर्व युवकांचा शाल देऊन सन्मान केला.

दरम्यान, आ.पवार यांनी गावातील शेतकरी बांधवांशी संवाद साधला असता, स्थानिक शेतकऱ्यांवर ओढवलेल्या संकटाची विदारक परिस्थिती अपक्ष ग्रामपंचायत सदस्य भूषण शिवदास काळे यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिली. सुरुवातीला निकृष्ट दर्जाच्या बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली. या संकटातून सावरण्यापूर्वीच पावसाने दडी मारल्याने पिकांना पाण्याअभावी मोठा फटका बसला.शेतीतील कामे कमी झाल्याने शेतमजुरांवरही बेरोजगारीचे संकट ओढवले असून ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थिती बिकट झाल्याचे भूषण काळे यांनी आमदारांच्या निदर्शनास आणून दिले.

दिवाळी पाडव्याला चेनुष्ठा येथे रंगली 'एक गाव, एक गवळण'ची परंपरा!

कुऱ्हा/वार्ताहर

ग्रामीण संस्कृती, परंपरा आणि सामाजिक एकतेचा अनोखा संगम तिवसा तालुक्यातील चेनुष्ठा येथे दिवाळीच्या पाडव्याच्या निमित्ताने पाहायला मिळाला. गावातील सार्वजनिक गवळण मंडळाच्या वतीने अनेक वर्षांपासून सुरू असलेली 'एक गाव, एक गवळण' ही पारंपरिक प्रथा यंदाही मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. या उत्सवात गावातील सर्व जाती-धर्मातील नागरिकांसह तरुणांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत गावाच्या एकात्मतेचे दर्शन घडविले. दिवाळीच्या पर्वावर कुंभारवाडा येथून पारंपरिक गवळणीचे विधिवत प्रस्थान



करण्यात आले. त्यानंतर गवळण गाईच्या गोठाणावर नेण्यात आली. तेथे पारंपरिक विधी पार पडल्यानंतर गावातील हनुमान मंदिरात पूजन करण्यात आले. पूजनानंतर ढोलकीच्या तालावर,तुणतुण्याच्या सुरात आणि गायकांच्या सुरेल आवाजात गवळण संपूर्ण गावातून फिरविण्यात आली. या गवळणीत गवळीच्या भूमिकेत प्रथमेश आमले, शंकर उईके, युगल उईके व गजानन खंडारे यांनी साथ दिली. तुणतुणीवादक अनिल नेरकर, अरविंद आमले व वैभव आमले यांनी संगीताची बाजू सांभाळली.गायक म्हणून मयूर चांगलीच रंगत आणली. ढोलकीवादक म्हणून मुरलीधर आमले, शंकर उईके, युगल उईके व गजानन खंडारे यांनी साथ दिली. तुणतुणीवादक अनिल नेरकर, अरविंद आमले व वैभव आमले यांनी संगीताची बाजू सांभाळली.गायक म्हणून मयूर गौड,विलास वानखडे, शुभम शेळके, दिनेश गौड,अजय आमले, दिलीप त्र्यंबक आमले, प्रभाकर मेहरे,अतुल ठाकरे, सचिन पडोळे, कैन्हयालाल गौड,विकास मेहरे, प्रतीक मेहरे, मनीष मेहरे व निलेश मेहरे यांनी सहभाग नोंदविला. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनातही गावातील सर्व समाजघटकांना एकत्र आणणारी 'एक गाव, एक गवळण' ही संकल्पना सामाजिक सलोखा, बंधुभाव आणि सांस्कृतिक वारसा जपणारी ठरत आहे. केवळ मनोरंजनाचा कार्यक्रम न राहता गावाच्या एकतेचे प्रतीक बनलेली ही परंपरा चेनुष्ठा ग्रामस्थांनी यंदाही उत्साहात जोपासली.

शिराझगाव मोझरित ५० वर्षांची नाट्य परंपरा

तिवसा- तालुक्यातील शिरजागाव मोजारी गावने यांची केवळ ५० वर्षे जुनी नाट्य परंपरा आजही जिवंत ठेवण्यात आली आहे. जुन्या रुझविले नाट्यकलेचा वारसा नव्या पिढीकडून त्याच उत्साहाने पुढे नेला जात आहे. १२ नोव्हेंबर रोजी, गवतील थिएटर ड्रामा ग्रुपच्या वतीने रोझी यशवंत मान लिखित 'चौथारा' हे नाटक सादर केले जाईल. तिवासा तालुक्यातील शिरजागाव मोजारी गाव 'पंचक्रोशित शिरजागाव दांडर' म्हणून ओळखले जाते. गावातील नाट्य कलेची परंपरा १९७२ मध्ये 'मच्छिंद्रनाथ' किंवा 'नाटकाच्या' सादरीकरणाने सुरू झाली. या दरम्यान गवतील कलावंतनी यांनी अनेक नाटके सादर केली.

गुरुसिद्धी संगीत विद्यालयाची दिवाळी पहाट आनंदात साजरी

तिवसा- येथील गुरुसिद्धी संगीत विद्यालयात दरवर्षी सुरवाडी येथील शिवमंदिरात दिवाळी पहाट हा कार्यक्रम भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. संगीत, गायन, भजन यामाध्यमातून पहाटे पाच वाजतापासून कार्यक्रम सुरु झाला. यावेळी काव्या गांधी, अभिज्ञा पाटील, परिणीता काळमेघ, आराध्या भोयर, प्रज्योत ढोबाळे, रजनीताई गौरखेडे, ज्योत्स्ना ढोबाळे, देवांशु खोडे, मीरा किरपाणे, कार्तिकी किरपाणे, रुपम वानखडे, शंभो पोलाड, दिनांशु खैरकार, नंदलाल नारिंगे कारंजा, वृषभ लोखंडे, हार्दिक निंघोट, स्वरीत पेठे, संकेत बंड, रोनित कडू, धार्मिक इंगोले, प्रणव कुबडे इत्यादी विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. या कार्यक्रमाची सुरुवात 'महाराजा महादेवा' या भैरव रागाच्या



बंदिशीने संगीत विद्यालयाचे प्रमुख मार्गदर्शक प्रा.सुनिल इंगोले यांनी केली व परिसरातील गायक कैलास लोखंडे, नितीन कुबडे, प्रसाद सातव, नीलेश निवल,विजय किरपाणे यांनी आपली भजनरुपी सेवा दिली.या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय दर्जाचे ख्यातमान तबला वादक डॉ.सौरभ कर्डीकर मुंबई यांची उपस्थिती लाभली. त्यांनी सुद्धा अभंग व खंजिरी भजन सादर केले. या कार्यक्रमात गुरुसिद्धी संगीत विद्यालयाचे संस्थापक बलदेवराव इंगोले, माजी सरपंच शेळके, विलास शिंदे, वानखडे, आडे, सुधीर विघ्ने इत्यादी मान्यवर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

आ.प्रवीण पोटे पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण; पर्यावरण संवर्धनाचा दिला संदेश

छत्रपती शिवाजी महाराज उद्यान मित्रमंडळाचा पुढाकार

अमरावती/का.प्र.

एल निनोचा संभाव्य प्रभाव आणि सरासरीपेक्षा कमी झालेल्या पर्जन्यमानामुळे राज्यातील शेतकरी अडचणींचा सामना करीत आहेत.या परिस्थितीची जाणीव ठेवून आ.प्रवीण पोटे पाटील यांनी आपला वाढदिवस साधेपणाने साजरा करण्याचे आवाहन केले होते. त्यांच्या या आवाहनाला प्रतिसाद देत शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. याच उपक्रमांतर्गत राठीनगर, संभाजीनगर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज उद्यानात आ.प्रवीण पोटे पाटील यांच्या हस्ते पिंपळवृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज उद्यान मित्रमंडळ राठीनगर, संभाजीनगर तसेच आ.प्रवीण पोटे पाटील मित्रमंडळ आणि परिसरातील नागरिकांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दीर्घायुषी आणि पर्यावरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या पिंपळवृक्षांचे रोपण करून वाढदिवसाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचा विधायक संदेश देण्यात आला.

यावेळी बोलताना आ.प्रवीण पोटे पाटील म्हणाले की,झाडे आहेत म्हणून निसर्ग आहे आणि निसर्गामुळेच पृथ्वीवरील सजीवसृष्टी व मानवाचे अस्तित्व टिकून आहे. आज जगभरात बदलते हवामान आणि वाढते तापमान यांचे गंभीर परिणाम मानवी जीवनावर होत आहेत. त्याचबरोबर धान्योत्पादन, नैसर्गिक जलसाठे आणि पर्यावरणाचा समतोल यावरही विपरीत परिणाम होत आहे. ही परिस्थिती लक्षात घेता जल, जंगल आणि जमीन यांचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, काळाची गरजही आहे. केवळ वृक्षारोपण करून चालणार नाही, तर लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन आणि संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

आ.पोटे पाटील यांनी यापूर्वीही विविध प्रसंगी हजारो पिंपळ,वड,आंबा,चिंच आणि कडुलिंब यांसारख्या दीर्घायुषी वृक्षांची लागवड करून त्यांच्या संगोपनाचे पालकत्व स्वीकारले आहे.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आर. के. पाटील यांनी केले. याप्रसंगी छत्रपती शिवाजी महाराज उद्यान मित्रमंडळाचे रवि चौधरी,दिलीप निंभोरकर, सुधाकर तपासे, विनायकराव ठाकरे, नरेंद्र देशमुख, विनायक साबळे, प्रकाश त्रिपाठी, अमोल तायडे, हिरालाल सूर्यवंशी, विजय महल्ले, मधुकर पोटे, नरेंद्र सपकाळ,शाम केचे,गोपाळराव गावंडे, संजय मोरख्या, नरेंद्र देशमुख, प्रदीप चौधरी, गजानन ठाकरे, रामदास खर्चे, यशवंत साने, सुधाकर तपासे, धनंजय वानखडे,नरेंद्रसिंह चव्हाण, मंगेश मोहोड, सुयोग पाचघरे, गोपाळ गावंडे, लक्ष्मण कुंभारे, डॉ अशोक देशमुख, विजय कुऱ्हे, विजय महल्ले, नरेंद्र सपकाळ, राजेंद्र पाटील, डॉ सोनोने यांच्यासह परिसरातील अनेक मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित नागरिकांनी आ.प्रवीण पोटे



पाटील यांच्या सामाजिक व पर्यावरण संवर्धनाच्या कार्याचे कौतुक करून त्यांचे आभार मानले. तसेच वाढदिवसानिमित्त त्यांना मंगलमय शुभेच्छा दिल्या. वृक्षारोपणाच्या माध्यमातून निसर्ग संवर्धनाचा संकल्प करत हा उपक्रम उत्साहात झाला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

रामपुरी कॅम्पमध्ये बांधकामाचा बीम कोसळला; चार मजूर जखमी

प्रवेशद्वाराच्या कामादरम्यान दुर्घटना






अमरावती/प्रतिनिधीः- प्रवेशद्वाराच्या बांधकामासाठी उभारण्यात आलेले बीम आणि त्याचे सेंट्रिंग अचानक कोसळल्याने चार मजूर गंभीर जखमी झाले आहेत.मंगळवारी, १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी रामपुरी कॅम्प परिसरात ही दुर्घटना घडली. काँक्रीटचा मलबा आणि लोखंडी सेंट्रिंगच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या मजुरांना बाहेर काढण्यासाठी सहकारी मजूर, नागरिक आणि अग्निशमन दलाला प्रयत्न करावे लागले. यातील एका मजुराचा पाय मलब्याखाली अडकल्याने त्याला बाहेर काढण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले. या घटनेत चार मजूर जखमी झाले असून त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मोहम्मद अहफाज (वय २६), जमीर खान समशेर खान (वय ३५), शेख मुजफ्फर शेख बब्बू (वय २४) आणि शेख जमीर (वय ४०) अशी जखमी मजुरांची नावे आहेत. रामपुरी कॅम्पमधील मुख्य मार्गावर प्रवेशद्वार उभारण्याचे काम सुरू आहे. या प्रवेशद्वाराचे दोन्ही बाजूंचे सुमारे २२ फूट उंचीचे पिल्लर ☞(पान २ वर)

कोकर्डा फाट्यावर भीषण अपघात, दोघांचा मृत्यू!

भरधाव टाटा नेक्सॉनची दुचाकीला जोरदार धडक





खल्लार/प्रतिनिधीः- अंजनगाव-दर्यापूर मार्गावरील कोकर्डा फाट्यानजीक ९ नोव्हेंबर रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास भीषण अपघात घडला. भरधाव वेगाने जाणाऱ्या टाटा नेक्सॉन चारचाकीने दुचाकीला जोरदार धडक दिली.या अपघातात दुचाकीवरील एका युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला,तर दुसऱ्या युवकाचा अंजनगाव ग्रामिण रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.दोघेही मित्र असून नवगाजी प्लॉट परिसरातील रहिवासी असल्याची माहिती आहे.

माहितीनुसार मुकुल विनोद दुर्गे (वय २२,रा. अंजनगाव सुर्जी) हा एमएच २७ बीझेड १९२४ क्रमांकाची टाटा नेक्सॉन कार घेऊन अंजनगावकडून दर्यापूरकडे जात होता. याचवेळी दर्यापूरकडून अंजनगावकडे दुचाकीने येणारे अब्दुल साकीब अब्दुल सलीम आणि वाहिद खान इसाक खान हे कोकर्डा फाट्यावर आले असता कारने त्यांच्या दुचाकीला धडक दिली.या धडकेत अब्दुल साकीब अब्दुल सलीम यांचा जागीच मृत्यू झाला, तर वाहीद खान इसाक खान रा.भालदारपुरा अंजनगाव सुर्जी यांना उपचारासाठी अंजनगाव ग्रामिण रुग्णालयात दाखल करण्यात आले.मात्र उपचारादरम्यान त्यांचीही प्राणज्योत मालवली. कारचालक भरधाव वेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.घटनेची माहिती मिळताच मृतांच्या नातेवाइकांनी घटनास्थळी धाव घेतली.या दुर्दैवी अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.पुढील तपास ठाणेदार प्रशांत देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

क्षुल्लक वादातून प्राणघातक हल्ला

-दसरा मैदान परिसरातील घटना



अमरावती/प्रतिनिधीः- राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दसरा मैदान परिसरात असलेल्या लाल दवाखाना कंपाऊंडमध्ये आज मंगळवार १० नोव्हेंबरच्या संध्याकाळी क्षुल्लक कारणावरून दोन अज्ञात हल्लेखोरांनी ५७ वर्षीय इसमावर चाकूने सपासप वार करून जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या इसमाला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.उमेश टेकचंदजी गोस्वामी (वय ५७, रा. सुशील नगर) हल्ल्यात जखमी इसमाचे नाव आहे. घटनेनंतर दोन्ही आरोपी घटनास्थळावरून पसार झाले असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. माहिती नुसार, सुशील नगर निवासी उमेश टेकचंदजी गोस्वामी हे मंगळवारी संध्याकाळी दसरा मैदाना जवळील लाल दवाखाना कंपाऊंड परिसरात उपस्थित होते. त्याच वेळी कोणत्यातरी कारणावरून त्यांचा दोन व्यक्तींशी वाद झाला.वाद इतका वाढला की, दोन्ही आरोपींनी रागाच्या भरात धारदार चाकू काढला आणि गोस्वामी यांच्यावर हल्ला चढवला. हल्लेखोरांनी त्यांच्या हातावर, पोटावर आणि कमरेवर अनेक वार केले, त्यामुळे ते रक्तबंबाळ होऊन तिथेच खाली कोसळले. घटना घडताच परिसरात एकच खळबळ ☞(पान २ वर)

चाकूचा धाक दाखवून मॅनेजरच्या गल्ल्यातील रक्कम लंपास

अमरावती/प्रतिनिधीः- दारूचे बिल चुकते करण्यावरून सुरू झालेल्या वादाने रसोई बारमध्ये हिंसक वळण घेतले. तिघांनी बारच्या मॅनेजरला मारहाण करीत चाकूचा धाक दाखवला आणि गल्ल्यातील रोख रक्कम हिसकावून घेतली. त्यानंतर बारमधील साहित्याची तोडफोड करून कर्मचाऱ्यांनाही धमकावण्यात आले. कवरनगर परिसरातील रसोई बारमध्ये ९ नोव्हेंबरच्या मध्यरात्री साडेबारा वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला.

हेमंत दामोधरराव गडलिंग यांच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी चेतन (वय ३०), अनिल (वय ३२, दोघेही रा. उत्तमनगर) आणि मनोज गजानन (वय ३२, रा. म्हासोद) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हेमंत हे रसोई बारमध्ये मॅनेजर म्हणून काम करतात. घटनेच्या रात्री तिन्ही जणांनी दारूची ऑर्डर दिली होती. वेटरने ऑर्डर पूर्ण केल्यानंतर बिलाची रक्कम मागितली असता आरोपींनी मॅनेजरशी वाद घालण्यास सुरुवात केली. वादाचे रूपांतर धक्काबुक्की आणि मारहाणीत झाले. यावेळी आरोपींनी त्यांना जीवे मारण्याची धमकीही दिल्याचे तक्रारीत नमूद आहे. विशेष म्हणजे, काही वेळाने आरोपींनी ऑनलाइन ☞(पान २ वर)

दर्यापूर-अकोला मार्गावर पिकअप वाहन पलटी

एकाच कुटुंबातील चार जण जखमी !



गोपाल पाटील अरबट मित्रपरिवाराने जखमींना रुग्णालयात केले दाखल

खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर ते अकोला मार्गावरील सौंदळी फाट्याजवळ आज (दि.१०) मंगळवारी दुपारी १२ वाजताच्या दरम्यान भिषण अपघात घडला. यात एकाच कुटुंबातील चारजण जखमी झाले आहेत.

मुख्य रस्त्यावर दुचाकी अचानक आडवी आल्याने पिकअप वाहनावरील वाहन चालकाचे नियंत्रण सुटले आणि वाहन रस्त्यावर पलटी झाले. यात आतिश मोहीते, कविता मोहीते, रामा मोहीते, रमेश मोहीते सर्वजण रा. अकोला हे गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती मिळताच शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख व रुग्णसेवक गोपाल पाटील अरबट आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमींना मदत करून उपचारासाठी उपाजिल्हा रुग्णालय दर्यापूर येथे दाखल केले.

सलग घडणाऱ्या अपघातांच्या घटनांमुळे परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून वाहनचालकांनी वाहतुकीचे नियम पाळून सावधगिरीने वाहन चालवावे असे आवाहन सुज्ञ नागरिकांकडून वाहनचालकांना करण्यात येत आहे.

आ.रोहित पवार यांची आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला सांत्वनपर भेट



नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः- राष्ट्रवादीचे युवा नेते तथा आमदार रोहित पवार यांनी नांदगाव तालुक्यातील दुष्काळग्रस्त व आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला सांत्वना पर भेट दिली. काळजी करू नका आम्ही तुमच्या पाठीशी आहोत असा धीर देखील त्यांनी दिला. राज्यभरात दुष्काळ असून नांदगाव तालुक्यात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यावर दुहेरी संकट असल्याने सर्वाधिक नुकसान झाले. त्याची दखल घेत आमदार रोहित पवार यांनी नांदगाव तालुक्यातील पापळ येथील दुष्काळग्रस्त शेतकरी संतोष काळसर्पे व शिवनीरसुलापूर येथील आत्महत्याग्रस्त कुटुंब भास्कर वंजारी यांच्या घरी सांत्वना पर भेट देऊन कुटुंबाला धीर देत शासकीय मदत मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्याशी भ्रमणध्वनी वरून चर्चा सुद्धा केली. आत्महत्या ☞(पान २ वर)

धोत्रा ते सालोरा मार्गावर एसटी बस उलटली

-अरुंद रस्ता आणि प्रशासकीय दुर्लक्षामुळे अपघात -२० प्रवासी जखमी



तिवसा/प्रतिनिधीः- शिरजगाव मोझरी येथून अमरावतीकडे जाणाऱ्या एसटी बसला धोत्रा ते सालोरा गावादरम्यान अपघात होऊन बस रस्त्यालगतच्या नाल्यात पलटली. या दुर्घटनेत वाहकासह सुमारे २० प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवितहाणी झाली नसून सर्व प्रवासी सुरक्षित आहेत.

शिरजगाव मोझरी येथून दुपारी १.३० वाजता अमरावतीच्या दिशेने निघालेली एसटी बस (क्रमांक MH ४० Y ५१८३) धोत्रा ते सालोरा दरम्यान आली असता अरुंद रस्ता आणि बस चालकाच्या माहितीवरून ब्रेक फेल झाल्याने बस थेट नाल्यात पलटी झाली. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन चालक, वाहक आणि सर्व प्रवाशांना बाहेर काढले.स्थानिक जखमी प्रवासी आपल्या वाहनाने निघून गेले, तर गंभीर मुकामार लागलेल्या काही विद्यार्थ्यांना व नागरिकांना, तसेच वाहकासह १० प्रवाशांना पुढील उपचारासाठी अमरावती येथील इर्विन रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघाताची माहिती मिळताच अमरावती विभागीय नियंत्रक संदीप शिरसागर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. बसची तांत्रिक तपासणी केल्यानंतरच ब्रेक फेल झाले होते की नाही, हे स्पष्ट होईल, अशी माहिती त्यांनी दिली.

अमरावती-नागपूर राष्ट्रीय महामार्गाला पर्यायी मार्ग म्हणून या रस्त्याचा अनेकदा वापर केला जातो. मात्र, रस्त्यावरील खड्डे आणि अरुंद रस्ता या समस्या वर्षानुवर्षे कायम आहेत. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या झाडाझुडपांमुळे समोरून येणाऱ्या वाहनांना जागा देणे कठीण होते. वारंवार निवेदने देऊनही सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. ☞(पान २ वर)

सांगळुद प्रवाशी निवाऱ्याच्या बाजूला सापडला अज्ञात मृतदेह



खल्लार/प्रतिनिधीः- दर्यापूर तालुक्यातील येवदा पोलिस स्टेशन हद्दीतील अकोट-दर्यापूर रोडवरील सांगळुद गावाच्या प्रवाशी निवाऱ्याच्या बाजूला ४० वर्ष वयाच्या अज्ञात इसमाचा मृतदेह आज (दि. १०)गावकऱ्यांना आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. घटनास्थळी मृताजवळ पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. मृतकाच्या अर्ध्या शरीरात किडे पडल्याचेही आढळून आले.तो अज्ञात व्यक्ती या परिसरात कोठून व कसा आला? याचा शोध येवदयाचे ठाणेदार प्रफुल्ल गाडेकर यांच्या मार्गदर्शनात पोहेकॉ ☞(पान २ वर)

यातील एका मजुराचा पाय मलब्याखाली अडकल्याने त्याला बाहेर काढण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागले. या घटनेत चार मजूर जखमी झाले असून त्यांना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मोहम्मद अहफाज (वय २६), जमीर खान समशेर खान (वय ३५), शेख मुजफ्फर शेख बब्बू (वय २४) आणि शेख जमीर (वय ४०) अशी जखमी मजुरांची नावे आहेत. रामपुरी कॅम्पमधील मुख्य मार्गावर प्रवेशद्वार उभारण्याचे काम सुरू आहे. या प्रवेशद्वाराचे दोन्ही बाजूंचे सुमारे २२ फूट उंचीचे पिल्लर ☞(पान २ वर)

शेतातून २ लाखाचा ७ टन संत्रा लंपास

अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल -तिवसा येथील घटना



तिवसा/प्रतिनिधीः- येथील युवा शेतकऱ्याने शेतात राब-राब राबून,मोठ्या कष्टाने पिकविलेल्या २ एकरातील ७ टन संत्रा कुणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना ५ नोव्हेंबर रोजी उघडकीस आली. सदर घटनेमुळे शेतकऱ्याने चिंता व्यक्त करून तिवसा पोलिसांत याबाबत तक्रार दाखल केली. अज्ञात चोरट्यांच्या मुसक्या आवळण्याची मागणी केली आहे. या घटनेत शेतकऱ्याचे अंदाजे २ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.

सविस्तर असे की,मौजे तिवसा भाग क्रमांक ३ मध्ये तिवसा येथील भूषण हेमंत मुंदाने यांचे २ एकर बागायती शेत आहे.या शेतात गेल्या काही वर्षांपासून त्यांनी संत्रा पीक उभे केले.एकूण ३०० संत्रा झाडातून यावर्षी १३ टन संत्रा निघणार असल्याचा प्राथमिक अंदाज होता.या संत्र्याच्या उत्पन्नातुन उसनवार घेतलेले काही कर्ज फेडून दिवाळी साजरी करण्याचे स्वप्न युवा शेतकऱ्याने बघितले होते.मात्र ५ नोव्हेंबर रोजी अचानक ☞(पान २ वर)

निक्कू कचरे हत्याकांडाचा मुख्य आरोपी जेरबंद



अमरावती/प्रतिनिधीः- गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दिवाळीच्या रात्री घडलेल्या चैतन्य उर्फ निक्कू कचरे हत्याकांडात फरार असलेल्या मुख्य आरोपीला अटक करण्यात गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले आहे. फरार असलेला मुख्य आरोपी अश्विन उर्फ गुल्या अशोक पहाडण (वय २६) याला पोलिसांनी बडनेरा रेल्वे स्टेशनवरून घेराबंदी करून ताब्यात घेतले आहे. माहिती नुसार, मृतक चैतन्य उर्फ निक्कू कचरे (वय ३१) याचे वडील राजेंद्र कचरे यांनी गाडगे नगर ठाण्यात तक्रार दाखल केली होती कि जुन्या वादातून आरोपीने चैतन्यला महेंद्र कॉलनीतील पांढरी हनुमान मंदिराच्या मागे जवंजाळ रेतीच्या ठेल्यावर बोलावले आणि त्याच्या गळ्यावर धारदार शस्त्राने ☞(पान २ वर)

झोपडपट्टीतील बांधवांसोबत आमदार राजेश वानखडे यांनी साजरी केली दिवाळी!

पाणी आणि निवासासाठी जागा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन



मोर्शी/प्रतिनिधीः- दिवाळीचा आनंद समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचावा, या सामाजिक भावनेतून आमदार राजेश वानखडे यांनी लेहगावजवळील झोपडपट्टीत वास्तव्यास असलेल्या झिंगा भोई भटक्या समाजातील बांधवांसोबत दिवाळी साजरी केली.

यावेळी त्यांनी महिला मजुरांना साडीचोळी भेट देऊन फराळाचे वाटप केले. कार्यकर्त्यांसह त्यांनी या कुटुंबांसोबत दिवाळीचा आनंद साजरा केला. गेल्या वीस वर्षांपासून या भागात मजूर कुटुंबे वास्तव्यास असून आजही त्यांना झोपडपट्टीतच राहावे लागत आहे.

यावेळी येथील नागरिकांनी आमदार राजेश वानखडे यांची भेट घेऊन पिण्याच्या पाण्याची सुविधा तसेच कायमस्वरूपी निवासासाठी जागा उपलब्ध करून देण्याची ☞(पान २ वर)

मीनाताई देशमुख यांचे निधन

तिवसा/प्रतिनिधीः- तिवसा येथील रहिवासी मीनाताई अरविंदराव देशमुख (वय ८४) यांचे आज निधन झाले. अंत्यसंस्कार बुधवार, ११ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता तिवसा येथील स्मशानभूमीत करण्यात येतील. त्यांच्या पश्चात मुले श्रीधर, श्रीराम, गजानन, मुलगी, स्नुषा, जावई, नातवंडे आणि मोठा आप्तपरिवार आहे. काँग्रेस कमिटीचे तिवसा शहराध्यक्ष श्रीराम ऊर्फ सेतूभाऊ देशमुख यांच्या त्या मातोश्री होत.

